
२८८

भारत परिचय पुस्तकमाला : ३




[ सांस्कृतिक परिचय ]

: लेखक :

पं. महादेवशास्त्री जोशी


ज्ञानराज प्रकाशन
पुणें २

REFBK 0012203
REFBK-0012203

मूल्य तीन रुपये


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३१४५८ वि: भू-प्रवास
क्रमांक २९८ नों: दि: १३/१०/६९

नों. क्र. ३१४५८
क्रमांक —
दिनांक - १३/१०/६९
क्रमांक २९८


कर्नाटक
पुणे
महाराष्ट्र
बिदर
गुलबर्गा
विजापूर
बेळगाव
बागलकोट
रायचूर
गोवें
लोंडा
धारवाड
हुबळी
गदग
बेळ्ळारी
आंध्र
कारवार
चित्रदुर्ग
शिमोगा
पश्चिम समुद्र
बंगलोर
कोलार
मैसूर
मद्रास
केरळ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३२७७८ वि:
क्रमांक २०८ नों: दि:

भारत परिचय पुस्तकमाला : ३



# कर्णाटक

[ सांस्कृतिक परिचय ]

REFBK-0012203
REFBK-0012203
ग्रंथालय ठाणे
क्र १२२०२

: लेखक :

पं. महादेवशास्त्री जोशी

ज्ञानराज प्रकाशन
पुणे २

मूल्य तीन रुपये

प्रकाशक
सौ. सुधा जोशी
ज्ञानराज प्रकाशनाकरितां
४२१, शनिवार पेठ, पुणें २.

•

चित्रकार
सुधाकर खासगीवाले
गंगाधर ताटके

•

ठसे
कलाभुवन, पुणें

•

प्रकाशन
शके १८८३
सन १९६१

•

प्रथमावृत्ति

•

मुद्रक
चिं. ग. वझे
साधना प्रेस
४३०-३१, शनिवार पेठ, पुणें २.

# चार शब्द

भारत परिचय पुस्तक मालेचें हें तिसरें पुष्प. पण हें उमलायच्या वेळीं नेमकें त्याला पुण्याच्या जलप्रलयानें ग्रासलें. अर्धे छापून झालें आणि त्याला पाणी भेटलें. पुढचें हस्तलिखितहि संशयांत सांपडलें. पण साधनेंतल्या जुळणीखात्याच्यां व्यवस्थितपणामुळें पाणी लागलेली का होईना; पण पुढची प्रत सांपडली. तिच्या आधारें मी पुनश्च तो मजकूर लिहून देऊं शकलों. साधना छापखान्यानेंहि एका महिन्यानंतर 'पुनश्च हरिः ओम्' केलें. आणि आज हें पुस्तक जलदिव्यांतून बाहेर पडून प्रकाशित होत आहे.

साधनेनें इतक्या तांतडीनें हें पुस्तक हातावेगळें केलें, याबद्दल श्री. चिं. ग. वझे यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होतील.


दुसरे आभार मानायचे ते ज्यांनीं माझ्या कर्नाटकाच्या दौऱ्यांत मला अनेक प्रकारें साह्य केलें त्यांचे आणि ज्या ज्या ग्रंथकारांचें मला या कामीं साहाय्य झालें, त्या त्या ग्रंथकारांचे.

कर्नाटकभूमीचा हा परिचय वाचकांना प्रिय होईल असा भरंवसा धरून मी यापुढें गुजरातच्या मार्गक्रमणाची सिद्धता करीत आहें.

पुणें
गणेश चतुर्थी–शके १८८३ — महादेवशास्त्री जोशी

# अनुक्रम

| | | |
|---|---|---|
| १ | भूमि आणि जन | : १ |
| २ | इतिहासाची वाटचाल | : १४ |
| ३ | साहित्य आणि साहित्यकार | : ३२ |
| ४ | हरिदास किंवा दासकूट | : ५२ |
| ५ | वीरशैव-वचनकार | : ६९ |
| ६ | संस्कृतीचा ताणा बाणा | : ८३ |
| ७ | कलाक्षेत्र-दर्शन | : ९५ |




गोविंदाग्रजांनीं " मंगल देशा, पवित्र देशा " म्हणून महाराष्ट्राचें प्रणाम-गीत गायिलें. श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांची रसवंती " प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा " या ध्रुवपदाचें महाराष्ट्र गीत ललकारून गेली. कन्नड कवि श्री. दोडमेटी यांचें 'कर्नाटक महिम्नःस्तोत्र' हि याच जातीचें आहे. आपल्या मातृभूमीचा महिमा वर्णितांना ते म्हणतात—

" तायि रत्नगर्भे कन्नड भूशक्ति
देवि परमेश्वरीये चंद्रभागतिटस्थे
अल्लनी कल्लु मण्णल्ल अल्ले
वरि झरियो होनलो हीलेयो
अडचल्ल नीनु अल्ल मृण्मयळु
चिन्मयळु तायि नी हिरण्मयळु
तायि कन्नड माते
भारतीय तनुजाते
नम्म जीवनशक्ति
ॐ कारादभिव्यक्ति
भगवतीयु नीनु "

१२.२०३

" माते, रत्नगर्भे, चंद्रभागातटस्थे, परमेश्वरी, तूं दगड माती नव्हेस. तूं केवळ प्रपात, नदी, निर्झर अतएव जड नव्हेस. तूं मृण्मय नसून चिन्मय

आहेस. तूं कन्नडिगांची शक्ति आहेस. तूं भारतकन्या आहेस. तूं आमची जीवनशक्ति. ओंकारापासून तुझी अभिव्यक्ति. तूं साक्षात् भगवती— ”

बेळगांव-कारवार या जिल्ह्यांचा कांहीं भाग, पूर्वींचें म्हैसूर संस्थान, पूर्वींच्या निजाम राज्याचा पश्चिम विभाग आणि मद्रास राज्यांतले कानडा आणि बल्लारी हे जिल्हे, पूर्वेस गुंटूर अन् कृष्णा जिल्हा, पश्चिमेस हिंदी महासागर, दक्षिणेस कृष्णा नदी आणि उत्तरेस गोदावरी, एवढा विस्तार धरून प्राचीन कर्नाटक होता, असें सांगतात. आजमितीस नैसर्गिक परिस्थितीला धरून कर्नाटकाचे तीन ठोकळ विभाग पाडतां येतात—

पहिला विभाग खालाटी म्हणजे समुद्राची किनारपट्टी. हिची लांबी सुमारें शंभर कोस आहे. रुंदी उत्तर अंगाला पांच ते दहा कोस एवढीच असली, तरी दक्षिण टोकाला ती सुमारें पंधरा ते वीस कोस झाली आहे. कर्नाटकाचा हा घाटाखालचा प्रदेश होय. सह्याद्रीचे अनेक फांटे-फराटे या प्रदेशांत घुसले आहेत. त्यामुळें या भागांत अनेक निबिड अरण्यें निर्माण झालीं आहेत. दऱ्या खोरीं तोंड उघडून उभीं आहेत. काळी, गंगावळी, तदडी, शरावती, या कर्नाटकाच्या या विभागाच्या जीवनदानी पुण्यसरिता होत. सह्याच्या कुशींतून अलगद बाहेर पडून अनेक पाणलोट आपल्या पात्रांत रिचवीत धावत, खळाळत त्या पश्चिम सागराला खेंव द्यायला जातात. प्रत्येकीच्या मुखाशीं एखादें तरी बंदर असतेंच. कारवार, कुमठा, होनावर, अंकोलें, भटकळ, हीं बंदरें या नद्यांच्या मुखावरच मांडलेलीं आहेत. एकाकाळीं हीं बंदरें भरभराटींत होतीं; पण आजमितीस मात्र त्यांची अवस्था ठीक नाहीं. नद्यांनीं वाहून आणलेल्या गाळांचे डोंगरच्या डोंगर तिथें जलपृष्ठाखालीं सांचले आहेत. त्यामुळें तीं उथळ झालीं आहेत. आणि त्यामुळेंच देशांतरीं जाणाऱ्या मोठ्या आगबोटी तिथें आपला नांगर टाकूं शकत नाहींत.

कर्नाटकाचा दुसरा विभाग म्हणजे घाट किंवा मलेनाड. या घाटाची उंची सर्वत्र समान नाहीं. उत्तरेस ती दोन ते तीन हजार फूट आहे. मध्यभागीं एक हजार फुटांपर्यंत खाली आली आहे. दक्षिण भाग मात्र सर्वांत उंच म्हणजे सहा हजार फुटांच्याहि वर चढला आहे. सह्याद्रीचा हा घाट घनदाट जंगलांनीं भरलेला आहे अन् पूर्वेकडे हळूहळू उतरत गेला आहे.

पश्चिमेला सागराकडे अंग टाकणाऱ्या नद्यांचीं नांवें वर सांगितलीं. तशाच कांहीं उगवतीला वळणाऱ्या नद्याहि मलेनाडमध्यें उगम पावल्या आहेत. मलप्रभा, घटप्रभा, तुंगभद्रा, कावेरी, पेन्नार हीं त्यांचीं नांवें. यांचे प्रवाह अत्यंत वेगवान् आहेत. त्या सह्याद्रीच्या कडे-खांद्यावरून उड्या मारीतच खालीं येतात. मात्र त्यांची जलसंपदा केवळ पावसावरच अवलंबून असल्या-मुळें कधीं त्या फुगतात, तर कधीं कृशतनू बनतात. त्यामुळें त्या जल-वाहतुकीला निरुपयोगी ठरल्या असल्या, तरी उंचावरुन खोलवर कोसळ-णाऱ्या प्रपातांनीं त्या जलविद्युत् निर्माण करण्याच्या कामीं उपयुक्त ठरल्या आहेत. त्यांना धरणें बांधून अन् कालवे काढून तिथल्या लोकांनीं त्या जलौ-घांना माणसाच्या सेवेसाठीं राबवून घेतलें आहे.

किनारपट्टी अन् घाट, या दोन्हीं भागांत उन्हाळा फार अन् मेघराजाहि कर्णासारखा उदार. हवामान कधीं समशीतोष्ण तर कधीं अगदीं विषम. घाटांत घनदाट जंगल; त्यामुळें हवा रोगट. त्यामुळें तिथली लोकवस्ती विरळ आहे. पूर्व भागांत पाऊस थोडा अन् बेभरवंशाचा. त्यामुळें त्या भागांतल्या कित्येक जिल्ह्यांत वरचेवर दुष्काळ उभा राहतो. सागवान, शिसवी, चंदन, बांबू इत्यादि विविध प्रकारचे वृक्ष घाटांतल्या जंगलांत वाढतात. भारताच्या समृद्धीसाठीं अवश्यक अशा नव्या उद्योगांना ते वृक्ष जणूं आवाहन करीत आहेत. पूर्व भागांत कापूस अन् तंबाखू, हीं पैसा मोजून देणारीं पिकें मोठ्या प्रमाणावर होतात. पश्चिमेच्या किनार-पट्टीवर भाताची पिवळी धान्यलक्ष्मी डोलते. त्याच भागांत नारळाचें उत्पन्नहि चांगलें मिळतें. नीलगिरीवर चहाचे मळे बहरतात, तर कूर्गमध्यें कॉफीची लागवड मोठ्या प्रमाणावर होते.

उत्तर कर्नाटक हा तिसरा विभाग. तिथल्या लोकांचा मुख्य व्यवसाय शेतीचा. दुय्यम धंदा म्हणून विणकाम चालतें. तिथल्या ग्रामीण उद्योगांत हातमागाच्या धंद्याला अग्रमान आहे. त्या भागांत सुती, रेशमी अन् लोकरीचें कापड निर्माण होतें. या प्रदेशांत मोठमोठ्या गिरण्या नाहींत. बहुतेक सगळा वस्त्रोद्योग हातमागावरच चालतो, आणि तिथल्या लोकांच्या मुखीं चार घास घालतो. किनारपट्टींत मासेमारी तेजींत चालते. तिथे मीठहि खूप पिकतें.

कर्नाटक खनिजसंपत्तीनेंहि मातबर आहे. पण अद्यापि ती संपदा भूगर्भा-तच निजून आहे. तिला वर काढून विकासकार्यात सार्थकीं लावण्यासाठीं अनंत हस्तांची गरज आहे. भारतांत सगळीकडे मिळून जेवढें सुवर्ण खाणीं-तून निघतें, त्यांतला ८० टक्के वांटा आजवर कर्नाटक देत आला आहे. कर्नाटक ही वाच्यार्थानें सुवर्ण-भूमि आहे. कोलारच्या खाणी हें सुवर्ण-क्षेत्र कोणींहि जाऊन पाहावें. सोन्याप्रमाणेंच त्या भूमींतलीं लोखंड, मॅग्नेसाइट, बॉक्साइट इत्यादि धातुसंपत्ति जेव्हां भूमींतून वर येईल, तेव्हां कर्नाटकाचा चेहरा समृद्धीनें उजळून निघेल !

पश्चिम सागरापासून तों वेंगीविषयापर्यंत पसरलेल्या या भूप्रदेशांत ज्ञात इतिहासाच्याहि पूर्वकाळीं माणसें राहत असत. अर्थात्, तीं वानरसदृश होतीं आणि तीं नैसर्गिक गुहांमध्यें वास्तव्य करीत होतीं. (आजवर तिथें जें उत्खनन झालें आहे, त्यांत अतिप्राचीन अश्मयुगापासून तों लोहयुगापर्यंतच्या काळांतल्या विविध मानवसंस्कृतींचें दर्शन घडवणारे कितीतरी अवशेष सांपडले आहेत. मलप्रभेच्या खोऱ्यांत अन् तुंगभद्रेच्या कांठीं अतिप्राचीन अश्मयुगांतल्या मानवानें घडवलेलीं पाषाणाचीं कांहीं उपकरणें गवसलीं आहेत. घटप्रभेच्या तीरीं आणि बेळगांव जिल्ह्यांत उत्तर अश्मयुगांतल्या दगडी उपकरणांचे सुंदर नमुने मिळाले आहेत. भीमा अन् कृष्णा या नद्यांच्या खोऱ्यांत मौर्य आणि आंध्र यांच्या काळांतल्या मृण्मय पात्रांचे तुकडे हातीं लागले आहेत. ते रंगीत तर आहेतच; शिवाय नक्षीदारहि आहेत. कोन्नूर, बदामी, ऐहोळ या स्थळीं उजेडांत आलेलीं भव्य दगडी स्मारकें मौर्यकाळांत उभारलेलीं असावीं, असें संशोधकांचें अनुमान आहे) चंद्रवल्ली येथें आंध्रकाळांतले बरेच अवशेष उपलब्ध झाले आहेत. अजून अनेक ठिकाणीं उत्खनन व्हायचें आहे. उत्खनित वस्तूंचा तौलनिक अभ्यासहि व्हायचा आहे. तो पुरा झाल्यावर आज आपण जिला कन्नडसंस्कृति म्हणतों, तिचा विस्तार कुठवर होता तें कळून येईल. पण एक गोष्ट खरी—

दक्षिण भारताच्या मध्यभागीं स्थान, भीमा, कृष्णा, तुंगभद्रा इत्यादि सरितांचें सान्निध्य, सह्याद्रि आणि नीलगिरि यांचा भक्कम आधार, भिन्न भिन्न प्रकारचे भूस्तर, अशा अनुकूल परिस्थितीमुळें कर्नाटकांतलें प्राचीन मानव-जीवन समृद्ध आणि प्रगत असावें, अशी कल्पना करतां येते. (राज्यें आणि


साम्राज्यें यांच्या उलाढाली, धार्मिक चळवळी, त्याचप्रमाणें साहित्य कला, शिल्प, अशा अनेक बाबतींत कर्नाटकाला दीर्घकालीन परंपरा लाभली आहे.

संस्कृत साहित्यांत कर्नाटकाचा स्पष्ट निर्देश प्रथम महाभारतांत आढळतो. भीष्मपर्वांत द्रविड, केरळ, कर्नाटक इत्यादि दक्षिण प्रदेशांचीं नांवें आलीं आहेत. त्यांतले वनवासिक म्हणजे आजच्या शिरसी—बनवासीच्या भागांतले लोक असावे. महिष्क म्हणजे म्हैसूर प्रदेशांतले लोक होत. कुंतल हें देश-वाचक नांव कर्नाटकाच्या उत्तर भागाला आणि महाराष्ट्राच्याहि कांहीं प्रदे-शाला मिळून लागू होत होतें असें म्हणतात. तात्पर्य कर्नाटक नांवाचा प्रदेश सनपूर्व तिसऱ्या किंवा दुसऱ्या शतकापासून स्वतंत्र अस्तित्वानें मिरवूं लागला असावा.

चंद्रगुप्त मौर्य हा भद्रबाहु नांवाच्या जैन साधूसह कर्नाटकांत वास्तव्याला आला होता, असें जैन वाङ्मयावरून कळतें. त्याचा काळ सनपूर्व तीनशें वर्षे हा आहे. अशोकाचे शिलालेख, तसेंच टॉलेमी आणि पेरिप्लस यांचे ग्रंथ यांत कर्नाटकाशीं संबद्ध असे पुष्कळ शब्द आढळतात. प्राचीन तमिळ ग्रंथांतहि कन्नड भाषेंतले कांहीं शब्द दिसतात. त्यावरून असें दिसतें, कीं इसवी सना-पूर्वींच कन्नड प्रदेशाचें वेगळें अस्तित्व निर्माण झालें असावें आणि कन्नड भाषेचा उगमहि त्याच काळांत झाला असावा.

'करु' म्हणजे मोठा किंवा उंच आणि 'नाडु' म्हणजे प्रदेश. त्यावरून करुनाडु-कन्नाडु-कन्नड असा तो शब्द व्युत्पादितात. ही व्युत्पत्ति बहुतेक सर्व विद्वानांनीं मान्य केली आहे. मूळ कन्नडिग लोक दोन भिन्न वंशांचे होते. एक वंश द्रविडांचा अन् दुसरा द्रविडपूर्वांचा. नाडवर, बंट, कुरुंब, ओक्लिग हे द्रविड-वंशीय होत. ते शेतकरी अन् पशुपालक होते. आर्यांशीं संबंध येण्यापूर्वींच ते तमिळनाडमधून बाहेर पडून आजच्या कर्नाटकांत आले होते आणि तिथे त्यांनीं आपल्या वसाहती मांडल्या होत्या. सूतकताई, विणकाम, बांधकाम इत्यादि कलांत त्यांनीं बरेंच नैपुण्य मिळवलें होतें. ते नानाप्रकारचीं शस्त्रेंहि बनवीत आणि लढाईला नेहमीं फुरफुरलेले असत. आर्यांशीं संबंध आल्या-नंतर त्यांच्या विकासाचा वेग वाढला. कालांतरानें ते आर्यांच्या वर्णव्यवस्थेंत दाखल होऊन क्षत्रिय बनले. त्यांच्या लढाऊ बाण्यामुळें त्यांना क्षत्रिय बनणें

सोयिस्कर झालें. मात्र त्याच वंशांतल्या बडग, तोड इत्यादि जमाती आर्य-संपर्कात आल्याच नाहींत किंवा त्यांच्या भीतीनें वनांच्या किंवा पहाडांच्या आश्रयाला गेल्या. त्यामुळें त्या जमाती मागसलेल्याच राहिल्या. आजहि त्या तशाच अवस्थेंत आहेत. इरुल, काडुकुरुब, शबर, मातंग, बेड इत्यादि कर्नाटकांतल्या वनवासी टोळ्या द्रविडपूर्व मानववंशाच्या मानल्या जातात. रामायणांत ज्यांना राक्षस म्हटलें, ते लोक हेच असावे.



कर्नाटक विश्वविद्यालय–धारवाड

रामायण काळांत अगस्त्य ऋषीनें विंध्यपर्वत ओलांडून दक्षिणेंत पाऊल ठेवलें. त्यांनीं वाट पाडली, तीच पुढे दक्षिणापथ म्हणून ख्याति पावली. त्यानें दक्षिणेंत अनेक ठिकाणीं आपले आश्रम उभारले. दक्षिणापथाच्या पूर्व अंगानें त्याचा हा प्रवास झाला. रामप्रभु दक्षिणेंत उतरला तो त्यानंतर. म्हणजे क्षत्रियांच्या आधीं ब्राह्मणांनीं दक्षिण भारताची पाऊलवाट निर्माण केली, असें म्हटलें पाहिजे. अगस्त्याच्या लगत्यानें मग अनेक ब्राह्मण आर्यावर्तांतून दक्षिणेंत आले आणि त्यांनीं भिन्न भिन्न ठिकाणीं आश्रमांची स्थापना करून तिथे यज्ञाग्नि प्रज्वलित केला. प्रेमपूर्ण आणि शांतिप्रधान उपदेश अन् प्रचार यांच्या द्वारें त्यांनीं दक्षिणेंत वैदिक धर्माची मुहूर्तमेढ रोवली. क्षत्रिय आले ते त्यांच्यामागून.

### कन्नड जन

'कर्ण' जन हे कर्नाटकांतले पहिले राज्यकर्ते होत. यदु आणि तुर्वश हे वैदिक आर्यजन आहेत. ऋग्वेदांत त्यांचा राम-लक्ष्मणांसारखा जोडीनें उल्लेख

येतो. महाभारतांत त्यांना ययातीचे पुत्र म्हटलें आहे. देवयानीपासून त्यांची उत्पत्ति झाली. ययातीला शुक्राचार्यांच्या शापामुळें अकालीं आलेलें वार्धक्य ते घेईनात, म्हणून ययातीनें त्यांना शापलें. त्या शापामुळें ते पतित झाले आणि त्यांतल्या तुर्वसूची प्रजा दक्षिणेंत येऊन राज्य करूं लागली. मत्स्य-पुराणांत तुर्वसुवंशाच्या दक्षिणेंतील कांहीं घराण्यांचा उल्लेख येतो, त्यांत चोल, पांड्य, यांच्याबरोबर 'कर्ण' जनांचाहि निर्देश आहे. मनूनें झल्लोमल्लांच्या बरोबर 'नट' आणि 'करण' या व्रात्यक्षत्रियांचाहि नामनिर्देश केला आहे. हे नट आणि करण हेच आजच्या कन्नडिगांचे पूर्वज होत, असें राजवाडेहि सांगतात. 'कर्ण' चाच अपभ्रंश 'कण्ण' असा झाला आहे. 'कर्ण' शब्द जनवाचक असून त्या नांवाचे लोक प्राचीन काळीं कर्नाटकांत होते, असें श्री. शं. बा. जोशी सांगतात आणि ते तुर्वसुवंशीय असल्याचा निर्वाळा देतात.

दक्षिणेंत उतरल्यावर आर्यांची पहिल्याप्रथम गांठ पडली ती कन्नडिगांशीं. आर्य लोक त्यांच्यापेक्षा अधिक बुद्धिमान्, अधिक सुसंस्कृत आणि अधिक साधनसंपन्न होते. त्यामुळें त्यांच्या संपर्कांत आल्यावर कळत न कळत कन्नडिगांनीं त्यांच्या संस्कृतीचा स्वीकार केला. कन्नड भाषेवर संस्कृताचा जो प्रभाव आहे, त्यावरूनहि ही गोष्ट सिद्ध होते. मात्र हा संस्कृतिस्वीकार केवळ एकतर्फीच झाला नाहीं. आर्यांनींहि त्यांच्या सहवासांत मूळ द्राविड संस्कृतींतल्या कांहीं गोष्टी स्वीकारल्या. ही देवाण-घेवाण हळू हळू झाली असेल; पण ती उभयपक्षीं आपखुषीनें झाली, प्रेमानें झाली. आर्यांचा धर्म यज्ञप्रधान होता, तर द्रविडांचा पूजाप्रधान होता. द्रविड लोक शिवपूजक होते, तसेच मारीच्या स्वरूपांत शक्तीलाहि भजणारे होते. आर्यांनी दक्षिणेंत यज्ञसंस्था रुजवली आणि दाक्षिणात्यांकडून शिव-शक्तींची पूजा स्वतः स्वीकारली. अर्थात् या गोष्टीला कारणहि तसेंच नाजूक पण बलवत्तर घडलें असावें.

नव्या वसाहतींचे अग्रदूत झालेले आर्य ब्राह्मण संख्येनें अल्प होते. तेव्हां त्यांना आपल्या वंशविस्तारासाठीं द्रविडांच्या मुली धर्मपत्नी म्हणून घरांत आणाव्या लागल्या. त्या कांहीं साडीचोळीचें गांठोडेंच घेऊन सासरीं नांदा-यला आल्या नाहींत, तर त्याबरोबरच त्यांनीं आपल्या माहेरच्या देवदेवताहि काखोटीस मारून आणल्या. आर्य ब्राह्मण यज्ञकुंड प्रज्वलित करून वैदिक

देवतांना समंत्रक आहुती देत असतां, त्याच वेळीं रानावनात जाऊन त्यांच्या बायका शिवलिंगाची पूजा करूं लागल्या. कट्टर वैदिकधर्मी ब्राह्मण-ऋषींना आपल्या अर्धांगींचा हा अधर्म रुचावा कसा ? त्यांनीं त्यांना खूप विरोध केला. अखेर शेवटीं शिवाला म्हणजे आपल्या बायकांच्या उपास्य देवतेला त्यांनी कडाडून शापहि दिला. पण त्याचाहि उपयोग झाला नाहीं. इतके दिवस शिव रानावनांत किंवा डोंगरपठारावर होता, त्याला आतां त्या ऋषिमुनींना घरांत घ्यावें लागलें. शिवाबरोबर त्याच्या परिवारालाहि आजूबाजूला जागा द्यावी लागली. ज्या लिंगपूजेला इतके दिवस नष्ट अन् भ्रष्ट मानलें, त्याच शिवलिंगावर अस्सल वेदांतला रुद्राध्याय म्हणून अभिषेकाची संततधार धरावी लागली. अशा प्रकारच्या कथा वामन, कूर्म, शिव, इत्यादि पुराणांत पुराणकारांनीं नमूद करून ठेवलेल्या आहेत. तात्पर्य आर्यपातिकुलांत येऊनहि द्राविड वधू आपल्या पितृकुलांतल्या देवतांना घट्ट धरून राहिल्या आणि पुढे त्यांनीं त्यांना आर्यधर्मांतच दाखल करून घेतलें. हा नारीजातीचा विजय होय !

आपल्या कर्मकांडांत अशा कितीतरी उपासना आहेत, कीं ज्यांचें मूळ यज्ञधर्मांत सांपडत नसूनहि आज शतसहस्र वर्षें त्यांना धर्म म्हणून मान्यता मिळाली आहे. हें द्रविडांच्या संस्कृतिसंगमाचें फळ आहे, हें विसरून चालणार नाहीं.

आर्यांच्या संपर्कामुळें कन्नडिगांवरहि एक महत्त्वाचा मूलगामी परिणाम झाला आहे, असें प्रा. मुगळी सांगतात. त्याकाळीं केरळाप्रमाणेंच कन्नड जनांतहि मातृसत्ताक कुटुंबपद्धति होती. आर्य हे पितृसत्ताक कुटुंबपद्धतीचे पुरस्कर्ते. त्यांचें पाहून कन्नडिगांनींहि हळूहळू आपली मूळची कुटुंबव्यवस्था टाकून देऊन तेहि पितृसत्ताक समाजव्यवस्थेंत दाखल झाले. जे कन्नडजन आर्यसंपर्कांत आले नाहींत, ते आपल्या मूळ पद्धतीला चिकटून राहिले. आज मितीसहि कर्नाटकांतल्या कांहीं वन्य जमाती मातृसत्ताक कुटुंबव्यवस्थेंतच वागतत.

महाराष्ट्र आणि कर्नाटक हे दोघे जुळे भाऊ आहेत, असें शं. बा. जोशी म्हणतात. जुळे असोत, सहोदर असोत; पण ते भाऊ भाऊ आहेत, हें

कोणीहि खुषीनें मान्य करील. जसे भाऊ आहेत, तसेच ते 'शिमशेजारी'हि आहेत. ते एकमेकांना लागून आहेत, खेटून आहेत. महाराष्ट्र अन् कर्नाटक यांची जवळीक ऐतिहासिक आहे, तशीच परंपरागतहि आहे. इतिहासांतल्या अनेक समरप्रसंगांत ते एका रणांगणावर एकोप्यानें उभे राहिले आहेत. ते दोघे एकदिलानें इंग्रजी राजवटीविरुद्धच झगडले असें नाहीं, तर तत्पूर्वी मुसलमानी सत्तेविरुद्धहि झगडले आहेत. महाराष्ट्राचा कांहीं भाग आणि कर्नाटकाचा काही भाग, हे तर सातवाहनांपासून तों शिवछत्रपतींपर्यंत कित्येक शतकें एका राज्यछत्राखालीं नांदले आहेत.



कर्नाटकाचा शतायुषी भाग्यवंत
श्री. मोक्षगुडम् विश्वेश्वरय्या

## सांस्कृतिक साधर्म्य

पंढरीचा विठोबा हा उभयांचा उपास्य देव आहे. किंबहुना विठ्ठल हा 'कानडा' आहे, हें महाराष्ट्रसंतांनीं निःसंकोचपणें सांगून ठेवलें आहे. पंढरपूरचें विठ्ठलमंदिरहि एका कन्नड राजानेंच बांधलें आहे, असें इतिहासज्ञ श्री. ग. ह. खरे हे सांगतात. होयसळ विष्णुवर्धन हें त्या राजाचें नांव. त्याचें दुसरें नांव 'बिट्टिदेव' असें होतें. पांडुरंग 'विठ्ठल' बनला तो त्याच्या नांवावरूनच असावा, असा संशोधकांचा तर्क आहे. विष्णुवर्धनानें मंदिर उभारलें, तर त्याच्या वंशजांनीं त्याला मोठें उत्पन्न लावून दिलें. कर्नाटकांतले रामानुजी वैष्णव आणि माध्व विठ्ठलाला परम उपास्य म्हणून भजतात. आजहि आषाढी–कार्तिकीच्या वाऱ्यांना मराठी आणि कन्नड अशा दोन्ही विठ्ठलभक्तांची मांदियाळी त्या भूवैकुंठांत एकत्र जमते, मिसळते. तेव्हां या विठ्ठलाच्या अंगानेंहि महाराष्ट्र अन् कर्नाटक हे दोघे एकाच देवाचीं संतानें आहेत.

जेजुरीचा खंडोबा हाहि महाराष्ट्रीय जनतेप्रमाणेंच अनेक कन्नड घराण्यांचाहि कुलदेव आहे. त्याच्याहि जत्रेला उभयभाषिकांची मंडपघसणी होते. एल्लम्म ही कर्नाटकाची भूदेवता. तिचा डोंगर आहे कर्नाटकांत सौंदत्तीजवळ; पण मराठी जनता तिच्या दर्शनाला आणि तिचे नवस फेडायला कन्नडिगांच्याच भावभक्तीनें तिथे धांवत जाते.

तमिळनाड किंवा केरळ सोडून कर्नाटकांत विशेषतः उत्तर कर्नाटकांत आल्यावर मराठी माणसाला घरीं पोंचल्यासारखें वाटतें. धारवाड, हुबळी, विजापूर, या शहरांतून मराठीशिवाय अन्य भाषा न येणाऱ्या माणसाला विशेषशी अडचण भासणार नाहीं. त्या भागांतले लोक लिंगविपर्यास करून कां होईना; पण मराठी मोडकेंतोडकें बोलतात, निदान समजतात. मराठी माणूस गव्हाळी वर्णावर असतो, तर कर्नाटकी जरा कृष्णवर्णाकडे अधिक झुकतो. अर्थात् हें विधानहि कांटेकोरपणें घ्यायचें नाहीं. विशिष्ट पद्धतीनें डोक्याला रुमाल बांधणें ही पद्धत म्हैसुरी कर्नाटकी लोक सोडल्यास दोहींकडे सारखीच आहे. तिथल्या शेतकरी बायका नऊवारी इरकली लुगडें विकच्छ नेसतात आणि नीविग्रंथि दृढ राहावी म्हणून वर चांदीचा कमरपट्टा घालतात, हें मराठी कृषक स्त्रियांहून वेगळेंपण !

वार्षिक सण आणि उत्सव जे महाराष्ट्राचे, तेच कर्नाटकाचेहि आहेत. फरक असेल तर तो कांहीं तपशिलांत. आपण नवरात्र म्हणतों, तर ते ‘ नाडहब्ब ’ म्हणतात. दसऱ्याची मिरवणूक जशी मराठी संस्थानांतून निघते, तशीच ती म्हैसूरनगरांतूनहि निघते. म्हैसूरचा दसरा तर जगप्रसिद्ध आहे. तो डोळे दिपवणारा वैभवशाली समारंभ पाहण्यासाटीं भारतांतल्या सर्व भागांतून हौशी रसिक कर्नाटकाचे प्रवासी होतात. श्रावणांतला शुक्रवार हा दोन्हीकडे संपत् शुक्रवार म्हणजे ‘ लक्ष्मीचा वार ’ समजला जातो. त्या दिवशीं सवाष्णीला न्हाऊंजेऊं घालणें हें दोहींकडे समान आहे. फरक एवढाच, कीं श्रावणांतल्या दुसऱ्या शुक्रवारीं कर्नाटकांत ‘ वरमा लक्ष्मी ’चें व्रत अत्यंत श्रद्धेनें आणि सणाप्रमाणें साजरें होतें. त्या दिवशीं सार्वजनिक सुट्टीहि दिली जाते. हें व्रत माध्वसंप्रदायांतून निघालें आणि पुढे सार्वजनिक बनलें. नागपंचमीला झोपाळे बांधणें, माहेरवाशीण घरीं आणणें, हें दोन्हीकडे सारखेंच. कर्नाटकाचें त्या दिवसाचें वेगळेंपण म्हणजे तंबिटाचे लाडू. तंबीट म्हणजे तांदुळांचें पीठ. एक

अनुक्रम ............ दि: ............
क्रमांक ............ नों. दि: ............

वेळ दिवाळीला विशेष कांहीं झालें नाही तरी चालेल; पण नागपंचमीला तंबिटाबरोबरच फराळाचे सगळे पदार्थ व्हायलाच हवे.

महाराष्ट्र हाच एकटा बजरंगबलीचा उपासक असें समजायचें कारण नाहीं. कर्नाटकांतहि त्याचें मोठें प्रस्थ आहे आणि तेंहि माध्व संप्रदायाच्या द्वारें निर्माण झालें आहे. त्या संप्रदायांत श्रीहरीच्या खालोखाल वायूचा अधिकार मानला जातो. ‘ हरि सर्वोत्तम, वायु जीवोत्तम, ’ असा त्यांचा वाक्प्रचारच आहे. अर्थात् पांडवांतला भीम आणि अंजनीचा पुत्र हे वायूचे अंशावतार असल्यामुळें माध्वांना सेव्य बनले आहेत. कर्नाटकात भीमराव भीमप्पा, हणमंता, हीं व्यक्तिनामें विशेषत्वानें आढळतात, त्याचें कारण हें.

महाराष्ट्र अन् कर्नाटक यांच्या व्रतकथा सामान्यत्वें एकच आहेत. आमच्या बायका जी कहाणी आदित्य राणूबाईची म्हणून सांगतील, तीच कन्नड पुरंध्री ज्येष्ठा लक्ष्मीची म्हणून सांगतील. नांव वेगळें; पण तपशील तोच. आणखी एक सामान्य गोड साधर्म्य सांगायचें तर पुरणपोळी हें खास कन्नड-मराठी पक्वान्न आहे. रेशमासारखी मऊ, खमंग अन् पूर्णचंद्रासारखी तवाभर पुरणपोळी याच दोन प्रदेशांत मुखीं लागेल. अन्यत्रहि त्या जातीचे कांहीं तरी पदार्थ बनत असतील, पण ते या पुरणपोळीच्या विकृति होत असें समजावें. देवकृत्याला किंवा कुळधर्माला ‘ पुरणावरणाचा नैवेद्य ’ ही भाषा याच दोन्हीं प्रांतांत बोलली जाते आणि लक्ष्मीला पुरणाचे दिवे लागतात तेहि याच दोन्ही प्रांतांत. शोधायला गेलें, तर अशीं आणखी किती तरी सादृश्यें अन् साधर्म्यें सांपडतील.

मराठी आणि कन्नड या दोन्ही भाषा जवळिकेनें विकास पावल्या आहेत. मराठी कवींची कन्नड ग्रंथरचना अन् कन्नड लेखकांचा मराठी ग्रंथव्यवहार या दोन्ही गोष्टी पुरातन काळापासून चालत आल्या आहेत. मराठीपेक्षां कन्नड कांहीं शतकांनीं वडील आहे. तिचे कांहीं शब्द मराठींत सहजपणें मिसळून गेले आहेत. ज्ञानेश्वरीसारख्या मराठी ग्रंथांतली कन्नड शब्दसंपत्ति संशोधकांनीं निवडून काढली आहे. ‘ भांगार, ‘ हरिमेखळे ’ ‘ सान ’ अशीं कांहीं सुंदर शब्दरत्नें ज्ञानेश्वरांनीं कन्नड भाषेच्या भांडारांतून उचलून आणलीं आहेत. लोकव्यवहारांतहि कन्नड शब्दांचा पायरव आहेच. आपण

वैदिक ' घृत ' किंवा ' आज्य ' खात नसून कानडी ' तुप्प ' खातों. सुपारी फोडणाऱ्या हत्याराला आपण ' अडकित्ता ' म्हणतों तें कानडीवरूनच. त्या भाषेंत सुपारीला ' अडकी ' असें नांव आहे. ' कोलदांडा ' यांतला कोल म्हणजे दांडा आणि दांडा म्हणजेहि दांडाच. पण तो ' कोल ' शब्द आहे कन्नडचा. ' अडगुळं मडगुळं ' या बालगीताचा अर्थ जाणून घ्यायला एखाद्या कन्नड माउलीचीच मदत घ्यायला हवी. मात्र ही ग्रहणप्रक्रिया एकतर्फीच नाहीं. मराठींतले संख्यावाचक शब्द कन्नड बोलीनेंहि स्वीकारलेले आहेत. 'बाहात्तर-नियोग ' ' तेहतीस कोटी ' ' एक्कसर ' असे शब्द कर्नाटकांत कानीं पडतात, असें श्री. श. बा. जोशी यांनीं सांगितलें आहे. मराठींत कानडीची जुनीं रूपें आणि कानडींत मराठीचीं प्राथमिक रूपें निश्चितपणें आढळतात, असा अन्य कांहीं भाषासंशोधकांचा निर्वाळाहि तेच सांगतात.


या सर्व गोष्टी लक्षांत घेतां ऐतिहासिक काळांत कन्नड-मराठीचे संबंध कसे स्नेह-सौहार्दाचे होते तें कळून येतें. पण चालू घडीला कोणतें दृश्य दिसतें ? मी वर एका ठिकाणीं कर्नाटकाला महाराष्ट्राचा ' शिमशेजारी ' म्हटलें आहे, तें दोन्ही अर्थांनीं. शेजाऱ्यांत शिमशेजारी अधिक जवळचा. कारण त्यांच्या घराच्या पागोळ्या एकमेकांना लागून असतात. शेजारधर्म उत्तम चालला, तर त्यांच्यासारखे सुखी दुसरे कोणी नसतात आणि शेताला शेत लागून असलें कीं, भांडणें व्हायचीं तीं बहुधा सीमेवरूनच होतात.

### शिमशेजारी

आणि आज त्याच एका अटीतटीच्या अवस्थेंतून आपण दोघे जात आहों. गेलीं कांहीं वर्षें हें भांडण चालू आहे. महाराष्ट्राचें जें वाजवी आणि न्याय्य आहे, तें महाराष्ट्राला मिळालेंच पाहिजे, महाराष्ट्राचा एक सलग अन् बहु-संख्य मराठी भाषिकांचा भूभाग कर्नाटक पोटाळून बसला आहे, तो महा-राष्ट्रांत परत आलाच पाहिजे, ही मराठी लोकांची मागणी आहे. पण कर्नाटकाकडून अद्यापि तिला योग्य तो प्रतिसाद मिळत नाहीं. मराठी मनाचें हें एक मर्मस्पर्शी दुःख आहे. एकभाषी सलग भूभागांतल्या लोकांनीं एक प्रदेश, एक राज्य बनावें, ही योजना आपण मान्य केली, ती राज्याराज्यांत भेद वाढवण्यासाठीं नसून सर्वांना विकासाची समान संधि मिळावी या

सद्धेतूनें केलेली आहे. भाषा आणि ऐतिहासिक अन् सामाजिक परंपरा हें संस्कृतीचें एक व्यावर्तक लक्षण आहे. कर्नाटकांतला एक मोठा वर्ग जर आपली परंपरा पुरंदर-कनकदास, विद्यारण्य, अन् हक्क-बुक्क यांची न सांगतां शिवाजी-रामदास आणि ज्ञानबा-तुकाराम यांची सांगत असेल, तर कर्नाटकानें त्याच्या त्या मार्गांतली भिंत होऊं नये. आपल्या भाषाबांधवांशीं समरस होण्यासाठीं त्याला राजीखुषीनें मार्ग मोकळा करून द्यावा. विवेकशील कन्नड जनतेला तसें वाटत असेलहि! पण एखाद्या प्रश्नांत जेव्हां सत्तास्पर्धेचें राजकारण शिरतें, तेव्हां सोपे प्रश्नहि बिकट होतात. सहज सुटूं शकणारी सुरगांठ निरगांठ होऊन बसते. त्या प्रश्नाला नको असलेलें भलतेंच वळण लागतें. खरें बोलायचें, तर सत्तेची राजगादी ही असले प्रश्न सोडविण्याची जागाच नव्हे. त्यांचा निवाडा धर्मसिंहासनावरूनच व्हायला हवा!






कर्नाटकाचा ज्ञात इतिहास चंद्रगुप्त मौर्यापासून सुरू होतो. हा मौर्य कर्नाटकांत आला तो विजिगीषु सम्राट् म्हणून नव्हे; तर भद्रबाहु या जैन यतीचा वीतराग शिष्य म्हणून. श्रवण बेळगोळ इथें त्यानें एकांतसाधना करीत आपलें उर्वरित आयुष्य कृतार्थ केलें. त्यानंतरचा सम्राट् म्हणजे सुप्रसिद्ध अशोक. त्याचें राज्य पांड्यांच्या सीमेला जाऊन भिडलें होतें, असें म्हणतात. म्हणजे कर्नाटकावरहि त्यांचा अंमल बसला होता. अशोकाचे शिलालेख कर्नाटकांत अनेक ठिकाणी लांपडले आहेत. ते मुख्यतः धर्माला अनुलक्षूनच आहेत. पण त्या लेखांतली भाषा ही सत्ताधीशाची भाषा नाहीं. ती भाषा तळमळीच्या धर्मप्रचारकाची आहे. त्या शिलालेखांवरून असें वाटतें, कीं अशोकाच्या काळीं कर्नाटकांत जी छोटीं छोटीं अनेक राज्यें होतीं त्यांचे व अशोकाचे संबंध जेता व जित या स्वरूपाचे नसून स्नेहभावाचे असावे.

त्यावेळचीं कर्नाटकांतलीं राज्यें म्हणजे रिष्टिक, पेत्तनिक, वनवासी, महिषमंडल इत्यादि होत. रिष्टिक किंवा राष्ट्रिक हा नाडवर या कन्नड शब्दाचा संस्कृत प्रतिशब्द असावा. हे राष्ट्रिक म्हणजे रट्ट लोकांचे पूर्वज. त्यांनींच पुढें राष्ट्रकूट या नांवानें कर्नाटकावर स्वामित्व गाजवलें. पेत्तनिकांना प्रतिष्ठानक असेंहि म्हणत. ते लोक सातवाहन वंशाचे पूर्वजहि असूं शकतील. त्यांची राजधानी प्रतिष्ठान म्हणजे गोदावरीच्या तीरावरचें पैठण ही होती. महाराष्ट्राप्रमाणेंच कर्नाटकावरहि त्यांनीं साम्राज्य स्थापलें.

सातवाहनांची सत्ता सनपूर्व तिसऱ्या शतकापासून तों इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापर्यंत म्हणजे सुमारें चारशें-साडेचारशें वर्षें चालली. पुराणांत

आंध्र किंवा आंध्रभृत्य या नांवानें उल्लेखिलेले राजे म्हणजेच हे सातवाहन होत. यांना आंध्रभृत्य म्हणायचें कारण असें असूं शकेल, कीं ज्यावेळीं या राजांची नामावळी तयार झाली, त्यावेळीं सातवाहन वंशाचे पूर्वज आंध्रांच्या चाकरीला असावे. या सातवाहन वंशाच्या साडेचारशें वर्षांच्या कालखंडांत एकूण राजे तीस झाले, असें पुराणांतरीं उल्लेख आढळतात. पण त्याजच्या उपलब्ध ऐतिहासिक माहितीशीं ही पौराणिक राजपरंपरा संगतवार जुळत नाहीं.

## सातवाहन राजे

इसवी सनाच्या पहिल्या शतकापासून सातवाहन, कर्नाटकाचे स्वामी झालेले दिसतात. त्यांचें साम्राज्य नर्मदा-गोदावरीपासून कृष्णा-तुंगभद्रेपर्यंत पसरलें होतें. त्याच्याहि खाली दक्षिणेंत म्हणजे, आजच्या म्हैसूर प्रदेशावरहि त्यांचीच सत्ता चालत असावी. कर्नाटकांत या सातवाहनांचेहि कांही शिलालेख सांपडले आहेत. त्यांचीं पुष्कळ नाणींहि गवसलीं आहेत. चंद्रवल्लीच्या उत्खननांतहि सातवाहनांशीं संबंधित अशा अनेक वस्तू मिळाल्या आहेत. कुंतल नांवाचा त्या काळीं कर्नाटकचा एक भाग होता, त्यावर सातवाहनांचें विशेष प्रेम असावें. कारण अनेक सातवाहन राजे स्वतःला ‘ कुंतलस्वामी ’ ही उपाधि लावून घेत. एका लेखांत बळ्ळारि प्रांत म्हणजेच अडोनीभोंवतालचा प्रदेश याला ‘ सातहनी आहार ’ म्हणजे सातवाहनांची मूलभूमि म्हटलें आहे.

या राजवंशांत हाल सातवाहन, गौतमीपुत्र शातकर्णी, पुलुमाई, इत्यादि कांहीं सातवाहन राजे सुविख्यात होऊन गेले. सुप्रसिद्ध गाथासप्तशती हा प्राकृत ग्रंथ हालाच्याच कारकीर्दींतला आहे. तिला हालाची सप्तशती असेंहि म्हणतात. गौतमीपुत्र शातकर्णी या सातवाहन राजाबद्दल नाशिकच्या लेण्यांतील एका शिलालेखांत पुढीलप्रमाणें गौरवोल्लेख आहे—

“ गौतमीपुत्र राजांचा राजा आहे. त्याचीं जनावरें तीन समुद्रांचें पाणी प्यालेलीं आहेत. तो शरणागतांचा आश्रयदाता, प्रजेचीं सुखदुःखें हीं स्वतःचींच सुखदुःखें मानणारा आणि धर्म—अर्थ—काम या तीन्ही पुरुषार्थांना समान लेखणारा आहे. ”

याचाच सुपुत्र पुलुमाई. पैठणवर स्वारी करून आलेल्या विक्रमादित्याचा पराभव करून त्याला नर्मदेच्या पार पिटाळणारा आणि स्वतःच्या नांवाचा शालिवाहन शक सुरू करणारा शालिवाहन राजा म्हणजे हा पुलुमाईच असावा असें म्हणतात. त्यानेंच जयदामन आणि रुद्रदामन या शकराजांना रणांगणांत लोळवून महाराष्ट्र देश शकांच्या अमलांतून मुक्त केला. असें हें सातवाहन घराणें महाराष्ट्र आणि कर्नाटक यांना एकत्र नांदवणारें पहिलें राजघराणें होय.

त्या काळांत आजच्या बनवासी प्रदेशावर चुट्ट नांवाच्या एका घराण्याचें राज्य होतें. चुट्ट म्हणजे छोटे किंवा कनिष्ठ. हे मानव्य गोत्री, हारीतिपुत्र ब्राह्मण सातवाहनांचे मांडलिक होते आणि नातेवाइकहि होते. सातवाहन साम्राज्याचा दक्षिण विभाग संभाळण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. पुढें सातवाहनांच्या सत्तेला उतरती कळा लागली आणि हें चुट्ट घराणें धिटाई करून स्वतंत्र झालें. त्यानें सुमारें दीडशें वर्षे त्या भागावर स्वतःचें राज्य केलें. नंतर त्याचीहि सद्दी संपली आणि त्या जागीं कदंबकुल पुढें आलें. कदंबहि चुट्टकुलाचीच एक शाखा होती. अर्थात् कदंब हेहि ब्राह्मणच होते, हें सांगायला नको.

### कदंब राजकुल

कदंबकुलाबद्दल अनेक दंतकथा कर्णोपकर्णी प्रसृत आहेत. एक कोणी तरी टाकलेलें पोर वनवासीच्या एका नागरिकाला कदंबाच्या झाडाखालीं सांपडलें आणि कदंब या नांवानेंच त्या नागरिकानें तें पोर आपल्या घरीं वाढवलें, ही एक दंतकथा. या राजाच्या कुळघरांत कदंबाचें झाड होतें म्हणून लोक त्यांना कदंब म्हणूं लागले हा तिचा दुसरा पर्याय. कदंबांचें राज्य स्थापणारा पहिला पुरुष म्हणजे मयूरशर्मा. जातीचा ब्राह्मण; तेव्हां वेद-शास्त्राध्ययन करण्यासाठीं तो तरुणपणीं कांची नगरींत गेला होता. कांची ही पल्लवांची राजधानी. ती त्या काळांत एक विद्यापीठ म्हणून गाजत होती. पण तिथल्या एका शिलेदारानें ‘ बामणाचा पोरगा ’ म्हणून या मयूरशर्म्यांचा सहजपणें उपहास केला आणि त्याच्या तिळीं थेंब पडला. ते बोल मयूर-

शर्म्याच्या आंतड्याला झोंबले. तो म्हणाला, “ असं काय ! आजपासून ‘ इदं ब्राह्मम् ’ सोडलं. यापुढें ‘ इदं क्षात्रम् ’ची आराधना ! ”


आणि तो संहितेची पोथी बांधून धनुर्वेदाकडे वळला. त्यानें शस्त्रविद्येंत उत्तम प्रावीण्य मिळविलें. एक वेदशास्त्रपारंगत म्हणून नव्हे; तर पट्टीचा शस्त्रविद्यानिपुण म्हणून तो आपल्या मायदेशीं परत आला आणि अनुकूल संधि मिळतांच राजा म्हणून पुढें झाला. इसवी सनाच्या पांचव्या शतकांत या कदंबकुलाच्या तीन शाखा तीन ठिकाणीं राजधान्या स्थापून राज्य करूं लागल्या. त्यांतली एक शाखा गोमंतकाकडे वळली आणि तिथें आपली सत्ता स्थापून बसली. तिचा संस्थापक कंटकाचार्य हा पहिला कदंब होय. कदंबांची गोव्यांतली पहिली राजधानी चंद्रपूर ( चांदोर ) ही होती. याच घराण्यांत जन्मलेल्या पहिल्या जयकेशीनें अकराव्या शतकाच्या उत्तरार्धांत पश्चिम समुद्राच्या किनाऱ्यावर ‘ गोपकपट्टण ’ हें नवें शहर आणि बंदर स्थापन केलें आणि आपली राजधानी चंद्रपुराहून तिथें नेली. आज पणजी या गोव्याच्या राजधानीजवळ ‘ जुनें गोवें ’ नांवाचें जें उद्ध्वस्त नगर आहे, तेंच पूर्वीचें गोपकपट्टण होय. याच्याच कारकीर्दींत गोव्याची आणि कदंब वंशाचीहि भरभराट झाली. कदंब त्याहिपुढें अधिक हातपाय पसरून कोंकणांत स्थायिक झाले.

## चालुक्य राजे

पण हा सगळा कारभार कदंबवृक्षाच्या शाखाविस्ताराचा आहे. कदंबांची मूलसत्ता इसवी सनाच्या सहाव्या शतकांतच चालुक्यांच्या घराण्याकडे गेली, हें सांगितलें पाहिजे. चालुक्य हें कदंबांचें मांडलिक घराणें. तेंहि मानव्यगोत्री ब्राह्मणच असल्यामुळें चालुक्यहि कदंबांच्या वंशाचेच असावे, असें म्हणतात. या घराण्यांत जन्मलेल्या पुलिकेशी नांवाच्या पुरुषानें कदंबांना मागें रेटून कर्नाटकावर आपली सत्ता स्थापन केली. बदामी ही कदंबांची मूळ राजधानी तीच त्यांनीं आपलीहि राजधानी केली. या चालुक्यांच्या उगमा-

विषयींहि दंतकथा आहेच. बिल्हणानें आपल्या विक्रमांकदेवचरित या ग्रंथांत ती दिली आहे—

ब्रह्मदेवाची प्रातःसंध्या चालली होती. त्यानें सूर्याला देण्यासाठीं ओंजळींत अर्घ्य घेतलें होतें. त्याच वेळीं नेमका इंद्र तिथें आला. त्यानें विधात्याला गाऱ्हाणें सांगितलें, कीं ' सांप्रत सर्व जग पापमय बनलें आहे. कोणी यज्ञयाग करीत नाहीं, कीं देवांना हविर्भाग देत नाहीं. त्यामुळें स्वर्गांतलें देवराज्य हादरलें आहे.' तें ऐकून ब्रह्मदेवाला खेद वाटला. त्यानें ओंजळींतल्या चुलुकाकडे म्हणजे चुळकाभर पाण्याकडे निराळ्या अभिप्रायानें पाहिलें आणि तत्क्षणींच त्यांतून एक धीर, वीर पुरुष निर्माण झाला. चुलुकांतून निघाला म्हणून तो ' चालुक्य ' ठरला. तोच त्या वंशाचा मूळ पुरुष झाला. त्यानें अयोध्येंत आपलें राज्य स्थापलें. कालांतरानें त्या घराण्याची एक शाखा दक्षिणेंत आली आणि तिनें कर्नाटक व कोंकण यांवर आपली सत्ता स्थापून नांवलौकिक मिळविला.



चालुक्यांचें उपास्य चिन्ह – वराह

दक्षिणेंतल्या या चालुक्यांना साक्षात् नारायणाकडून वराहचिन्हांकित ध्वज मिळाला होता, अशी आख्यायिका आहे. चालुक्यांनीं त्या ध्वजाखालीं उभें राहून एकाहून एक वरचढ पराक्रम केले. अनेक राजांना रणांगणांत खडे चारून आपलें राज्य विस्तृत केलें. कार्तिकेय हा त्यांचा उपास्य देव होता आणि सप्त मातृका या संरक्षक देवता होत्या.

चालुक्य घराण्याचा दक्षिणेंत उत्कर्ष करणारा पहिला पुरुष पुलिकेशी हा होय. यानें स्वतःला ' सत्याश्रय ' असें बिरुद लावून घेतलें होतें. हें बिरुद त्या घराण्यांतल्या पुढच्या नरपतींनींहि सोडलें नाहीं. पुलिकेशीनें अश्वमेध

केला. त्याचा यज्ञाश्व अनेक राजांच्या राज्यांतून थय्थय् नाचत गेला. वातापिपूर् म्हणजेच आजची बदामी, हीच त्यानेंहि आपली राजधानी बनवली. आज दिसतो तो बदामीचा किल्लाहि त्यानेंच बांधला. ऐहिक व पारलौकिक कर्तव्यें यथायोग्य बजावणारा म्हणून सत्याश्रय पुलिकेशीची ख्याति झाली.

त्याचा नातू तो दुसरा पुलिकेशी. तो आज्यापेक्षांहि सवाई कर्तबगार निघाला. उभ्या दक्षिणेंत त्यानें आपलें साम्राज्य निर्मिलें. विंध्य ते कावेरी आणि पूर्व समुद्र ते पश्चिम समुद्र, या त्याच्या राज्याच्या चतुःसीमा बनल्या. कालिदासाच्याच शब्दांत सांगायचें तर तो 'आसमुद्रक्षितीश' झाला. इतकेंच नव्हे; तर त्यानें कनोजपर्यंत स्वारी करून हर्षवर्धनाचाहि पराभव केला! एवढें शतकृत्य केल्यावर त्याला घराण्याची 'सत्याश्रय' ही पदवी तोकडी वाटूं लागली. तो स्वतःला 'परमेश्वर' म्हणवूं लागला. चिनी प्रवासी युवान च्वांग यानें त्याचें वर्णन करतांना म्हटलें आहे, कीं 'पुलिकेशीची कल्पना अफाट होती आणि दातृत्वहि अमाप होतें.'

चालुक्यांच्या अशा सत्तावैभवाच्या काळांतच कांचीचा पल्लववंशी राजा नरसिंहवर्मन् हा बळ बांधून त्यांच्यावर चालून आला. त्यानें चालुक्यांना कांहीं ठिकाणीं मागें रेटून कर्नाटकाचा कांहीं भाग तर बळकावलाच; शिवाय त्यांची राजधानी बदामी हिच्यावरहि आपला कबजा केला. चालुक्यसत्ता या अकल्पित घणाघातानें हादरली. पण अजून त्या घराण्याची सद्दी संपली नव्हती. त्यामुळें त्याच घराण्यांत जन्म घेतलेल्या विक्रमादित्य (दुसरा) यानें आपल्या पराभवाचें सव्याज उट्टें फेडून घेतलें. त्यानें पल्लव नरेशाला तर पाणी पाजलेंच; शिवाय खुद्द त्याच्या राजधानींत—कांची नगरींत घुसून तीहि जिंकून घेतली. विक्रमादित्याच्या या विजयाचें स्मारक म्हणून त्याच्या राणीनें बांधलेलें पट्टदकलचें एक देवालय आजहि त्या इतिहासाच्या स्मृतीची साक्ष पुरवीत उभें आहे.

पण आतां चालुक्यांचें नष्टचर्यच उभें झालें होतें. कारण पल्लवांचा बंदोबस्त झाला, तर राष्ट्रकूटांनीं त्यांच्या विरुद्ध उठावणी केली. इ. स. ७५३ च्या सुमारास दन्तिदुर्ग या राष्ट्रकूट राजानें चालुक्यांचा पराभव करून कर्नाटक आपल्या सत्तेखालीं आणला. राष्ट्रकूटांची कर्नाटकावरील सत्ता

दहाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत चाललेली दिसते. चालुक्यांना त्यांचें वर्चस्व मान्य करून खालच्या मानेनें दिवस काढावे लागले. त्या काळांत चालुक्य घराण्याच्या कांहीं शाखा वेगवेगळ्या ठिकाणीं राष्ट्रकूटांच्या आधिपत्याखालीं मांडलिक या नात्यानें राज्यें चालवीत होत्या. पण आपल्या पराभवाचें सळ त्यांच्या हृदयांत सलत राहिलें होतें. त्यांच्यापैकीं तैल (दुसरा) नांवाचा एक पुरुष होता, तो तर अंतरांत सारखा जळत होता. त्यानें संधि साधून पुन्हा बळ बांधलें. संघटित उठावणी करून त्यानें राष्ट्रकूटांना असा कांहीं तडाखा दिला, कीं त्यांत त्यांची सत्ताच उखडून गेली. मान्यखेट ही राष्ट्रकूटांची राजधानी होती, तीहि तैलाच्या कब्ज्यांत आली. पण त्यानें आपली राजधानी मात्र तिथून हालवली अन् ती कल्याण नगरांत आणली.

या नवीन चालुक्यांपैकीं विक्रमादित्य ( सहावा ) हा अत्यंत महत्त्वाकांक्षी निघाला. महत्त्वाकांक्षेच्या जोडीला त्याचा पराक्रमहि तितकाच जबर होता. त्यानें रामप्रभूचा आदर्श डोळ्यांपुढें ठेऊन लंकेवरहि स्वारी केली. पूर्वेकडेहि त्याचें चतुरंग दळ वंग-कलिंग पादाक्रांत करून आसामपर्यंत जाऊन भिडलें. अशा रीतीनें तो मोठा चक्रवर्ती सार्वभौम झाला. चालुक्य वंशाला त्यानें पुनश्च देदीप्यमान केलें. इ. स. १०७६ पासून त्यानें आपल्या नांवाचा शकहि सुरू केला होता. पण शक कांहीं नांवावर चालत नाहीं. तो चालतो यशकीर्तिप्रतापावर. विक्रमादित्यानंतर त्याच्या वंशांतला प्रताप आणि पराक्रम तळपत न राहतां मावळतच चालला. त्याचे वंशज नवें मिळवायला सोडाच; पण पूर्वजांनीं मिळवलेलें राखायलाहि दुबळे ठरले. कलचुर्य बिज्जल हा त्यांचाच एक मांडलिक. पण वरिष्ठ सत्ता दुबळी होतांच त्यानें आपलें घोडें पुढें दामटलें. इ. स. ११५६ मध्यें चालुक्यांचें राज्य जिंकून बिज्जल हा त्याचा अधिपति बनला. बसवेश्वराचा आश्रयदाता बिज्जल तो हाच होय.

चालुक्यांनीं खंडित कालांत कां होईना; पण उणींपुरीं चारशें वर्षें राज्य केलें. चालुक्य गेले; पण ते कांहीं तरी भव्य सुंदर असें मागें ठेवून गेले आहेत. त्यांच्या राजकीय पराक्रमापेक्षांहि त्यांनीं केलेल्या सांस्कृतिक विकासाचा अधिक बोलबाला आहे. त्यांनीं आपल्या राजधानींत साहित्य, वास्तु, शिल्प, चित्र इत्यादि सर्व ललितकलांची जाणतेपणें जोपासना केली. ते कीर्तिरूपें अमर झाले.

यानंतरचा कर्नाटकचा इतिहास सांगायचा तो विजयनगरच्या साम्राज्याचा. तो दिव्य आहे, प्रतापी आहे आणि अक्षराअक्षरांतून स्फूर्ति देणारा आहे. इ. स. १३३५ मध्यें विजयनगरचें पुण्याहवाचन झालें. विशिष्ट आकांक्षा अन् उद्देश यांनीं प्रेरित होऊन निर्माण झालेलें तें एक नवें राज्य होतें.

## विजयनगर साम्राज्य

तेराव्या शतकापर्यंत सारा उत्तर भारत मुसलमानांनीं आपल्या सत्तेखालीं आणला आणि ते बलाढ्य झाले. पण तेवढ्यावर त्या यवनी सत्तेची भूक भागली नाहीं. तिची दृष्टि दक्षिणेकडे वळली. विंध्य ओलांडून तिनें दक्षिणेंत हातपाय पसरायला सुरुवात केली. १२९३ मध्यें अल्लाउद्दिन खिलजी दक्षिणेंत आला. त्यानें बहुत लूटमार केली. तो परत गेला तो दख्खनच्या साम्राज्यविस्ताराचीं स्वप्नें मनांत खेळवीतच. थोड्याच कालांत त्यानें आपला सेनापति मलिक काफूर याला मोठ्या फौजेनिशीं दक्षिणेंत धाडलें. त्यानें आल्या आल्या देवगिरी अन् वरंगळ या राज्यांचा पाडाव केला. द्वारसमुद्रम्‌च्या होयसळांवरहि धाड घालून त्यांच्या राज्यांतून आपल्या फौजा पार मदुरा–रामेश्वरपर्यंत नेऊन भिडवल्या. मदुरेचे पांड्यहि पराभूत केले. दक्षिणेंतलीं हीं चार नांव घेण्याजोगीं स्वतंत्र राज्यें होतीं. पण या यवनी मुसंडीपुढें तीं हतप्रभ झालीं आणि १४ व्या शतकाच्या पहिल्या पंचविशींतच आपल्या स्वातंत्र्याला मुकलीं.

त्यामुळें उभ्या दक्षिणेला पारतंत्र्याच्या राहूचे वेध लागले. चहूंबाजूंनीं मुसलमानांची छलबलशाही सुरू झाली. त्यांनीं हिंदूंचीं राज्यें बुडवलीं; तशींच त्यांचीं उत्तुंग, वैभवशाली मंदिरेंहि जमीनदोस्त केलीं. त्यांनीं सर्वच बाजूंनीं हिंदूंचा कोंडमारा सुरू केला. दक्षिणेंतली अफाट संपदा उत्तरेचा मार्ग चालूं लागली. दख्खनच्या लक्ष्मीला त्यांनीं जणू हाकलीत, दामटवीत आपल्या घरची बटीक करायला दिल्ली-आग्र्याकडे चालवलें. त्यावरून दक्षिणेंतल्या पराभूत नरपतींना अन् स्वातंत्र्याची थोडीशी धुगधुगी असणाऱ्या राजांनाहि चरचरीत डाग दिल्यासारखें पटलें, कीं यापुढें काळ कठिण येणार! आतां एक तर शक्तीचा कण अन् कण एकत्र करून प्रतिकाराला उभें राहायला हवें, नाहीं तर अपमानाचें, लाजिरवाणें जिणें भोगायला हवें.

या प्रतिकार भावनेची पहिली ठिणगी पडली, ती विद्यारण्य स्वामींच्या हृदयांत. विद्यारण्य ही दक्षिणेतली एक अलौकिक विभूति मानावी लागेल. ते महाविद्वान् होते. अद्वैतादि दर्शनांचे दिग्गज आचार्य होते. पण त्यांची थोरवी एवढ्यावरच संपत नाही. त्यांना स्वातंत्र्याचें मोल समजत होतें आणि तें मिळवण्यासाठीं अन् टिकवण्यासाठीं करायला हवा असलेला साक्षेपहि त्यांच्या अंगीं वसत होता. ते धोरणी तसेच राजकार्यधुरंधर होते. त्यांनीं वैयक्तिक संन्यास घेतला होता; तरी हिंदु जातीच्या समृद्ध अन् समर्थ अशा संसाराची विवंचना त्यांच्या अंतरांत सदैव जिती-जागती होती. ते हिंदु जातीच्या ऊर्जस्वल जीवनाचीं स्वप्नें पाहत होते. त्यांची शिष्यशाखा मोटी होती. दक्षिणेच्या स्वातंत्र्याचा मत्र त्यांनीं त्यांच्या कानांत फुंकला.

पण तो मंत्र प्रस्फुरित झाला तो त्यांच्या दोन शिष्यांच्या हृदयांत. हे शिष्य म्हणजे हरिहर अन् बुक्क हे होत. हे सहोदर बंधू होते आणि वरंगळचा काकतीय राजा प्रतापरुद्र याच्या पदरीं मोठ्या अधिकारावर होते. दोघेहि कर्तृत्वशाली अन् विद्यासंपन्न! वरंगळचा पाडाव झाल्यावर ते तिथून निघाले आणि आनेगुंदीच्या राजाच्या आश्रयाला आले. एकजण त्याचा प्रधान बनला अन् दुसरा कोशाध्यक्ष झाला. पण १३२४ सालीं आनेगुंदीहि मुसलमानांनीं घशांत घातली. तेव्हा या दोघा बंधूंना तिथूनहि बाहेर पडावें लागलें.

मग ते विचार करूं लागले, कीं अशी पळापळ कुठवर करायची! असें पराभूत अन् हतप्रभ जिणें कुठवर जगायचें! आपली ही हरणशिकार कुठवर चालूं द्यायची! आता ठाम उभें राहिलें पाहिजे. हीच खरी वेळ आहे. याच वेळीं जर आपण हिंदूंच्या स्वातंत्र्यरक्षणासाठीं व्यापक आणि जोमदार प्रयत्न केला नाहीं, तर दक्षिणेचें मरण अटळ आहे!

आणि मग ते आपल्या गुरुवर्यांना म्हणजेच विद्यारण्य स्वामींना भेटले. गुरु–शिष्यांनीं एकांतीं बसून मसलती केल्या अन् योजनाहि आंखल्या. गुरूचा अमोघ आशीर्वाद घेऊन ते कामाला लागले. त्यांना आतां एक आपलें असें स्वतंत्र राज्य निर्माण करायचें होतें. राजधानी निर्माण करण्या-पासून त्याचा प्रारंभ करायला हवा होता. म्हणून त्यांनीं प्रथम तुंगभद्रेच्या

दक्षिणेस एक नवें नगर उभारायला सुरुवात केली. तें पुरें होतांच त्याला आपल्या गुरूवरून ' विद्यानगर ' असें नांव दिलें. ज्येष्ठ बंधु हरिहर हा त्या नव्या राज्याचा अधिपति म्हणून सिंहासनावर बसला. बुक्क त्याचा सेनापति झाला. त्यांचे आणखी तिघे बंधू होते. आधुनिक युगांतले हे पंच पांडव मग दक्षिणेंत चारी दिशांना राज्य–विस्तार करण्याच्या प्रयत्नाला लागले. प्रथम त्यांनीं एकेक करीत मुसलमानांचीं आक्रमणें परतवून लावलीं. मग अनेक राजे-रजवाडे आपल्या निशाणाखालीं आणून उभे केले.

हरिहराच्या मागून बुक्क त्या गादीवर आला. बुक्कामागून त्याचा सुपुत्र कंपराय हा राज्याधिपति झाला. त्यानें स्वतःला ' दुसरा हरिहर ' हें नांव धारण केलें. त्यानें कर्तृत्वाचे डोंगर उभे केले. भारताच्या दक्षिण भागांतून इस्लामी सत्तेची हाकलपट्टी करण्याचें ईप्सित कार्य त्यानें पुरें केलें. त्याच बरोबर हिंदुजातीचा कोलमडत चाललेला आत्मविश्वासहि त्यानें पुनश्च सुदृढ केला, खंबीर केला. मग ठिकठिकाणीं काबीज केलेला सर्व प्रदेश एकत्र करून त्यानें विजयनगरच्या राज्याला साम्राज्याचें स्वरूप दिलें. संघटित हिंदु-साम्राज्याचें निशाण त्यानें प्रथम उभारलें. दुसरा हरिहर या नांवानें पहिला सम्राट् म्हणून तो सिंहासनावर चढला. विद्यानगर हें नांव बदलून त्याचें विजयनगर हें नामकरण केलें तें यानेंच. कारण आतां तें खऱ्या अर्थानें विजयनगर झालें होतें.

दक्षिणची भारतभू यवनांच्या मगरमिठींतून सुटली, हें जनतेच्या मनावर ठसवण्यासाठीं त्यानें श्रीरंगम् आणि मदुरा येथील यवनांनीं उद्ध्वस्त केलेलीं देवालयें पुन्हा पूर्वीच्याच दिमाखांत उभीं केलीं. ज्या उद्दिष्टासाठीं अर्ध्या शतकाहून अधिक काल असंख्य ध्येयनिष्ठ लोक प्राणपणानें झटले, झगडले, तें उद्दिष्ट पूर्ण झाल्याची द्वाही त्यानें फिरवली.

काय होतें तें उद्दिष्ट ? परधर्मीयांच्या आक्रमणापासून हिंदुसमाजाची मुक्तता करणें. हिंदुसमाजाला जडलेली मानसिक गुलामगिरी दूर करणें. हिंदुसंस्कृति जयिष्णु अन् वर्धिष्णु करणें. भारतीय विद्या-कलांची जोपासना अन् वाढ करणें. एका वाक्यांत सांगायचें, तर हिंदुत्वाची ध्वजा उंच उंच फडकत ठेवणें !

अखंड चौदावें शतक दक्षिण भारतांत याच एका मंत्रानें भारून राहिलेलें होतें !

विजयनगरच्या गादीवर एकूण तीन राजघराण्यांनीं साम्राज्यसत्ता उपभोगली. पहिलें संगम घराणें. हरिहर, बुक्क, कंपराय, हे या संगम घराण्याचे कुलदीपक होत. दुसरें साळुव घराणें. याचा प्रारंभ नरसिंहराय याच्यापासून होतो. तिसरें तुळुव घराणें. या घराण्यांतला प्रकाशमय पुरुष म्हणजे कृष्णदेवराय. त्याच्या डोक्यावर चढलेला मुकुट कांटेरी होता. मुसलमानांनीं दक्षिणेंत पुनश्च नाक खुपसलें होतें. दक्षिणेंत बहामनी सत्ता प्रबल होऊं लागली होती. तिनें साम्राज्याचे कांहीं लचके तोडून नेले होते. हिंदुराज्यांमध्येंहि बेदिली माजली होती. साम्राज्याला जिकडेतिकडे खिंडारें पडलीं होतीं.

कृष्णदेवरायानें तीं आपल्या पोलादी हातांनीं बुजवून काढलीं. यवनांनीं तोडलेले साम्राज्याचे तुकडे परत साम्राज्याला जोडले. साम्राज्याची इभ्रत अन् दराराहि वाढवला. समग्र दक्षिणेंत आपली उद्दंड सत्ता दृढमूल केली. एवढेंच करून तो थांबला नाहीं. उत्तरेस कटकचा राजा अधूनमधून साम्राज्याच्या कुरपती काढीत होता. साम्राज्याची ती सरहद्द अस्थिर अन् बेभरंवशी झाली होती. कृष्णदेवराय आपलें दलबल घेऊन त्याच्यावर सरळ चालून गेला आणि त्यानें कटकनरेशाला आपल्या पायीं नतमस्तक व्हायला लावलें. यवनांनीं मोडलेल्या समस्त मंदिरांच्या जीर्णोद्धारासाठीं त्यानें स्वतंत्र निधि उभा केला. हिंदु संस्कृतीची जोपासना करणाऱ्या कित्येक संस्था त्यानें ठिकठिकाणीं निर्माण केल्या. अनेक विद्वान्, कवि अन् कलावंत यांचा तो आश्रयदाता झाला. त्याच्या कारकीर्दीत विजयनगरच्या स्थापनेचा हेतु सर्वप्रकारें सफल झाला. साम्राज्याचें वैभव कळसाला चढलें.

विजयनगरचें हें साम्राज्य १३३६ पासून १५६५ पर्यंत पूर्ण वैभवानें आणि हिंदुत्वाच्या सकल कलांनीं तळपलें. आणि त्यानंतर तें तालिकोटचें अर्थात् रक्कसतंगडगीचें युद्ध उभें ठाकलें. त्यावेळीं रामराय नांवाचा एक पुरुष साम्राज्याच्या गादीवर अधिष्ठित होता. याच काळांत दक्षिणेंत आदिलशाही, कुतुबशाही, इमादशाही, निजामशाही, बरीदशाही अशा पांच

स्वतंत्र यवनी सत्ता प्रस्थापित झाल्या होत्या. पण त्यांचें आपसांत वैमनस्यच होतें. त्या एकमेकींना पाण्यांत पाहत होत्या.

पण रामरायानें आपल्या उन्मत्त, अविचारी कृत्यांनीं त्यांचा रोष आपल्या साम्राज्यावर ओढवून घेतला. रामरायाविरुद्ध त्या साऱ्या यवनशाह्या एकदिलानें एकवटल्या आणि त्याच्यावर तुफानी समुद्रासारख्या खवळून आल्या. २२ जानेवारी १५६५ रोजीं युद्धाचा मुहूर्त झाला. सुरवातीला विजयनगरची सरशी दिसली खरी; पण अखेर बाहेरून यवनी सैन्याचा रेटा अन् आंतून फितुरी अशा दुहेरी आपत्तींनीं रामरायाची दाणादाण उडवून दिली. अखेर तो स्वतःहि हुसेनशहाच्या तावडींत सांपडला आणि त्यानें त्याच्या मस्तकाचा चेंडू हवेंत उडवून दिला.

या युद्धांत सुमारें एक लाख लोकांची कत्तल झाली. विजयी यवनसैन्यानें राजधानींत घुसून महान् अनर्थ मांडला. विजयनगराच्या अमाप वैभवाची सतत पांच महिने त्यांनीं लूट केली. अखेर उरलेंसुरलें आग लावून जाळलें अन् कुऱ्हाडींनीं फोडलें, तोडलें. विजयनगरचें सारें सौंदर्य, वैभव मावळलें. त्याला ओसाड वास्तूची अवकळा आली.

विजयनगर उद्ध्वस्त झालें, साम्राज्य सर्वांगीं खिळखिळें झालें, या गोष्टी खऱ्या; पण साम्राज्याचा अंत मात्र त्याच लढाईत झाला नाहीं. कारण हिंदूंना संपूर्णपणें नामोहरण करण्याइतकी शक्ति अन् चिकाटी दक्षिणेंतल्या कोणत्याच यवनशाहींत त्यावेळीं नव्हती. म्हणून पुढेंहि शंभर वर्षें तें जगलें अन् टिकलें. पण त्या जगण्यांत राम नव्हता. वद्य पक्षांतल्या प्रतिदिनीं क्षीण होत जाणाऱ्या चंद्राचें तें जिणें-जगणें होतें.

कर्नाटकाचा वैभवशाली अन् हिंदुसंस्कृतीचा विजयध्वज फडकत ठेवणारा इतिहास इथें संपतो; पण कर्नाटकाची वीरपरंपरा मात्र इथेंच संपत नाहीं. ती इंग्रजांविरुद्ध भारतानें पुकारलेल्या स्वातंत्र्ययुद्धापर्यंत येऊन भिडलेली दिसून येईल. कर्नाटकाची ही वीरपरंपरा पुरातन काळापासून चालत आलेली आहे. कर्नाटकांतल्या अनेक पुरुषांनीं आत्मसंरक्षणार्थ तर शौर्य गाजवलेंच; शिवाय कित्येक महत्त्वाकांक्षी वीरपुंगवांनीं इतरांवरहि आक्रमण करून स्वतंत्र

राज्यें स्थापलीं. कदंबकुळांतला मयूरशर्मा, मंगकुळांतला माधव, होयसळ वंशांतला सळ, कंपराय, कृष्णदेवराय, इत्यादि अतिरथी-महारथींच्या आख्या-यिका अन् दंतकथा आजहि कर्नाटकांत रसाळपणें सांगितल्या जातात अ, गोडीनें ऐकल्या जातात. कर्नाटकांतल्या अनेक वीरपुरुषांनीं परप्रांतीं जाऊन् स्वतःच्या बाहुबळावर तिथें राज्यपदें स्थापलीं. नेपाळचें नान्यदेव घराणें, बंगालचें सेन घराणें, कनौजचे गहडवाल, जोधपूरचे राठोड, कलिंगाचे गंगन अन् पूर्व बंगालचे बारभुज्य राजे, या सर्वांची मूळ भूमि कर्नाटकच होती, असें.प्रा. मुगळी सांगतात.

वीरगळ

कर्नाटक वीरपूजेसाठींहि प्रसिद्ध आहे. त्यानें आपल्या वीरांचें जेवढें कौतुक आणि सश्रद्ध स्मरण केलें आहे, तितकें अन्य कोणत्या प्रांतानें क्वचितच केलें असेल. म्हैसूर भागांत तुम्ही कुठल्याहि खेड्यांत जा; त्याच्या वेशीवर लहान मोठ्या घडीव किंवा अनगड दगडांची कतार उभी केलेली तुम्हाला दिसेल. त्यांतले कांहीं दगड हातभर उंचीचे तर कांहीं चांगले पुरुष-दीड पुरुष उंचीचे दिसतील. त्यांना म्हणायचें 'वीरगळ.' त्याचा अर्थ धारातीर्थीं पतन पावलेल्या वीरांची 'स्मारक शिला' असा आहे. या शिळांवर बहुधा कोणाचें नांव नसतें. असतात ती कांहीं कोरींव चित्रें. त्या चित्रांवरून तो अनामिक वीर कोणत्या महत्कृत्यासाठीं वीरमरण मेला, त्याची कल्पना करतां येते.

कोणी गावांतलें गोधन पळवून नेणाऱ्या लुटारूंचा प्रतिकार करतां करतां उरीं धाव लागून पडलेला असतो. कोणी गांवांतल्या एखाद्या अबलेवर होत असलेला बलात्कार पाहून सळसळत्या रक्तानें त्या आततायी अधमाशीं द्वंद्वयुद्ध करतांना प्राणाला मुकलेला असतो. कोणी आपल्या गांवावर किंवा जातीवर झालेल्या अन्यायाचा सूड घेण्याच्या कामीं लढत असतां प्राणत्याग केलेला असतो. कोणी एखाद्या राजाच्या जुलमी करा-विरुद्ध किंवा त्याच्या अस्मानी सुलतानीविरुद्ध बंड पुकारून हुतात्मा झालेला असतो. कोणी स्वामिनिष्ठ सेवक आपल्या धन्याचा अकाल मृत्यु झाला असतां शोकानें विव्हल होऊन धन्याबरोबरच त्याच्या जळत्या

चितेंत उडी घेऊन मृत्यूला खेंव देणारा असतो. एतावता ज्यानें ज्यानें म्हणून कोणत्यातरी परोपकारी कृत्यासाठीं अथवा स्वामिकाजासाठीं आपल्या पंचप्राणांची कुरवंडी केली असेल, त्याच्या त्याच्यासाठीं हे वीरगळ उभारलेले आहेत.

बरेचसे वीरगळ ओबडधोबड असले, तरी त्यांतले कांहीं सुबक घडणीचे असतात. त्यांतले कांहीं एखाद्या चबुतऱ्यावर उभे दिसतात, तर कित्येक ठिकाणीं त्यांच्यावर मंडपहि असतो. त्यांच्यावरची चित्ररचनाहि स्पष्ट अन् आकर्षक असते. त्यांच्याखालीं वीरवृत्तीला प्रेरणा देणारीं धर्मग्रंथांतलीं कांहीं श्लोकबद्ध वचनेंहि कोरलेलीं आढळतात—

" जो रणांगणांत देहत्याग करतो तो सुसाट स्वर्गाला जातो. "

" सूर्यमंडळाचा भेद करून दोनच पुरुष पुढें जाऊं शकतात. एक समाधींत देहत्याग करणारा योगी आणि दुसरा संग्रामांत लढतां लढतां मरण पत्करणारा वीर ! "

या वीरांच्या स्मारकांतूनच कर्नाटकांत वीरपूजा सुरू झाली आणि तिच्याविषयीं लोकांना प्रेमादर वाटूं लागला. कर्नाटकीयांनीं अशाच सतींच्या नांवांच्याहि शिळा उभारून त्यांना कृतज्ञ मानवंदना दिली आहे. अशा शिळांना ते ' मास्तीकल ' म्हणतात.

### कित्तूरची राणी

कर्नाटकाच्या वीरवृत्तीविषयीं लिहीत असतांना मी जर एका वीरांगनेचा उल्लेख टाकून पुढे गेलों, तर तो मोठाच प्रमाद होईल. या महिलेचें नांव आहे राणी चन्नम्म. वीरांगना म्हटलें कीं आपल्याला पहिलें नांव स्मरतें अन् स्फुरतें तें झांशीवालीचें. तीन वर्षांपूर्वीं म्हणजे १९५७ सालीं आपण भारताच्या इंग्रजांविरुद्ध उभारलेल्या स्वातंत्र्यसमराची शताब्दि साजरी केली. त्या महोत्सवाची मुख्य उत्सवमूर्ति झाली होती ती राणी लक्ष्मीबाईच ! त्या निमित्त राणी लक्ष्मीबाईच्या जीवन–मरणाचें चरित्र पुनश्च एकदा जनतेच्या मनांत उजळून निघालें. अनंत मरणें मरून जिच्या पोटीं जन्माला यावें आणि

जिचें स्वाभिमान आणि स्वातंत्र्यलालसा या गुणांचें स्तन्य प्यावें, अशीच ती माउली आहे ! अशीच ती तेजाची उफाळती ज्वाळा आहे !

आणि ही दुसरी राणी चन्नम्म. तीहि लक्ष्मीबाईपेक्षां कांकणभरहि कमी नाहीं. झांशीवालीच्या पूर्वीच २८ वर्षें ही आपलें जिणें, मरणें धन्य करून वीरगतीला गेली. आपल्या ऋषि–मुनींच्या वचनांवर श्रद्धा ठेवून बोलायचें, तर ती सूर्यमंडळ भेदून गेली !

लक्ष्मीबाई अन् चन्नम्म ! दोघींच्या चरित्रांतहि बरेंच साम्य अन् साधर्म्य आहे. दोघींनींहि पदर बांधला तो सुधारलेल्या, शस्त्रास्त्रांनीं सज्ज अशा इंग्रजांविरुद्ध. दोघींच्याहि बाबतींत इंग्रजांनीं दत्तकाच्या प्रकरणींच कुरापत काढली. रणचंडी होण्यापूर्वीं दोघींचाहि सौभाग्यटिळा पुसला गेला. अंतर्गत फितुरीनेंच शेवटीं दोघींनाहि दगा दिला. फरक असेल, तर तो मृत्युघटनेच्या बाबतींत. झांशीवाली रणक्षेत्रावरच धारातीर्थीं पडली, तर चन्नम्म–

पण त्यासाठीं तिची सगळीच कथा थोडक्यांत सांगतों—

कित्तूर ही बेळगांव जिल्ह्यांतली एक लहानशी जहागीर. एक छोटेंसें स्वयंपूर्ण संस्थान म्हटलें तरी चालेल. देसाई घराण्याचें राज्य तिथें चालत होतें. त्या घराण्यांतला मल्लसर्ज देसाई हा चन्नम्माचा पति. तिचें माहेरघर होतें काकतीकर देसायांच्या घराण्यांत. चन्नम्म दिसायला फार सुंदर होती. घरांतलीं माणसें तिला 'सुंदरी'च म्हणत. पण मल्लसर्ज तिच्यावर भाळला, तो तिच्या रूपापेक्षांहि तिच्या मर्दानी वीरवृत्तीवर ! चन्नम्म सुंदर असली तरी ती नाजुक नार नव्हती. लहानपणापासूनच तिला घोड्यावर बसून शिकार खेळण्याची हौस होती. भाला अन् तलवार ती सफाईदारपणें चालवी. तशाच एका शौर्यप्रसंगांत मल्लसर्ज देसायानें तिला प्रथम पाहिलें अन् लागलीच तिला मागणी घातली. चन्नम्म कित्तूरची राणी म्हणून त्याच्या राज्यांत आली.

तो काळ १९ व्या शतकाच्या प्रारंभींचा होता. इंग्रज भारतांत दृढमूल होऊन हळू हळू हातपाय पसरूं लागले होते. त्यांची अधाशी नजर निरनिराळ्या राज्यांवर, संस्थानांवर, आणि जहागिऱ्यांवर पडूं लागली होती. चन्नम्माच्या पतीला हा भविष्यार्थ उमगला होता. पण दुर्दैवानें तो अकालीं

मृत्युमुखीं पडला. मरतांनाहि त्याला आपल्या राज्याची काळजी पोखरीत राहिली होती. तो चन्नम्माला मृत्युशय्येवरून म्हणाला.

“ माझी घटका, भरत आली. देशांतलीं लक्षणं कांहीं ठीक दिसत नाहींत. आतां इंग्रज दिवसेंदिवस मातब्बर होऊं लागला आहे. त्याची लोभी नजर आपल्या राज्यावर केव्हां पडेल, त्याचा नेम नाहीं. चन्नम्म, आतां सगळी जबाबदारी तुझ्या शिरावर—”

चन्नम्मानें उरांत दाटून आलेला दुःखाचा कढ मोठ्या कष्टानें गिळला आणि धीराच्या शब्दांत आपल्या मावळत्या सौभाग्याला म्हटलें.

“ तुम्ही चिंता करूं नका. मी तुमच्या चरणांना स्पर्श करून शपथ घेतें, कीं मी आपलं राज्य इंग्रजांच्या घशांत पडूं देणार नाहीं ! ”

‘ मेरी झांशी नहीं दूंगी ’ याच जातीची अन् तितकीच वज्रकठोर अशी ती चन्नम्माची प्रतिज्ञा होती.

त्यावेळीं धारवाड शहरांत कंपनीसरकारचा पोलिटिकल एजंट थॅकरे नांवाचा इंग्रज होता. त्यानें चन्नम्मा दत्तक घेत आहे, या सबबीवर कुरापत काढून कित्तूरची रियासत गिळंकृत करण्याचा घाट घातला. त्यानें कित्तूरच्या रियासतीवर सरळ सरळ सैन्यच घातलें. पण चन्नम्म सर्वविषयीं सावध होतीच. तीहि ‘ हरहर महादेव ’ गर्जून रणांत उतरली. तिनें किल्ल्यावरून आपला तोफखाना सुरू केला. इंग्रज सैन्यावर लाल गोळे पडूं लागले. तिचें सैन्य शर्थीनें लढूं लागलें.

इंग्रज सैन्याला तिच्याशीं मुकाबला करणें अशक्य झालें. त्यांची दाणादाण अन् पांगापांग झाली. थॅकरे क्रोधानें लालीलाल झाला. तो दांडगाई करून किल्ल्याच्या महाद्वारांत घुसला ! पण त्या बिचाऱ्याची घटका भरली होती. राणीनें वरून नेमका त्याला टिपला. त्याच्या छाताडांत गोळी घुसली अन् त्याचें निष्प्राण धूड घोड्याच्या पाठीवरच लोंबकळूं लागलें. थॅकरेबरोबरच्या इतर कांहीं सैन्याधिकाऱ्यांनाहि तिनें असेंच लोळवलें. त्यामुळें इंग्रज सैन्याला ‘ दे माय धरणी ठाय ’ झालें. चन्नम्माला विजयश्रीनें माळ घातली. त्या

युद्धांत एक, दोन, नव्हेत; तर अठरा इंग्रज अधिकारी तिनें गिरफदार केले अन् त्यांना तुरुंगाची अंधारकोठडी दाखविली.



चन्नम्माचा पुतळा – बेळगांव

या वार्तेनें कंपनीसरकार गडबडलें. त्याला या पराभवाचा चांगलाच चरका बसला. मग इंग्रजांनीं बलप्रयोगाचा मार्ग सोडून सामाचा मार्ग स्वीकारला. कंपनीसरकारकडून राणीला निरोप आला, कीं 'जर ती त्या १८ इंग्रज अधिकाऱ्यांना बंधमुक्त करीत असेल, तर यापुढें कंपनीसरकार तिच्या वाटेला जाणार नाहीं.'

अर्थात् हा निरोप राणीला गौरवास्पदच होता. तिला तरी त्या इंग्रज अधिकाऱ्यांना संभाळून ठेवण्याची नसती पंचाईत नकोच होती. म्हणून तिनें तो निरोप स्वीकारला अन् त्या अधिकाऱ्यांना मोकळें केलें.

पण इंग्रजांचे खायचे दात अन् दाखवायचे दांत वेगळे होते. त्यांना फक्त आपले अडकलेले मोहरे राणीच्या कैदेंतून हातींपायीं सुरक्षित बाहेर यायला हवे होते. ती गोष्ट साध्य होतांच ते आपल्या ठकबाजीच्या वळणावर गेले. एका स्त्रीचा विश्वासघात करायलाहि त्यांना लाज वाटली नाहीं. त्यानंतर

थोड्याच दिवसांत पूर्वीपेक्षां चौपट सैन्य इंग्रजांनीं कित्तूरच्या किल्ल्यावर लोटलें. चन्नम्म त्याहि वेळीं न डगमगतां प्रतिकाराला उभी ठाकली. पण हें युद्ध तिच्या हितीं व्हायचें नव्हतें. ऐन वेळीं देशद्रोही फितुरांनीं तिला दगा दिला. तिचा तोफखाना अन् दारुगोळा त्यांनीं थंड करून टाकला. त्यामुळें तिच्या बाजूनें सारेंच कांहीं थंडावलें.

मग इंग्रज सेना विजयगर्जना करीत किल्ल्यांत घुसली. इंग्रज अधिकाऱ्यांनीं लगोलग चन्नम्माला गिरफदार केलें. तिचें राज्य घशांत घातलें अन् तिला बैलहोंगलच्या किल्ल्यांत बंदिवान करून ठेवलें. तिथूनहि तिनें पळून जाण्याचा दोनदा प्रयत्न केला. पण त्यांत तिला यश मिळूं शकलें नाहीं. अखेर तिला १८२९ सालीं तशा बंदी अवस्थेंतच या नश्वर जगाचा त्याग करावा लागला ! तिच्या मृत्यूनें एक दिव्य तेजःशलाका धरातल सोडून ब्रह्मांडाच्या अनंत ज्योतींत विलीन झाली !

गेल्या वर्षीं बेळगांव येथें तिचा एक अश्वारूढ पुतळा उभा करून तिथल्या जनतेनें स्वातंत्र्याच्या मुक्त वातावरणांत या मूर्तिमती स्वातंत्र्यदेवीला आदराची श्रद्धांजलि वाहिली आहे. कन्नड साहित्यांतहि तिला विविध प्रकारांनीं मानवंदना मिळाली आहे, मिळत आहे !






(दक्षिण भारताच्या पांच भाषांना 'पंच द्राविडभाषा' असें म्हणायची वहिवाट आहे. तामिळ, तेलुगु, मलयाळम् कन्नड आणि तुळु अशीं त्यांचीं नांवें आहेत. त्यांतली तुळु वगळल्यास बाकीच्या चारहि भाषा संपन्न साहित्यिक भाषा आहेत. प्रत्येकीला स्वतंत्र लिपीहि आहे.) तुळु भाषा ही त्यांतली गरिबाघरची बहीण. तिला अद्यापि लिपीचें कुंकू लागलें नाहीं आणि लोकगीतां-व्यतिरिक्त खास तिच्या अशा साहित्याचे अलंकारहि तिच्या अंगाखांद्यावर पडले नाहींत. ही भाषा दक्षिण कर्नाटकांत बोलली जाते. कन्नड भाषेची एक परिपुष्ट अशी बोली, एवढेंच तिचें स्वरूप आजहि राहिलें आहे.

तुळु बोलीशिवाय आणखीहि कांहीं बोलींचा परिवार कन्नड भाषेला लाभला आहे. कोडगु, तोड, कोट आणि बडग या नांवानीं त्या बोली ओळखल्या जातात. कोडगु ही तुळूची जुळी बहीण म्हटलें तरी चालेल. ती कूर्गमध्यें बोलली जाते. कूर्ग हा म्हैसूर राज्याचा एक जिल्हा आहे. तोड, कोट आणि बडग या तीन बोली एका नीलगिरींत नांदतात अन् तीन वेग-वेगळ्या पहाडींत बोलल्या जातात. त्यांचा अद्यापि विकास झालेला नाहीं.

कन्नड भाषा महाभारत आणि रामायण यांच्या कालांतहि बोलली जात होती, असें म्हणतां येतें. महाभारतांत 'कर्नाट' शब्द अनेक वेळां आढळतो. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांत निर्माण झालेल्या 'शिलप्पधिकारम्' या तमिळ महाकाव्यांत कन्नड भाषा बोलणाऱ्यांना 'करुनाडर' असें म्हटलें आहे. 'करुनाड्ड' याचा अर्थ 'काळ्या मातीचा देश' असा होतो. आणि

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ३९४४८ दि:
क्रमांक २८८ नों: दि: 23/10/69

कर्नाटकाच्या भूभागाला तो लागूहि पडतो. सुमारें साठ वर्षोपूर्वी ग्रीसमध्यें ' आक्सिरिंकर्स ' नांवाच्या एका ठिकाणीं उत्खनन झालें. त्यांत एक प्राचीन वल्कललेख प्राप्त झाला आहे. हा लेख सनपूर्व दुसऱ्या शतकांतला असल्याचें श्री. ग्रेन फेल आणि श्री. हंट यांनीं ठरवलें आहे. या लेखांत एक प्रहसन आहे. त्यांत ग्रीक भाषेच्या जोडीनें कोणत्यातरी ग्रीकेतर भाषेचा उपयोग केलेला दिसतो.

प्रहसनाची घटनाभूमि दक्षिण भारताचा पश्चिमकिनारा ही आहे. कथानक आहे, एका ग्रीक राजकुमारीचें. ' मल्पी ' चा नायक तिचें अपहरण करतो. ती वार्ता समजल्यावर ग्रीसचा राजा आपल्या परिवारासह मल्पीला येतो. तिथल्या नायकाशीं संधान जुळवतो. त्याला अतिरिक्त मद्य पाजतो. आणि तो बेहोष होऊन पडल्यावर राजकुमारीला सोडवून घेऊन निघून जातो.

या ग्रीसच्या राजाचा एक विदूषक त्याच्या समागमें आलेला आहे. तो मल्पीच्या ग्रामललनांशीं ओळख-पाळख घडवून आणतो. वर उल्लेखिलेल्या वल्कललेखांत ग्रीकेतर भाषेचे जे शब्द दिसतात, ते या ग्रामीण स्त्रियांच्या तोंडीं आहेत. कांहीं संशोधक म्हणतात, कीं ते ग्रीकेतर शब्द प्राचीन कन्नड भाषेचे असले पाहिजेत. अर्थात् हें सुतानें स्वर्गाला जाणें आहे. श्री. मास्ती व्यंकटेश अय्यंगार यांनीं त्याविषयीं शंकाच व्यक्त केली आहे. फार तर एवढेंच म्हणतां येईल, कीं ते शब्द कन्नड वाटतील असे कांहीं तरी आहेत.

कन्नड लिपि ही तेलगू लिपीला अगदी जवळची आहे. दोहींतलें अंतर केवळ नाममात्रच जाणावें. शिवाय या दोन लिप्या देवनागरीला जितक्या जवळच्या आहेत, तितक्या त्या तामिळ लिपीला नाहींत. तेराव्या शतकापूर्वीं लिहिल्या गेलेल्या तेलुगू शिलालेखांच्या आधारें दाखवतां येतें, कीं त्या कालापर्यंत तेलुगू आणि कन्नड या दोन्ही लिप्या एकच होत्या. वर्तमान कन्नड लिपि देवनागरीहून पृथक् दिसत असली, तरी दोन्हींच्या ध्वनिसमूहांत फारसें अंतर नाहीं. आहे तें एवढेंच, कीं कन्नड स्वरमालेंत ' ए आणि ओ ' यांचीं ऱ्हस्व रूपें आहेत. तसेंच व्यंजनांत वर्त्स्य 'ल' च्या जोडीनें मूर्धन्य 'ल'

हा एक वर्ण अधिक आहे. बाकीचे सारे वर्ण देवनागरीसारखेच. कन्नड लिपि ही पश्चिम भारतांतल्या लेण्यांत आढळणाऱ्या दक्षिण अशोकी लिपीपासून निघालेली आहे. कन्नड ही वेगळ्या कुळांतली असली, तरी तिच्यामधल्या सर्व अमूर्त, धार्मिक, शास्त्रीय आणि तात्त्विक संज्ञा संस्कृत भाषेंतूनच घेतलेल्या आहेत. संस्कृत ही कन्नडची आई नसेल कदाचित्; पण आपल्या दुधावर तिला पोसणारी दाई निश्चित आहे. संस्कृत भाषेनें कन्नडच्या कायेंत आपलें तेज आणि सत्त्व घातलें आणि त्यामुळेंच कन्नड ही एक समृद्ध साहित्य-भाषा बनली.

(कन्नड साहित्याच्या कालविभागासंबंधीं विद्वानांत एकमत नाहीं. पण प्रा. मुगळी यांनीं केलेलें तिचें कालविभाजन पुष्कळ अंशीं मान्य होण्याजोगें आहे--

१ ) पंपपूर्व युग–(इ. स. ९५० पर्यंत)
२ ) पंपयुग–(इ. स. ९५० ते ११५० पर्यंत)
३ ) बसवयुग–(इ. स. ११५० ते १५०० पर्यंत)
४ ) कुमारव्यास युग–(इ. स. १५०० ते १९०० पर्यंत)
५ ) आधुनिक युग–(इ. स. १९०० च्या पुढें)

पंपपूर्व युगांतली एकच साहित्यकृति कन्नड साहित्यांत गाजते आणि ती म्हणजे 'कविराजमार्ग.' दंडीच्या काव्यादर्शाच्या आधारें कन्नड भाषेंत लिहिलेला तो अलंकारशास्त्रावरचा ग्रंथ आहे. मान्यखेटचा राष्ट्रकूट राजा नृपतुंग यानें इ. स. ८१५ ते ८७७ या कालखंडांत कधींतरी तो निर्माण केला असा आजवरचा समज होता. पण आधुनिक संशोधक आतां त्याच्या कालाविषयीं नव्हे, तर कर्त्याविषयीं संदेह प्रकट करूं लागले आहेत. प्रा. मुगळी यांच्या मतें नृपतुंगाचा दरबारी कवि श्रीविजय, यानें हा ग्रंथ स्वत: लिहून आपल्या आश्रयदात्याच्या नांवानें प्रकाशित केला.

या ग्रंथांत कवीनें अनेक गद्य–पद्य लेखकांचा नामनिर्देश केला आहे. कवीश्वर, लोकपाल, विमलोदय, नागार्जुन, जयबंधु, दुर्विनीत, अशी त्यांचीं नांवें आहेत. या नामावळीवरून असें वाटतें, कीं नृपतुंगाच्या काळांत

कन्नड साहित्य निर्माण होऊन प्रगतीची वाट चालूं लागलें होतें. वाङ्मय आधीं आणि त्याच्या नियमांचें शास्त्र त्यानंतर, हा तर नियमच आहे. त्याअर्थी अलंकारशास्त्रावर कन्नडभाषेंत ग्रंथ निर्माण व्हावा अशी आकांक्षा नृपतुंगाला झाली, त्याअर्थी त्याच्या काळांत कन्नडभाषेचा साहित्यसंसार मांडला जाऊं लागला होता, ही गोष्ट ओघानेंच मान्य करावी लागते. श्रीवर्ध-देव हा ग्रंथकार याच कालखंडांतला आहे. त्यानें सुमारें शहाण्णव हजार कवितांचा 'चूडामणि' नामक जैन तत्त्वज्ञानावरचा एक ग्रंथ लिहिला होता, असें शोधाअंतीं कळतें. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, हा आणि याच्या जोडीचे इतर अनेक ग्रंथ कालोदरांत गडप झाले आहेत.

इ. सनाच्या पांचव्या शतकापासूनचे कन्नड शिलालेख सांपडतात. सर्वांत प्राचीन शिलालेख बेलूरनजीकच्या हलमिडी या खेड्यांत सांपडला आहे. पुढें पुढें ही संख्या वाढत गेलेली दिसते. एका शिलालेखांत प्राचीन छंदोबद्ध रचना आढळली आहे. बदामी आणि श्रवणबेळगोळ या ठिकाणीं सांपडलेले शिलालेख शब्दरचना आणि अलंकार या दोन्ही दृष्टींनीं वाचनीय आहेत. पांचव्या शतकापासून तों सातव्या शतकापर्यंत कन्नड भाषेचें स्वरूप कशा प्रकारचें होतें, तें या शिलालेखांवरून जाणतां येतें.

कन्नड साहित्याचे आद्य प्रवर्तक जैन होते, ही आतां सिद्ध गोष्ट आहे. या जैन साहित्यिकांमुळेंच कर्नाटकांत जैन धर्माचा विस्तार झाला. कर्नाटकांतहि तत्कालीन पंडितांची आणि राजकाजाची भाषा संस्कृतच असली, तरी सर्व-सामान्य जनतेची बोली कन्नड होती. या सामान्य जनतेंत आपला धर्म रुज-वायचा, तर त्या कामीं लोकभाषेचाच आश्रय करायला हवा, हें त्या जैन पंडितांनीं हेरलें. त्यामुळें ते संस्कृत भाषेला जरा दूर ठेवून कन्नड भाषेंत ग्रंथ रचूं लागले. जैन ग्रंथकारांचें हें कन्नड साहित्य बहुतांशीं धार्मिक होतें आणि धर्मप्रचारासाठींच लिहिलेलें होतें. संस्कृतांतलें पुराणभांडारहि, आपल्या धर्माला अनुकूल असा त्यांत फेरबदल करून त्यांनीं कन्नड साहित्यांत आणून ओतलें. त्यांनीं पौराणिक आख्यानांवर आपल्या संप्रदायाचें कलम करावें ही गोष्ट पौराणिकांना रुचली नाहीं ही गोष्ट खरी; पण आपल्या संप्रदायाचे संस्कार त्यांच्यावर करीत असतां त्यांनीं त्यांतलें सौंदर्य मारलें नाहीं, या-बद्दल तरी त्यांना भलाई द्यावीच लागेल. या पौराणिक ग्रंथसंपदेमुळें कन्नड

साहित्य अनेक गुणांनीं विकसित झालें. त्या भाषेचें शब्दभांडार भरलें आणि आविष्काराचें सामर्थ्यहि वाढलें.

### महाकवि पंप

या परंपरेंतला पहिला आणि श्रेष्ठ महाकवि म्हणजे पंप! यानें आपल्या सरस सुंदर काव्यनिर्मितीनें कन्नड साहित्याच्या सुवर्णयुगाचा सूर्योदय केला. हा कन्नडचा आदिकवि मानला जातो. हा जन्मजात जैन असला तरी त्याचे आजेपणजे वैदिक ब्राह्मण होते आणि सोमयाजी दीक्षितहि होते. पण याच्या बापानें जैन धर्म स्वीकारला अन् त्याचा अभ्यासहि केला. पंप इ. स. ९०२ मध्यें वेंगीपळु या अग्रहारांत जन्मला. ब्राह्मणधर्म अन् जैनधर्म या दोन्हीं धर्मांचा वारसा त्याला त्याच्या कुळांतूनच लाभला असल्यामुळें त्याच्या ग्रंथ-रचनेंत उभय संस्कृतींतल्या श्रेष्ठ गुणांचा उत्कर्ष पाहायला मिळतो. पंपाचें दुसरें वैशिष्ट्य हें कीं, त्यानें कन्नड भाषेची सरलता संस्कृत भाषेच्या सुंदर-तेशीं जोडून दिली. इतकेंच नव्हे; तर कन्नडला संस्कृताच्या निकट संपर्कांत आणून सोडलें.

कन्नड भाषेंत चंपूकाव्याचा श्रीगणेशा करणाराहि पंपच आणि त्याला घवघवीत पूर्णत्व देणाराहि तोच! म्हणूनच या कालखंडाला 'चंपूयुग' आणि 'पंपयुग' अशीं दोन नांवें मिळालीं आहेत. या कालखंडांत असा एक अलिखित नियम पडून गेला होता, कीं प्रत्येक कवीनें दोन प्रकारचीं काव्यें रचलीं पाहिजेत. एक धार्मिक आणि दुसरें लौकिक. धार्मिक काव्यांत धर्माचें विवेचन आणि उपदेश असावा आणि लौकिक काव्य सौंदर्याला प्राधान्य देऊन जनांचें मनरंजन करणारें असावें. जैन कवि पहिल्या प्रकाराला आगमिक म्हणत. आगमिक कृतींत सामान्यत्वें एखाद्या तीर्थंकराचें चरित्र वर्णायचें आणि लौकिक कृतींत रामायण-महाभारतांतला किंवा जैन कथा-भांडारांतला एखादा कथा-प्रसंग घेऊन तो शब्दार्थांनीं नटवायचा. आदि-कवि पंपानेंहि या संकेताला अनुसरून उभयविध काव्यरचना केलेली आहे.

त्याच्या आगमिक काव्याचें उदाहरण म्हणजे आदिपुराण. धर्मविवेचन आणि काव्यसौंदर्य हीं दोन्ही त्या पुराणांत खेळीमेळी करतात. या पुराणांत

ऋषभनाथ या आदितीर्थंकराच्या अनेक कथांचा संग्रह झालेला आहे. त्याच्या या कृतीला बौद्धांच्या जातककथांचा वास आल्यावांचून राहात नाहीं. बोधिसत्त्वाच्या अनेक पूर्वजन्मकथा जातकांत सांगितलेल्या असतात, त्याच-प्रमाणें पंपानेंहि ऋषभनाथाचे अनेक पूर्वजन्म त्या पुराणांत वर्णिले आहेत. त्यांतली एकच कथा संक्षेपानें पुढें देतों--

एका पूर्वजन्मांत आदिनाथ ललितांग नांवाचा एक पुरुष असतो. त्याच्या पत्नीचें नांव स्वयंप्रभा. दोघांचें एकमेकांवर चक्रवाकयुगुलासारखें प्रेम असतें. पण तें प्रेम ललितांगाच्या अंगीं लागत नाहीं. त्याला मृत्यूचें भय सदैव घेरून असतें. मृत्यु टळावा म्हणून तो सदैव प्रार्थना करीत असतो. त्याची ही दयनीय अवस्था पाहून कवि त्याला म्हणतो–

‘ भल्या गृहस्था ! ही अवस्था तुझीच नाहीं; तर मानवमात्राची आहे. स्वर्गांतले देवहि मृत्यूच्या दाढेंत रगडले जातात, तिथें मानवाचा कोण केवा ! संसार हें एक कालचक्रच आहे. सगळेच त्याच्याखालीं भरडले जातात. त्यांतून मुक्त होण्याचा मार्ग एकच आणि तो म्हणजे धर्माला शरण जाणें हा !’

ललितांग तो उपदेश ग्रहण करतो. मृत्युभय सोडून देतो. कालधर्मा-नुसार मरतो अन् वज्रजंघ या नांवानें दुसरा जन्म घेतो. स्वयंप्रभा श्रीमती या नांवानें प्रकट होऊन त्याला भेटते. त्याहि जन्मांत त्या दोघांचें पति-पत्नी हें नातें जुळतें. प्रेमाचा संसार सुरू होतो. जीवनांतच नव्हे; तर मरणां-तहि तीं एकमेकांना सोडीत नाहींत. पतीच्या पाठोपाठ पत्नीहि प्राणत्याग करून मोकळी होते.

दोन प्रेमळ जीवांची ही करुण कहाणी पंपानें अत्यंत हृदयंगम केली आहे. ज्या आकर्षक पद्धतीनें या कथेचा प्रारंभ होतो, तितकाच तिचा अंतहि अंतःकरण हेलावून सोडतो. पंपाची सहजस्वैर प्रतिभा आणि त्याचे परिश्रम या दोन्ही गोष्टी त्याच्या आदिपुराणांत प्रकर्षानें झळकतात.

लौकिक काव्यासाठीं त्यानें हात टाकला तो महाभारतावर. अनेक प्रसंगांत त्यानें त्याच्यावर ‘ हात मारला ’ असेंहि म्हटलें तरी चालेल. स्वतः पंप आपल्या त्या अनुवादाला ‘ समस्त भारत ’ असें म्हणतो, तर इतरेजन

त्या ग्रंथाला ‘ विक्रमार्जुनविजय ’ किंवा ‘ पंपभारत ’ असें नांव देतात. विक्रमार्जुन म्हणायचें कारण असें, कीं पंपाच्या दृष्टीनें महाभारताचा नायक धर्म नसून सव्यसाची अर्जुन हा आहे. या अर्जुनाचे अनेक पराक्रम आणि विजय पंपानें ओजस्वी भाषेंत वर्णिले आहेत.

पंपाच्या काळांत अरिकेसरी हा चालुक्य राजा गाजून गेला. तो महाप्रतापी होता आणि पंपाचा आश्रयदाताहि होता. महाभारत लिहितांना पंपानें या नरपतीला अर्जुनाच्या रूपांत पाहिलें आहे आणि त्याच तोलानें गौरविलें आहे. अरिकेसरीचे पराक्रम हे तो गांडीवधारी पार्थाचेच समजला आहे. कविकृतीवर कालाचा प्रभाव पडतो म्हणतात, तो हा असा !

महाभारताच्या मूळ कथेंत त्यानें खूपच उलथापालथ केली आहे. कशी तें पाहा—जिनें आपल्या तेजस्वितेनें सबंध महाभारत घडवलें, त्या पांचाली द्रौपदीला गौण ठरवून तो सुभद्रेला प्राधान्य देतो. द्रौपदी पांच पांडवांची भार्या नसून एकट्या अर्जुनाचीच आहे, असेंहि सांगतो. योगेश्वर श्रीकृष्णाला तर तो मानीतच नाहीं. त्याचें मन ओढतें, तें दानशूर कर्णाकडे. अनेक लोकोत्तर गुणांत कर्णाची बरोबरी करणारें एकहि पात्र महाभारतांत नाहीं, असें त्यान्चें मत आहे. भीमसेनाला मात्र त्यानें व्यासोक्त रीतीनें त्याच्या मूळ स्वभावाला धरून चितारलें आहे. भारतीय युद्धांत दुःशासनाचा वध केल्यावर द्रौपदीचा वेणीसंहार करतांना तो तिला आत्मगौरवानें म्हणतो—

“ इदरोळ् श्वेतातपत्रस्थगित—
दशदिशा मंडलम् राजचक्रम्
पुदिळ कोंडिप्तडंगिप्तिदरोळे
कुरु राजान्वयं यत्प्रताप—
क्किदारिंदं नोडगुर्वुर्विदुरिदुचे
महाभारतक्कादिया त्युज्ज—
दळाक्षी पेळ सामान्यमे
बगेये भवत्केशपाशाप्रपंचम् ”

'हे पांचालि! तुझ्या या वेणीसंहारांत दशदिशांचे भूपति सामावून गेले आहेत. यांतच कौरवांचा नाशहि सांठवलेला आहे. हें एवढें महाभारत घडलें याचें मूळ कारण ही तुझी वेणी! आणि कुरुक्षेत्रावर हें महायुद्ध उभें झालें त्याचेंहि मुख्य कारण म्हणजे दुःशासनानें तुझ्या केशपाशाला केलेला पापी करस्पर्श!'

महाकवि पंपाच्या श्रेष्ठ काव्यगुणांवर कन्नड रसिक मुग्ध आणि लुब्ध आहेत. रन्न कवि तर त्याच्या या समस्त भारताला 'निरुपमेय' म्हणतो. पण मूळ महाभारताच्या इमारतीची अनेक ठिकाणीं पाडापाडी करून जैन कल्पनेप्रमाणें त्याला वेगळा आकार देणारा हा एकटाच कन्नड कवि नव्हे. अभिनव पंप या नांवानें प्रसिद्धि पावलेल्या नागचंद्र नामक कन्नड कवीनेंहि तोच प्रकार केला आहे. पंपानें आपल्या कल्पनेप्रमाणें महाभारत 'दुरुस्त' केलें, तर अकराव्या शतकाच्या अखेरीस जन्मलेल्या नागचंद्रानें रामायण जैन कल्पनेप्रमाणें 'सुधारून' लिहिलें.

अभिनव पंपाच्या मतें राम-लक्ष्मण हे अवतार नाहींत. ते 'कारण पुरुष' आहेत. राम धर्मधुरीण आहे आणि त्यानें अहिंसा व्रताची दीक्षा घेतली आहे. रावणवधासाठीं तो लंकेंत जातो; पण रावणाला मारीत नाहीं. रावणाचा वध करतो तो साहसी लक्ष्मण! राम एक-पत्नीहि नाहीं. त्यानें अनेक राजकन्यांशीं लग्न केलें आहे. शेवटीं राम जैनदीक्षा ग्रहण करतो आणि मग त्याला कैवल्य मिळतें. सीता ही भूमिकन्या नसून जनकाच्या राणीच्या गर्भांतून उत्पन्न झालेली आहे. राज्याभिषेकानंतर रामचंद्र तिचा त्याग करीत नाहीं; तर ती स्वतःच रामाचा त्याग करते अन् जिनदीक्षा धारण करून संन्यासिनी बनते. या फेरफाराचा आणखीहि बराच तपशील आहे; पण त्याचा पाल्हाळ करण्याची गरज नाहीं. शितावरून भाताची परीक्षा होऊं शकते.

पंपाच्या काळांतच आणखी दोन कवींचा नामोल्लेख केला पाहिजे. त्यांपैकीं एकाचें नांव पोन्न असून दुसऱ्याचें रन्न असें आहे. पंप, पोन्न आणि रन्न, या तिघांना कन्नड लोक 'रत्नत्रय' म्हणून ओळखतात.

पोन्न हा राष्ट्रकूटांच्या दरबारांत नांवाजला. पंपाच्याच धर्तीवर त्यानेंहि एक आगमिक आणि दुसरें लौकिक अशीं दोन काव्यें रचलीं आहेत. त्याचें लौकिक काव्य कालौघांत बुडालें असलें, तरी त्यांतला कांहीं भाग पोन्नानंतर तीनशें वर्षांनीं होऊन गेलेल्या केशिराज या कवीनें पुढें आणला आहे. तेवढ्यावरूनच पोन्नाचा श्रेष्ठ दर्जा कळून येतो.

रन्न हा पंपानंतर साठ वर्षांनीं म्हणजे इ. स. ९४७ मध्यें झाला. मुधोळ हें त्याचें जन्मगांव होतें. हाहि धर्मानें जैन होता. त्यानें केवळ संकल्प सामर्थ्यानेंच सर्व विद्याकला हस्तगत केल्या असें सांगतात. हा चालुक्यांचा आश्रित कवि होता. हा मोठा घमंडी कवि आहे. तो स्वतःला बाणभट्टाच्या तोडीचा समजतो. त्यानें महाभारतांतलें गदायुद्ध हें आख्यान निवडलें आणि 'साहसभीमविजय' या नांवानें त्यावर काव्य लिहिलें. तें लिहीत असतांना सत्याश्रय पुलिकेशी हाच नायक म्हणून त्याच्या डोळ्यांपुढें होता. त्याचें हें काव्य बहारदार आहे यांत शंका नाहीं. पण त्याहूनहि त्याची आत्मप्रशंसा अधिक बहारदार आहे. तो आपल्या वर्तमान आणि भावी टीकाकारांना बजावतो—

> "रत्नपरीक्षकानां कृति
> रत्नपरीक्षकनेदु फणुपतीय फणा
> रत्नमुमं रन्नन कृति
> रत्नमुमं पेळ परीक्ष पंगेटेर्देय"

'एखादा जवाहिऱ्या रत्नपरीक्षा करतांना नागफणीवरच्या मण्याचेंहि तोलमोल करायला गेला, तर त्याची जी हालत होईल, तीच माझ्या काव्याचें समालोचन करणाऱ्या धृष्ट टीकाकाराची होईल.'

यानें आगमिक ग्रंथ म्हणून अजितपुराण हा ग्रंथ लिहिला. त्याच्या एकंदर गर्वोक्तीवरून त्याला पंपाच्या शेजारच्या पाटावर तेवढ्याच मानानें बसायचें आहे असें दिसतें.

नागवर्मा आणि चामुंडराय हे दोघे कवि रन्नाच्या समकालींच झाले. चामुंडरायनें श्रवणबेळगोळ येथें गोमटेश्वराची प्रचंड मूर्ति खोदून उभी केली

हें त्याचें अश्वमेधाच्या तोडीचें कृत्य होय ! त्यानें जैन धर्मांतल्या अनेक थोर पुरुषांवर चरित्रपर असा एक गद्यग्रंथ लिहिला. तो तसा मौलिक नाहीं; पण कन्नड भाषेंत गद्याचें अवतरण तिथूनच सुरू होतें म्हणून त्याला महत्त्व. नागवर्म्यानेंहि असेंच एक महत्कृत्य पार पाडलें; तें म्हणजे बाणाच्या कादंबरीचें कन्नड रूपांतर.

पंप, पोन्न आणि रन्न या तिघांच्या कालखंडाला कन्नड साहित्याचें सुवर्णयुग मानतात. या युगांत जें काव्य निर्माण झालें, तें सरस अन् श्रेष्ठ दर्जाचें आहे यांत शंका नाहीं. त्या काळांतले राजे-महाराजे यांनीं या कवींना उदार आश्रय तर दिलाच; त्याशिवाय त्यांचें साहित्य जनतेंत प्रसृत करण्याच्या कामीं इतर लोकहि पुढें आले. एखादा श्रीमान् गृहस्थ आपल्या कारकुनांकडून तत्कालीन साहित्यकृतींच्या नकला करून घेई आणि त्या गांवोगांवीं पाठवून देई. या कामीं ज्या एका महिलेचा पुढाकार होता, तिचें नांव आहे अत्तिमब्बे. ही एका सेनापतीची धर्मपत्नी होती.

रन्नानंतर कन्नड साहित्याची गति कुंठित झालेली दिसते. त्या दीडशें वर्षांच्या कालावधींत अवघा एकच नामवंत कवि होऊन गेला आणि तो म्हणजे नागचंद्र. त्याला लोकांनीं 'अभिनव पंप' म्हणून गौरविलें आहे. त्याच्या रामायणाबद्दल वर उल्लेख आलाच आहे. बाराव्या शतकाच्या मध्यावर कर्नाटकांत नवीन सामाजिक आणि धार्मिक चळवळींचा उदय झाला. वाङ्मयांतहि त्या चळवळीचे पडसाद उमटल्याशिवाय राहिले नाहींत. नयासेन हा कवि त्या कालाचा अग्रदूत मानावा लागेल. त्यापूर्वींच्या कन्नड लेखकांनीं आपल्या कृतींतून संस्कृत शब्दांचा वारेमाप वापर चालविला होता. ती कन्नड भाषा तिच्या पुत्रांनाच दुर्बोध झाली होती. सुशिक्षित अल्प समाज वगळल्यास बाकीच्या सामान्य जनतेला ती कळतच नव्हती. नयासेनाला ही पद्धत अन् कवींची ही वृत्ति चुकीची वाटली. त्यानें त्या भारदस्त शैलीविरुद्ध बंडच पुकारलें. तो साध्या बोलभाषेंत जैनधर्मांतल्या लोकप्रिय नीतिपर कथा लिहूं लागला. त्याच्या जोडीनें नागवर्मा हा आणखी एक पंडित पुढें आला. त्यानें कन्नड भाषेला शब्दकोश आणि व्याकरणावरचा एक प्रबंध अशी बहुमोल देणगी दिली. इतरहि कांहीं कवींनीं प्रबंध लिहिले आणि गणित, रोगविज्ञान

इत्यादि विषयांवरहि साहित्य निर्माण केलें. हे सर्व ग्रंथ छंदोबद्ध लिहिले गेले, म्हणूनच त्यांना काव्य म्हणायचें. अन्यथा त्यांत काव्य असें फारसें नाहींच.

बाराव्या शतकाच्या मध्यावर कर्नाटकांत एक नवा पंथ प्रबळ होऊं लागला. 'वीरशैव पंथ' असें त्याचें नांव होतें. त्याची चळवळ समाजाच्या सर्व थरांत सुरू झाली. बहुजनसमाजाचा धार्मिक आणि सामाजिक दर्जा वाढविणें हा वीरशैवांचा मुख्य उद्देश होता. कन्नड साहित्याच्या दृष्टीनें बोलायचें झाल्यास, इथेंच त्या साहित्याचा प्राचीन काळ म्हणजे पंपयुग समाप्त होतें. त्यानंतरचें काव्य सर्वसामान्य वृत्तांत लिहिलें जाऊं लागलें. काव्याला मागें टाकून गद्य पुढें घुसलें.

त्या काळांत संस्कृत काव्याच्या धर्तीवर लिहिलें जाणारें काव्य एकदम मागें पडलें. पंपयुगापर्यंत साहित्य ही संस्कृत पंडितांची मक्तेदारी होती. इतरांनीं त्या क्षेत्रांत पाऊल टाकणें म्हणजे 'अब्रह्मण्यम् !' पण बसवानें सुरू केलेल्या वीर-शैव युगांत ही मक्तेदारी संपली. साहित्य जणुं उघड्या मैदानांत आलें. लेखक व्हायला आतां पंडित होण्याची, संस्कृत शिकण्याची, गरज उरली नाहीं. पण असें असलें तरी लोकांच्या बोलभाषेंत लिहिलें गेलेलें या काळांतलें साहित्य निकृष्ट अथवा हिणकस होतें, असें मात्र समजण्याचें कारण नाहीं.

पंपयुगापर्यंत जे लेखक झाले, त्यांचा वाङ्मयीन उद्देश मोठा होता. काम-गिरीहि भव्य होती. आपल्या काव्यांत आदर्श जीवन प्रतिबिंबित व्हावें, त्याच्या श्रवणपठणानें जनांची नैतिक पातळी उंच व्हावी, या उद्देशानेंच ते ग्रंथ लिहायला मांडी मोडीत. त्याकाळीं मोठा कवि हा एखाद्या राजासारखा असे. लोक त्याला राजाइतकाच बहुमान देत आणि त्याचा मानसन्मान करणें, आणि त्याच्या योगक्षेमाची चिंता वाहणें, हें आपलें कर्तव्य आहे असें राजे-महाराजेहि मानीत.

परंतु तत्कालीन कन्नड साहित्याचा एक मोठा दोष म्हणजे तें ठराविक सांच्याचें आणि ठराविक संकेतांनीं बद्ध आहे. त्या साहित्यराशींत फोल-पटाचा भागहि बराच मोठा आहे. ज्या विषयांवर काव्य होणें शक्य नव्हतें, अशा विषयांनाहि त्या काळच्या बऱ्याच कवींनीं छंदाच्या चौकटींत दाबलें. जें छंदोबद्ध तें काव्य, अशी त्यांनीं ठोक समजूत करून घेतली, त्यामुळें

गोंधळ निर्माण झाला. नृपतुंगानें 'कविराजमार्गो'त घालून दिलेले नियम विसरले गेले. पंप आणि रन्न यांच्या परंपरेकडेहि लेखकांचें दुर्लक्ष झालें.

कन्नड साहित्याच्या मध्ययुगाला प्रारंभ होतो तो इथूनच. बसवयुग म्हणतात तें हेंच. बसवाचे अनुयायी सुधारणावादी होते. गूढवादहि त्यांना प्रिय होता. त्यांनीं बोलचालींतल्या कन्नड भाषेंत जें साहित्य निर्माण केलें, तें 'वचन' या नांवानें प्रसिद्ध आहे. तें साध्याच पण परिणामकारक अशा गद्यांत रचलेलें आहे. अशा वचनकारांची गणतीच करायची झाली, तर ती संख्या दोन-अडीचशेंच्या घरांत जाईल. या वचनकारांत बसव, अल्लमप्रभु, अक्क महादेवी, ही मंडळी श्रेष्ठत्वाचा मान पटकावतात. बसवाची वाणी ही संताची आहे. अल्लमप्रभूची भाषा ज्ञानयोग्याची आहे. अन् अक्क महादेवीची भाषा ईश्वराच्या शोधासाठीं निघालेल्या एका धाडसी आत्म्याची आहे. वचन हें किंचित् गूढ गद्य भावकाव्य असतें. हा साहित्यप्रकार कन्नडशिवाय दुसऱ्या कोणत्याहि भाषेंत आढळणार नाहीं. मराठींतल्या अभंगांप्रमाणें या 'वचनां'नीं समाजांत सद्विचार पेरले अन् जनतेच्या अंतर्मनाची तार छेडली.

बाराव्या शतकाच्या अखेरीस हरिहर आणि राघवांक हे दोन श्रेष्ठ दर्जाचे कवि कर्नाटकांत उदयास आले. हरिहर हें नांव मोठें; पण तो नरसिंह बल्हाळ राजाच्या कचेरींत एक साधा गुमास्ता होता. कोण्यातरी देवाची कृपा झाली अन् त्याला कवितेचा कंठ फुटला. जीवनाच्या अंतकाळीं त्यानें हंपीचें विरूपाक्ष मंदिर जवळ केलें होतें. 'पंपाशतक' आणि 'रक्षाशतक' हीं त्याचीं दोन शतक-काव्यें आहेत. या दोन्ही काव्यांत विरूपाक्षाविषयींची त्याची उत्कट भक्ति शतधारांनीं प्रवाहित झाली आहे. हा कवि शैव होता. 'गिरिजाकल्याण' हें त्यानें शिवपार्वती-विवाहावर रचलेलें प्रौढ चंपूकाव्य आहे. याशिवाय एका निराळ्या छंदांत त्यानें एकशेंवीस शिवभक्तांचीं काव्यमय जीवनचरित्रेंहि लिहिलीं आहेत. त्यांना 'रगळे' म्हणतात. याचें बसवेश्वर चरित्र तर सर्वोत्कृष्ट आहे.

राघवांक हा या हरिहराचाच भाचा. त्याच्या बापाचें नांव महादेव आणि आईचें नांव रुद्राणी. यानें हरिहर कवीकडूनच शैव दीक्षा घेतली. हा पुढें मोठा विद्वान् झाला. त्यानें लगेच हरिश्चंद्र काव्य रचलें आणि पंपापुरच्या

राजसभेंत गाइलें. त्याच्या श्रवणानें सारी राजसभा तटस्थ झाली, चकित झाली. त्याचें ‘वीरेश्वरचरित’ हें काव्य वरंगळचा राजा रुद्रप्रताप याच्या दरबारी निर्माण झालें. याशिवाय सोमनाथचरित, सिद्धरामपुराण, रामचरित्र, देवांग-दासी, मञ्चनापुराण, असे आणखीहि कांहीं सुंदर काव्यग्रंथ याच्या नांवावर आहेत. असें सांगतात, कीं यानें आपल्या विद्वत्तेनें महाकवि कुमारव्यासालाहि खालीं पाहायला लावलें होतें. थोड्या वेळापूर्वी रत्नकवीच्या गर्वोक्तीचा एक मासला मीं तुम्हांला दाखवला आहे. आतां राघवांकाच्या विनीतभावाचा एक नमुना पहा. तो म्हणतो—

“ माझ्या या रचनेंत काव्याच्या सर्व गुणांचा समावेश झाला आहे खरा; पण त्यांत कांहीं भ्रम-प्रमाद घडले असतील, तर शिवभक्त वाचकांनी ते ते दोष दुरुस्त करून माझें काव्य वाचावें आणि मला क्षमा करावी. लोकहो ! मी तुमचा कवि आहें आणि तुमचा बंधुहि ! ”

राघवांक हा व्यक्ति आणि प्रसंग यांच्या वर्णनांत पटाईत आहे. त्याची शैली नाट्यमय आहे. त्याचें ‘ हरिश्चंद्रकाव्य ’ भारतीय साहित्यांतलें अनर्घ्य रत्न आहे असें म्हणतात.

चौदाव्या शतकापासून तों सोळाव्या शतकाच्या मध्यापर्यंतचा हा काळ म्हणजे कन्नड साहित्याचा वैभवशाली कालखंड होय. कर्नाटकांत विजयनगरचें साम्राज्य गाजलें तें याच कालांत. विजयनगरच्या रसिक आणि दात्या राजांनीं कर्नाटकांतल्या सर्व धर्मांच्या कवींना उदार आश्रय दिला. त्यामुळें कन्नड साहित्याची विविध अंगांनीं अभिवृद्धि झाली. विशेषतः याच कालांत ब्राह्मण आणि वीरशैव कवींनीं कन्नड साहित्यांत मोलाची भर टाकली. वीरशैव संतांचीं बरीचशीं चरित्रें याच काळांत लिहिलीं गेलीं. ‘प्रभुलिंगलीले’ हें या चरित्रग्रंथांचा मुकुटमणि शोभतें. लक्खण्ण, दंडेश, निजगुणशिवयोगी, आणि विरूपाक्ष हे या कालांतले नांवाजते कवि होत ! वीरशैव असें समजतात कीं, निजगुणशिवयोगी हा प्रथम एक सामंत राजा होता आणि पुढें विरक्त होऊन त्यानें शैव दीक्षा घेतली. हा पुरुष वीरशैवमताचा उदार तत्त्वज्ञ अन् उच्च कोटीचा भक्तकवि होता. त्याच्या काव्यकृतींत ‘ विवेकचिंतामणि ’ हा ग्रंथ सर्वश्रेष्ठ ठरला आहे. हा ग्रंथ म्हणजे तात्त्विक, भौगोलिक अन् साहित्यिक विषयांचा छोटासा ज्ञानकोशच आहे.

ब्राह्मणकवींत कुमारव्यास, कुमारवाल्मीकि, आणि लक्ष्मीश या तिघांचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागतो. कुमारव्यास हा कन्नड साहित्याला ललामभूत झाला आहे. तो हरिहरांमध्यें भेद न मानणारा होता. परम भागवत होता. या कवीनें महाभारताचीं पहिलीं दहा पर्वें कन्नड भाषेंत रूपांतरित केलीं आहेत. महाभारतांतलें मानवजीवन त्रिगुणात्मक आहे, बहुरंगी आहे. सज्जन, दुर्जन आणि तटस्थ अशा मानवविशेषांचा तो एक संघ आहे. या मानवसंघाची प्रेरक शक्ति म्हणजे भगवान् श्रीकृष्ण. महाभारत तोच आपल्या लीलामात्रें घडवतो. कुमारव्यासानें 'भगवंताची लीला' या दृष्टीनेंच महाभारताकडे पाहिलें आहे. त्यामुळें त्याच्या महाभारताचा नायक अर्जुन किंवा धर्म नसून योगेश्वर श्रीकृष्ण ठरला आहे. श्रीकृष्णाविषयीं कवीच्या अंतरांतला भक्तिभाव त्याच्या ग्रंथांत ओतप्रोत दिसतो.

कुमारवाल्मीकीचें खरें नांव आहे नरहरि. तो आपल्या काव्यकलाकौशल्यानें 'कुमारवाल्मीकि' बनला. त्यानें 'भामिनी षट्पदी' या छंदांत सर्व प्रथम वाल्मीकि रामायणाचा कन्नड अनुवाद केला.

या कालखंडाचा समारोप करण्यापूर्वी आणखी दोन महाभागांचा परामर्श न चुकतां घ्यायला हवा. हे दोघे म्हणजे सायण आणि माधव होत ! हे कवि नाहींत. कन्नड भाषेचेहि ग्रंथकार नाहींत. पण ते कर्नाटकांत जन्मलेले महान् आचार्य आहेत. वेद-वेदांत-पंडित आहेत. या दोघांनीं गीर्वाण भाषेचा आश्रय करून भावी पिढ्यांना वेद-वेदांगांच्या सागरांत सुखेनैव प्रवेश करतां येईल, अशी एक सुबद्ध नौका निर्माण करून दिली.

सायणाचार्य हे विजयनगरचे राजे हरिहर आणि बुक्क या दोघांचेहि अमात्य अन् सेनापति होते. पांडित्य आणि पराक्रम हे विरळाच एकत्र आढळणारे गुणविशेष सायणाचार्यांच्या अंतरांत एकत्र आले होते. त्यांचे थोरले बंधु माधवाचार्य यांनीं त्यांना चारी वेदांवर विस्तृत भाष्यें लिहिण्याची प्रेरणा दिली. सायणाचार्य अनेक विद्वानांना मदतीस घेऊन त्या महान् ज्ञानयज्ञाचे दीक्षित झाले. एकामागून एक अशी त्यांनीं वेदभाष्यें लिहून पुरीं केलीं. केवळ वेदांच्या संहितांवरच नव्हे; तर कित्येक ब्राह्मण-ग्रंथांवरहि

भाष्यरचना केली. पण आश्चर्याची गोष्ट ही, कीं एवढ्या भगीरथपरिश्रमानें लिहिलेल्या त्या ग्रंथांना त्यांनीं आपलें नांव न देतां आपल्या ज्येष्ठ बंधूवरून 'माधवीय भाष्य' असें नांव दिलें. या गोष्टीमुळें त्यांच्या प्रकांड विद्वत्तेपुढें नमावें, का त्यांच्या भरततुल्य निःस्वार्थ बंधुप्रेमाची प्रशंसा करावी, तेंच समजत नाहीं.

सायणाचार्यांचें हें ग्रंथकर्तृत्व एवढें मोलाचें आहे, कीं त्यांच्या तुलनेला कोणताहि अन्य वेदाचार्य बसूंच शकत नाहीं. वेदार्थांची यथायोग्य उकल करणारा म्हणून सायणाचार्य हा भाष्यकार अद्वितीय ठरतो. वैदिक भाषा आणि वैदिक धर्म यांच्या बंदिस्त गडकोटांत प्रवेश करण्यासाठीं वेदार्थांची गुरुकिल्लीच त्यांनीं जगाच्या हातीं दिली. डॉ. मॅक्समुल्लर यांनीं महत्प्रयासानें त्यांच्या ऋग्वेदभाष्याचें संपादन केलें आहे. मॅक्डॉनेल, कीथ, रोट, ग्रिफिथ, विंटरनिट्झ् इत्यादि पाश्चात्य पंडितांनीं वैदिक वाङ्मयाचें संशोधन करून ग्रंथराशी निर्माण केल्या आहेत. त्या सर्वांचे आद्यगुरु सायणाचार्य हेच होत. ऋग्वेदावर सायणभाष्य नसतें, तर या पाश्चात्य पंडितांची मति वेदार्थांच्या कांतारांत गळाठून बसली असती, यांत शंका नाहीं. मॅक्समुल्लरनें तसें स्पष्ट लिहूनच ठेवलें आहे. असा हा वेदपारंगत आचार्य आपल्या भूमींत जन्माला आला, म्हणून कन्नडिगांनीं अभिमानानें छाती फुगवली, तर त्यांत कांहीं गैर होणार नाहीं.

विद्यारण्य स्वामी हे कर्नाटकांतले वेदांतवागीश होत. यांचेंहि मूळचें नांव माधव असेंच आहे. त्यामुळें समजुतीचा घोटाळाहि झाला आहे. सायण-माधव या जोडींतले माधव हेच विद्यारण्य होत, अशीच आजवर सर्वांची समजूत होती. पण नव्या संशोधनामुळें तो आतां भ्रम ठरला आहे. हा माधव सायणमाधवांच्या नजीकच्या काळांतला खरा, पण वेगळा आहे. विद्यारण्य हे अध्ययन समाप्त केल्यावर संन्यास घेऊन काशींत राहिले होते. पुढें विजयनगरच्या बुक्करायानें शृंगेरीचे मठपति विद्यातीर्थ यांच्या सूचनेवरून त्यांना विजयनगराला बोलावून घेतलें आणि शृंगेरीच्या पीठावर बसवलें. मठाच्या व्यवस्थेसाठीं त्यांना कांहीं दानपत्रेंहि करून दिलीं.

विद्यारण्य हे अद्वैतदर्शनाचे दिग्गज पंडित होते. त्यांनीं वेदांतावर एकूण सोळा ग्रंथ लिहिले. त्यांतले दोन अत्यंत उपयुक्त अन् मौलिक आहेत.

त्यांपैकीं पहिला ग्रंथ 'पंचदशी' आणि दुसरा 'सर्वदर्शनसंग्रह' होय. 'पंचदशी' हा अद्वैत वेदांताचा प्रकरणग्रंथ मानला जातो. त्यांच्या सर्वदर्शनसंग्रहांत समस्त आस्तिक-नास्तिक दर्शनांचा साररूप संग्रह आहे. विद्यारण्यांची प्रतिभा सर्वतोमुखी होती. शंभर वर्षांचें आयुष्य त्यांना लाभलें आणि तें सगळें त्यांनीं अद्वैतवेदांताच्या चिंतनांत आणि उद्घाटनांत सार्थकीं लावलें.

मल्याळमूप्रमाणेंच कन्नड साहित्यांतहि चंपूकाव्यांची विपुल निर्मिति झाली आहे. बाराव्या शतकापासून तों चौदाव्या शतकापर्यंतचा काळ हें कन्नड साहित्याचें चंपूयुग मानलें पाहिजे. नेमिचंद, रुद्रभट्ट, जन्न आणि अंदय्य हे चंपूकारांचे अग्रगण्य प्रतिनिधि होत. नेमिचंदानें 'लीलावती' आणि 'नेमिपुराण' हीं दोन काव्यें रचलीं. लीलावती हें निसर्गाच्या विविध अवस्था दाखविणारें प्रेमकाव्य असून नेमिपुराण हें कृष्णकथेचें जैन रूपांतर आहे. अंदय्याची 'कब्बिगर काव्य' ही एक अद्भुतरम्य कलाकृति आहे. त्या कथेचा सारांश असा—

"शिव आपल्या जटाजूटांत चंद्रकला धारण करतो. मदनाला ती गोष्ट खपत नाहीं. चंद्र ही आपल्या मालकीची वस्तु आहे असा त्याचा दावा असतो आणि शिवानें तो चोरल्याची कुरापत काढून तो शिवावर चालून जातो. शंकर आणि मदन यांचें युद्ध होतें. शंकराचा त्या युद्धांत पराभव होतो. तो अर्धनारीनटेश्वर बनतो."

पुराणांतल्या अर्धनारीनटेश्वराची ही कवीनें सांगितलेली एक अभिनव उपपत्ति होय, असें म्हटलें पाहिजे.

आधुनिक कालांत श्री. श्रीकंठय्या, पंजे मंगेशराय आणि अलुर व्यंकटराय हे तिघे आधुनिक कन्नड साहित्याचे महर्षि समजले जातात. आजचे कन्नड साहित्यिक भिन्न भिन्न धर्मांचे आणि भिन्न भिन्न व्यवसायांचे आहेत. ब्राह्मण, जैन, लिंगायत, वक्कलिग, रेड्डी, ख्रिश्चन, मुसलमान या सर्वांचा त्यांत समावेश आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत कन्नडसाहित्यांत पद्याचेंच साम्राज्य होतें. त्या मानानें गद्याची अगदींच उपेक्षा होती. गद्याची खरी सुरवात

म्हैसूरचे महाराज मुम्मुडि कृष्णराय यांनींच केली असें म्हणतात. तिथून पुढे गद्य प्रभावी होऊं लागलें. प्राथमिक गद्य संस्कृत, बंगाली आणि इंग्लिश या भाषांतल्या ग्रंथांचें भाषांतरच असे. त्यानंतर कन्नडभाषेला आधुनिकता येऊं लागली. 'मुद्रामंजूषा' या कादंबरींत ही संक्रमणावस्था प्रतीत होते. ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं याच काळांत बायबलसारख्या धार्मिक ग्रंथांचीं कन्नड भाषांतरें पुढें आणलीं. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून कन्नड साहित्यांत स्वतंत्र कलाकृति अवतीर्ण होऊं लागल्या. तथापि त्या कालांत करिबसवशास्त्री, मूळबागळ, मुद्दण इत्यादि मोजक्या लेखकांची कामगिरीच डोळ्यांत भरण्याजोगी उतरली. मुद्दण यांचा जन्म दक्षिण कर्नाटकांत झाला अन् अवघ्या तीस वर्षं वयाच्या अवधींत त्यांनीं 'रामाश्वमेध' नांवाची जुन्या कथेवर आधारलेली, पण नवा आशय घेऊन उठलेली कादंबरी लिहून कन्नड रसिकांना दिपवून सोडलें.

सुरवातीस इंग्रजी साहित्य हा कन्नड लेखकांचा ध्रुवताराच नव्हता; तर तें त्यांचें समग्र आकाशच होतें. इंग्रजी भाषेंतील कथाकादंबरीपासून तों निबंधापर्यंत सर्व साहित्यप्रकारांचें परिश्रमपूर्वक आलोडन करून त्या काळच्या कन्नड लेखकांनीं लेखण्या सरसावल्या. श्री. श्रीकंठय्या यांच्या 'इंग्लिषु गीतेगळु' या काव्यसंग्रहाबरोबरच कन्नड साहित्यांत आधुनिक काव्याचें नवयुग सुरू झालें. या युगांतलीं पंजे मंगेशराय, गुंडप्पा, मास्ती व्यंकटेश अय्यंगार, मंजेश्वर गोविंद पै, सालि रामचंद्रराव अन् शान्त कवि हीं कवि-नामें विशेष उल्लेखनीय आहेत. मास्ती हे सर्व साहित्यप्रकारांत सिद्धहस्त लेखक आहेत. कन्नड रसिक त्यांना खूप चाहतात. श्री. पुट्टप्पा आणि श्री. द. रा. बेंद्रे हे कर्नाटकाचे अत्यंत लोकप्रिय महाकवि होत. पुट्टप्पांचें रामायण-दर्शन हें महाकाव्य तसेंच श्री. बेंद्रे यांची 'मूवत्तुमूर कोटी', 'गंगावतरण' इत्यादि काव्यें—महाकाव्यें कन्नडसाहित्यांत अजरामर ठरणारीं आहेत.

चालू युगाच्या कादंबरीकारांत पुट्टप्पा, शिवराम कारंथ, कृष्णराव, गोकाक, हे अग्रगण्य आहेत. मराठीप्रमाणेंच कन्नड भाषेंतहि कथासाहित्याची सृष्टि विपुल आहे. आजच्या कथालेखकांत कामत, श्रीपतिशास्त्री, हे अतिरथी-महारथी समजले जातात.

कन्नड साहित्याच्या कुशींत पहिलें नाटक जन्माला आलें तें 'मित्रविंदा गोविंद' हें होय! हर्षाच्या रत्नावलीचें तें कन्नड रूपांतर आहे. म्हैसूर नरेशाचा

दरबारी कवि सिंगरार्थ हा याचा कर्ता. खरें बोलायचें तर 'कन्नड' या शब्दांतील ' नड ' हा शब्द मूळ ' नट ' या शब्दाचाच अपभ्रंश आहे. इतकेंच नव्हे, तर कन्नड शिलालेखांत, शिल्पांत आणि काव्यांतहि त्या जनतेचें नाट्यप्रेम प्रकट झालें आहे. असें असतां कन्नड साहित्याच्या प्रारंभिक युगांत नाटकाचा नितांत अभाव दिसावा, हें आश्चर्यजनक वाटतें. नाटकें निर्माण झालीं असावीं; पण विद्याजड पंडितांच्या उपेक्षेमुळें तीं जीवन्मृत ठरलीं असावीं. कारण त्यांच्या अस्तित्वाचे कांहीं दाखले इतरांच्या ग्रंथांत आढळतात. तेराव्या शतकांत केशिराज या प्रसिद्ध वैयाकरणानें ' सुभद्रापहरण ' ' प्रबोधचंद्रोदय ' इत्यादि नाटकें लिहिलीं होतीं, असें समजतें. नागवर्म्यानें आपल्या काव्यशास्त्रांत उदाहरणादाखल विक्रमोर्वशीय, मालतीमाधव, नागानंद, या अनुवादित कन्नड नाटकांचीं नांवें घेतलीं आहेत. रत्नाकरवर्णी तर आपल्या ' भरतेशवैभव ' या महाकाव्यांत नाट्यशाळेचेंहि वर्णन करतो. कित्येक शिलालेखांत कर्नाटकांतल्या नटांना राजसत्तेकडून भूमिदान मिळाल्याचेहि उल्लेख येतात. यावरून असें वाटतें, कीं प्रारंभिक युगांतहि कन्नडभाषी लोक नाटकांना अनभिज्ञ नव्हते आणि कन्नडमध्यें नाटकांचाहि अभाव नव्हता.

१९ व्या शतकाच्या अंतिम चरणांत साऱ्या भारतवर्षामध्यें रंगभूमीला एक नवें पुनर्जीवन लाभलें. महाराष्ट्रांत याच कालखंडांत जशा नाटकमंडळ्या निर्माण झाल्या आणि 'अमक्या तमक्या महाराजांच्या आश्रयाखालील मंडळी' असें बिरुद मिरवूं लागल्या, त्याचप्रमाणें म्हैसूर नरेश चामराज ओडेयर यांच्या प्रोत्साहनानें कर्नाटकांतहि एक नाटक मंडळी जन्माला आली. त्या कालांत ' निरुपमा ' ' रामवर्मा—लीलावती ' ( Romeo Juliet ) ' विष्णुलीले ' ' कृष्णलीले, ' इत्यादि बरींच नाटकें रंगभूमीवर येऊन लोकप्रिय झालीं. आपल्याकडे बालगंधर्व, गणपतराव जोशी, हे नट जसे रसिकांचे कंठमणि बनले, त्याचप्रमाणें त्या कालांत वरदाचार्य हा उत्कृष्ट अभिनयपटु नट कन्नड जनतेचें प्रियपात्र ठरला.

चालू शतक तर कन्नड नाट्यसृष्टीला वैभवाचें ठरलें आहे. थोड्याच वर्षांपूर्वी दिवंगत झालेले श्री. त्यागराज परसशिव कैलासम् यांनीं आपल्या

उण्यापुऱ्या साठ नाटकांनीं कन्नड नाट्यसृष्टि सुसंपन्न केली. महाराष्ट्रांत गडकरी खाडिलकर आणि उत्तर भारतांत भारतेंदु यांचें नाट्यसृष्टींतलें जें स्थान आहे, तेंच कर्नाटकांत श्री. कैलासम् यांचें आहे. कैलासम् यानीं गडकऱ्यांप्रमाणेंच प्रेक्षकांना पोट धरून हसवलें आणि कारुण्यानें रडवलें.

कैलासम् हे स्वतः उत्तम नट होते. ते इंग्रजी भाषेचे प्रभु आणि संस्कृत भाषेचेहि पंडित होते. सुसंस्कृत कुटुंबांत त्यांचा जन्म झाला होता. पाश्चात्य देशांत अनेक वर्षें वास्तव्य केल्यानें तिकडची नाट्यसृष्टि त्यांना जवळून परिचित झाली होती. त्यांनीं 'पर्पज्', 'कर्ण' इत्यादि कांहीं इंग्रजी नाटकेंहि लिहिलीं आहेत. त्यांच्या 'पर्पज्'चा श्री. के. नारायण काळे यांनीं मराठींत अनुवाद केला आहे, तो वाचल्यावर कैलासम्च्या, भेदीत भेदीत, खोल तळठाव गांठणाऱ्या बुद्धीचें सामर्थ्य प्रत्ययाला आल्यावांचून रहात नाहीं. त्यांच्या भालप्रदेशीं जणूं शिवाचा तृतीय नेत्र होता. ते वाल्मीकीच्या कारुण्यानें जगाकडे पाहत. त्यांनीं आपल्या नाटकांत निर्माण केलेलें हास्य हेंहि तितकेंच कारुण्यपूर्ण आहे. त्यांच्या हास्याचा उद्देश काकवृत्तीनें व्रणावर टोंच मारणें हा नसून हृदयांत द्रव निर्माण करणें हा आहे. लोकांचे दोध आणि दौर्बल्य पाहून त्यांच्या मनांत रोष पेटत नाहीं; तर खेदच उत्पन्न होतो. त्या खेदांतून स्वतःच्या कविहृदयाला वाट मोकळी करून देण्यासाठीं ते हास्याचा अवलंब करतात. त्यांचा हास्यरस निर्मळ आहे; तसाच तो वैदिक सोमरसासारखा तीव्रहि आहे. तो प्रेक्षकांच्या मनावर वारंवार आघात करतो; पण त्यांच्या मनाचें मालिन्यहि झडझडून टाकतो. पुष्कळदा त्यांची प्रतिभा गडकऱ्यांप्रमाणें हास्यासाठीं अतिरंजनाचे मजल्यावर मजले उठवायलाहि कमी करीत नाहीं. पण त्यांच्या वर्णनासाठीं स्वतःच्या वाणीला शिणविण्यापेक्षां



श्री. टी. पी. कैलासम्

प्रा. गोकाक यांचा एक उतारा देणें हेंच अधिक उचित आणि परिणाम-कारक ठरेल. ते कैलासमूना उद्देशून बोलतात—

" उत्तुंग देवकुलाप्रमाणें असलेली तुझी दृश्यकाव्यकला, तुझ्या आत्म-पुरुषाची साक्षात् उत्स्फूर्त अशी दिव्य दृष्टिच होय ! दिव्य शिल्पकार जकणा-चार्याप्रमाणें, बाह्य आगंतुक उपकरणांवर अवलंबून न राहतां तूं आपली नाट्यसृष्टि क्षणांत साकार केलीस. आरश्यांत आरसा प्रतिबिंबित झाला असतांना जो प्रतिबिंबांचा अद्‌भुत चमत्कार दिसून येतो, त्याच चमत्काराच्या मंत्रकलेची जादू तुझ्या कलेंत आहे. दिव्य जीवनाचे जे सहस्र किरण तुझ्या हृदयांत आणि बुद्धींत प्रतिबिंबित झाले, त्यांचीं प्रतिबिंबें तुझ्या अंतरात्म्यांत पडलीं. तेथून निघणारे तेजाळ किरण तुझ्या चित्ताच्या निष्कलंक, शुभ्र पटलावर पडले आणि काय चमत्कार ! लगेच तिथून अद्‌भुत वाणीचे ध्वनि आणि अलौकिक प्रतिभेची रूपसृष्टि उमटली, कीं तिनें आमचीं हृदयें आनंदानें भरून टाकलीं ! तूं निर्माण केलेल्या पात्रांच्या तोंडून निघणारी वाणी तुझ्या प्रतिभेच्या देदीप्यमान प्रकाशांत न्हाऊन निघाली आणि तिला श्रुतींचें, मंत्रांचें स्वरूप आलें. त्या पात्रांचें तूं केलेलें विश्लेषण म्हणजे मान-सिक विश्वाचें एक नवीन साक्षात् दर्शनच होय ! तुझ्या नाट्यसृष्टींतून प्रतीत होणारें तुझें कथानियंत्रणतंत्र देवसृष्टींतून प्रतीत होणाऱ्या तंत्राइतकें निर्दोष आहे. तुझ्या कलेचा आस्वाद घेणाऱ्या रसिकाची अनुभूति दिव्य स्पर्श झाल्यासारखी थरारून जाते. "

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 92203





‘ हरीचिया दासा नाहीं भयचिंता ’ अशी तुकोबांची अभंगवाणी आहे. जो सर्वभावें श्रीहरीला शरण जाईल आणि त्याचा दास बनेल, त्याला कसलीहि चिंता करायचें, कोणाचेंहि भय बाळगायची गरज नाहीं. भय आलेंच तर तें देवानें निवारावें. चिंता वहायची, तर ती देवानेंच वहावी. याला आधार भगवंताच्याच वचनाचा—

‘ तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ’

ज्यांचें चित्त माझ्यामध्यें प्रविष्ट झालें, मद्रूप झालें, त्यांना मृत्यु अन् संसार यांच्या भयांतून मीं तारतों, हें अर्जुनाचें निमित्त करून भगवंतानें भक्तांच्या मांदियाळीला निस्संदिग्ध आश्वासन देऊन ठेवलें आहे.

या आश्वासनांतून प्रेरणा घेऊन दक्षिण भारतांत वैष्णव धर्माची एक प्रचंड लाट उसळली. रामानुजाचार्य अन् त्यांच्यामागून मध्वाचार्य हे दोघे या वैष्णव धर्माचे धुरंधर झाले. रामानुज हे तमिळनाडचे, तर मध्वाचार्य हे कर्नाटकाचे. रामानुजांनंतर एका शतकानें मध्व अवतरले. दोघेहि परम वैष्णव ! दोघेहि भक्तीची कास धरून मुक्तीची वाट चोखाळणारे. पण दोघांच्या विचारांत अन् साधनेंत मात्र थोडा फरक आहे. रामानुजांनीं शंकराचार्यांचें अद्वैत टाकून विशिष्टाद्वैत काढलें. पुढें मध्वाचार्यांना त्यांच्याच विवेचनांत द्वैत गवसलें. त्यांनीं भक्तिमार्गाला धरून त्याचाच परिपोष केला. द्वैतमताचें त्यांनीं तत्त्वज्ञानच बनविलें अन् तें भक्तीच्या पालखींतून मिरवलें.

मध्वाचार्यांचें जीवनचरित्र 'मध्वाचार्यविजय' अन् 'मणिमंजिरी' या दोन ग्रंथांच्या द्वारें जाणतां येतें. यांचा जन्म इ. स. १३१३ मध्यें तुळुनाडमधल्या वेलिग्रामीं झाला. यांचे वडील मधिजीभट्ट. मोठा वेदपारंगत ब्राह्मण. पण त्या दंपतीला मुलें व्हायचीं अन् तीं लगोलग मृत्युमुखीं पडायचीं, असें कित्येकदा घडलें. शेवटीं त्यानें पुत्रकामना मनामध्यें धरून नारायणाची उपासना केली. मग जो पुत्र झाला तो मात्र जगला. आईबापांनीं त्याचें नांव 'वासुदेव'



श्री मध्वाचार्यांचें जन्मघर – वेलिग्राम

असें ठेवलें. लहानपणीं त्याचें विद्याभ्यासाकडे मुळीं लक्षच नव्हतें. तो पटाईत झाला तो पळण्यांत, पोहण्यांत अन् आखाड्यांत उतरून कुस्ती मारण्यांत. त्याचें पुष्ट, कमावलेलें शरीर पाहून लोक त्याला 'भीम' म्हणूं लागले.

पण त्यानंतर पारडें फिरलें. त्याला विद्याभ्यासाची गोडी लागली. संस्कृत भाषेंत त्याची उत्तम गति झाली. पुढें थोड्याच कालांत त्यानें अच्युतपक्षाचार्यांकडून संन्यासदीक्षा घेतली. हे अद्वैती होते. त्यांनीं या भीमाचें 'पूर्णप्रज्ञ' असें नामकरण केलें. लोक त्यांना 'मध्वाचार्य' असें म्हणूं लागले. त्यांनीं गुरूजवळ अद्वैत वेदांताचें सांगोपांग अध्ययन केलें. पण 'अद्वैतीं तों माझें

नाहीं समाधान' अशी त्यांची स्थिति झाली. त्यांचें मन अद्वैताकडे पाठ फिरवून द्वैताकडेच झुकूं लागलें. वेदांतांतल्या अद्वैतपर व्याख्या त्यांना द्वैतपरच दिसूं लागल्या. ते गुरूशीं प्रतिवाद करूं लागले. आपलीं स्वतंत्र मतें आग्रहानें मांडूं लागले.

शेवटीं त्यांच्या अंतरांत द्वैतसिद्धांत पक्का भिनला. त्यांनीं अनेक पंडितांशीं शास्त्रार्थहि केले. पुढें मंगळूरजवळच्या विष्णुमंगल क्षेत्रांत कांहीं काल वास्तव्य करून त्यांनीं अनेक योगसिद्धीहि मिळविल्या. नंतर बऱ्याच तीर्थयात्रा केल्या. अखेर उडिपीला येऊन त्यांनीं तिथेंच कायमचें वास्तव्य केलें. त्यांनीं मग द्वैताला धरून गीता, ब्रह्मसूत्रें अन् दशोपनिषदें यांवर भाष्यें केलीं.

गीताभाष्याच्या रचनेनंतर मध्वाचार्य हिमालयांत बदरिकाश्रमीं गेले. तिथें त्यांना वेद-व्यासांचें साक्षात् दर्शन झालें आणि त्यांनीं आपलें गीताभाष्य व्यासानां समर्पित केलें, अशी आख्यायिका सांगतात. व्यासांनीं प्रसन्न होऊन त्यांना विष्णूच्या तीन शालिग्राममूर्ति दिल्या अन् त्या मध्वाचार्यांनीं वेगवेगळ्या तीन ठिकाणीं स्थापल्या. त्यांतली एक मूर्ति उडिपीला आहे. उडिपीला मध्वाचार्यांनीं एकूण आठ मंदिरें उभारलीं. त्यामुळें माध्वमतानुयायांचें उडिपी हें आदिक्षेत्र बनलें आहे.

मध्वाचार्यांची दुसरी कामगिरी म्हणजे त्यांनीं आपल्या अनुयायांतली यज्ञीय पशुहिंसा बंद केली हें होय. यज्ञांत बोकड मारायचाच, तर त्याचा प्रतिनिधि म्हणून 'पिष्टपशु' करावा असें त्यांनीं आज्ञापिलें. मध्वाचार्यांना जवळ जवळ ८० वर्षांचें आयुष्य लाभलें आणि तें त्यांनीं भक्तीच्या प्रचारांत सार्थकीं लावलें.

शंकराचार्यांच्या मायावादाला विरोध करण्यासाठीं वासुदेवानें मध्वाचार्यांच्या रूपानें अवतार घेतला, असें माध्व मंडळी मानतात. मायावाद म्हणजे प्रच्छन्न बौद्ध तत्त्वज्ञान होय, अशी त्यांची धारणा आहे. श्रीकृष्ण अन् पांडवांतला भीम यांनीं प्रथम खरा धर्म सांगितला. हा द्वैतप्रधान वैष्णवधर्म प्रथम वायूनें हनुमंताला उपदेशिला, हनुमंतानें तो भीमाला दिला अन् भीमाकडून मध्वाचार्यांना मिळाला, अशी माध्वांची श्रद्धा आहे.

अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

मध्वाचार्य हे कोणत्याहि स्वरूपांत अद्वैत मानीत नाहींत. जीवाला मोक्ष मिळाला, तरी त्याहि अवस्थेंत तो परमात्म्याशीं एकरस होत नाहीं. त्यांच्या मतें परमात्मा हा जगत्कारण आणि जगन्नियंता आहे. सृष्टीच्या प्रारंभीं तोच एकमेव होता अन् ब्रह्मा, शिव हे कोणीहि नव्हते—



श्री मध्वाचार्य

'एको नारायणो ह्यासीन्न ब्रह्मा न च शंकर:'

तो अनंत-गुणी आहे, सर्वज्ञ आहे, परिपूर्ण आहे. ज्ञान, आनंद इत्यादि गुण-विशेष हें त्याचें शरीर. त्याला अवयव नाहींत; पण तो मानवाच्या सकलेंद्रियांत वास करून सर्व कार्यें करतो. जीवाला बंधमोक्ष तोच देतो. तो एक असूनहि नाना रूपें धारण करतो. त्याचे मत्स्यादि अवतारहि अंशमात्र असून स्वयंपरिपूर्ण आहेत.

"अवतारादयो विष्णोः सर्वे पूर्णाः प्रकीर्तिताः"

ते पूर्णातून पूर्णत्वानेंच आकाराला आले आहेत. देश, काल किंवा सामर्थ्य या तिन्हीं बाबतींत अवतार अन् परमात्मा यांच्यामध्यें तारतम्य किंवा कमी-अधिकपणा नाहीं.

लक्ष्मी ही या परमात्म्याची शक्ति. तिचे 'अचिंत्य,' 'आधेय,' 'सहज' अन् 'पद' असे चार भेद आहेत. ती परमात्म्याहून भिन्न, पण त्याच्याच आधीन आहे. तंत्रमतांत शक्ति अन् शक्तिमान् यांचा अभेद असतो. पण मध्वाचार्य तसें न मानतां शक्तिरूप लक्ष्मीला विष्णूपासून वेगळी ठेवतात. कारण, ती विष्णूप्रमाणेंच नित्यमुक्त आहे. श्रीहरि तिला प्रेरणा देतो. मग ती सृष्टि निर्माण करते. आणि अचेतन प्रकृत्तीचें नियंत्रणहि करते.

माध्व तत्त्वज्ञानांत लक्ष्मीनंतर वायूला महत्त्व आहे. एका बाजूला लक्ष्मी-सहित परमात्मा अन् दुसऱ्या बाजूला अनंत जीव, यांच्यामध्यें वायूचें स्थान

आहे. म्हणून त्याचें नांव ' मध्यम.' तो ज्ञान, भक्ति अन् विरक्ति या गुणांत सर्व जीवांहून श्रेष्ठ आहे. म्हणून त्याला ' जीवरतोम ' म्हणायचें. हा वायुच श्रीहरीच्या आज्ञेनुसार जीवांना मोक्ष देतो.

जीव हा अज्ञान, मोह, दुःख, भय, इत्यादि दोषांनीं ग्रस्त आहे. अविद्या हा त्याचा विशेष धर्म आहे. मोक्षासाठींहि तो परमात्म्याच्या अधीनच असतो. भगवंताचा अनुग्रह झाल्यावांचून कोण्याहि जीवाला मोक्ष लाभायचा नाहीं. त्यासाठीं प्रथम सम्यक् ज्ञानाची गरज आहे. या सम्यक् ज्ञानाचें एकमेव साधन म्हणजे भक्ति. हें सम्यक् ज्ञान म्हणजे पंचविध भेदांचें ज्ञान होय. ईश्वराचा जीवाशीं अन् जडाशीं भेद, जीवाचा जडाशीं, अन् दुसऱ्या जीवाशीं भेद, आणि जड पदार्थाचा दुसऱ्या जड पदार्थाशीं भेद, असे हे पांच भेद आहेत. या सम्यक् ज्ञानाचें एकमेव साधन म्हणजे भक्ति. ही भक्ति दशविध आहे. सत्य बोलणें, हित बोलणें, प्रिय बोलणें, सत्पात्रीं दान, स्वाध्याय, विपन्नांचा उद्धार, शरणागताचें रक्षण, दीन-जनांचें दैन्य-दारिद्र्य दूर करणें, भगवंताचा दास बनण्याची आकांक्षा धरणें आणि गुरूवर तशीच शास्त्रावर श्रद्धा, हीं भक्तीचीं दशांगें होत. भक्तीच्या जोडीला विरक्तिहि हवीच. अन् त्याशिवाय उपास-तापास आणि व्रतवैकल्येंहि आलींच.

अशा या भक्तींत सर्व भाव एकवटले, कीं मग भगवंताचा अनुग्रह होतो; आणि त्यानंतर कैवल्य हातीं येतें. माध्वांची सायुज्य मुक्तिहि सामरस्याची नाहीं. कारण, सामरस्य म्हटलें कीं, अद्वैत आलेंच. भगवंताच्या शरीरांत प्रवेश करून त्याच्या इंद्रियांनीं विषयोपभोग घेणें म्हणजे ' सायुज्य ' अशी त्यांची मांडणी आहे.

माध्वांच्या उपासनेचीं तीन अंगें मुख्य आहेत. पहिलें 'अंकन'—म्हणजे भगवंताच्या शंख, चक्र, गदा, इत्यादि चिन्हांनीं देह अंकित करणें अन् तप्त मुद्रा धारण करणें. माध्व ओळखण्याची मुख्य खूण म्हणजे गंधाचा उभा नाम. तो नाकापासून एखाद्या प्रशस्त राजमार्गासारखा निघतो अन् मस्तकावरच्या केंसांत विलीन होतो. त्या गंधांत मध्यभागीं तशीच एक काळी रेघ निघते अन् तीहि तशीच मस्तकाला भिडते. जणूं इडा—पिंगला यांच्या मध्यभागीं वाहणारी सुषुम्ना नाडीच ! अन् या गंधाच्या जोडील

कानाजवळ, बाहूंवर अन् हृदयावर गोपीचंदनाच्या मुद्राहि असतात. दुसरें अंग 'नामकरण'—म्हणजे आपल्या संततीला भिक्या, धोंड्या, गुंड्या, अशीं निरर्थक नावें न ठेवतां तिचें विष्णुवाचक 'नामकरण' करणें. आणि तिसरें म्हणजे सतत 'भजन.' 'हरिभजनावीणकाळ घालवूं नको' हा मध्वाचार्यांचा सर्व सांप्रदायिकांना उपदेश आहे.

मध्वाचार्यांना कर्नाटकांत अनेक अनुयायी लाभले. त्यांनीं माध्वसंप्रदाय सामान्य जनांपर्यंत नेऊन पोंचवला. माध्वमताची ही सर्व मंडळी 'हरिदास' या नांवानें कर्नाटकांत संघटित झाली. हे हरिदास आपले समूह करून सर्वत्र हिंडत आणि आपलीं ' कीर्तनें ' गाऊन जनांत भक्तीचा प्रचार करीत. त्यामुळें त्या संस्थेचें नांवच ' दासकूट ' असें पडलें.

या दासकूटांची अन्य कशावरहि भिस्त नव्हती. त्यांना सण उत्सव लागू नसत. ते व्रतांची कदर करीत नसत. आकाशांतील सूर्यचंद्रादि ग्रहांना जुमानीत नसत. त्याचें एकमेव साधन म्हणजे श्रीहरीची भक्ति. सगुण, निर्दोष, दयाळू, आणि प्रतिपालक असा श्रीहरि त्यांनीं कल्पनेनें निर्माण केला अन् ' येथें अलंकार शोभती सकळ ' अशा कीर्तनांनीं त्याला नटवलें, तसेंच भक्तीनें भिजवलें. श्रीहरि त्यांचा जीवनाधार झाला. त्याच्या दास्यभक्तीचा त्यानीं कर्नाटकभर डांगोरा पिटला. अन् बाळ्याभोळ्या जनतेला त्याच्याकडून योगक्षेमाचें आश्वासन मिळवून दिलें.

या हरिदासांची म्हणजेच दासकूटांची परंपरा नरहरितीर्थांपासून सुरू होते. नरहरितीर्थ हे मध्वाचार्यांचे समकालीन होते आणि त्यांचे पट्टशिष्यहि होते. मध्वाचार्यांच्या निर्याणानंतर त्यांच्या गादीवर हेच बसले. यांचें मूळ नांव श्यामशास्त्री. साहित्यक टोपण नांव ' रघुकुलतिलक. ' हे संस्कृतांतले पारंगत विद्वान् खरे; पण पुढें 'घटपटादि खटपट' टाकून भक्तिमार्गांत दाखल झाले. यांनींहि अनेक कीर्तनें रचलीं आहेत. यांची भक्ति तुकोबांच्या जातीची आहे. यांनीं श्रीहरीला कांहीं रोख ठोक सवालहि केले आहेत. पण त्यांची मुख्य कामगिरी ही, कीं त्यांनीं अनेक 'हरिदास' एकत्र जमवून त्यांची संघटना बांधली आणि त्यांना भक्तीच्या प्रसारासाठीं देशभर हिंडवलें.

त्यांच्यामागून श्रीपादराय आले. यांनीं आपल्या गाढ विद्वत्तेवर विजय-नगरच्या सम्राटांकडून जहागीर मिळवली. हे उडिपींत म्हणजे माध्वपीठांत बराच काल राहिले. यांना कन्नड भाषेचें प्रेम अपार होतें. उडिपीचें मूळ पूजाविधान संस्कृतांत होतें; पण त्यांनीं त्या जागीं कन्नड भजनें गाण्याची प्रथा चालू केली. हेच पुढें व्यासरायांचे दीक्षागुरु झाले.

व्यासराय ही दासकूटांत एक असामान्य विभूति गणली जाते. कावेरी तीरावर बेन्नूर गांवीं यांचा जन्म झाला. हे मोठे नैयायिक होते. 'न्यायामृत' 'तर्कतांडव' इत्यादि न्याय-दर्शनावरचे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांच्या 'न्यायामृत' या ग्रंथानें द्वैताद्वैत संप्रदायांतील घनघोर वाग्युद्धाची अवतारणा केली आणि आजहि खंडनमंडनाच्या रूपानें ती चालू आहे. विजयनगरच्या सम्राटांचे राजगुरु होण्याचा मान त्यांनीं मिळवला होता. ते विजयनगरचे राजकीय सल्लागारहि होते. सम्राट् त्यांना 'धर्माचे आधारस्तंभ' म्हणून गौरवीत. साम्राज्याच्या उत्कर्षांत यांच्याहि राजनीतिनिपुण बुद्धीचा अंशभाग होता. बंगालच्या चैतन्य देवांचे हे गुरु होते, अशी आख्यायिका आहे. आजहि चैतन्यमताचे अनुयायी स्वतःला व्यासरायमठाचे शिष्य समजतात. यांची बुद्धि जितकी प्रखर, तितकीच भक्तिहि समर्थ ठरली आहे. यांनींच 'हरिदासपंथ' लोकव्यापी केला. यानींच संप्रदायांतला 'उंच निंच' भेद नष्ट, करून सर्वांना समान भूमिकेवर आणलें. यांनींच भक्तीचें द्वार आचांडाल सर्वांना खुलें केलें.

अशा प्रकारें १३ व्या शतकांत उगम पावलेली ही दासपरंपरेची गंगोत्री आपल्या अखंड प्रवाहानें १८ व्या शतकाला येऊन भिडली. या हरिदासांची गणनाच करायची, तर ती दोनशेंच्यावर जाईल. या मालिकेंत कांहीं मुकुट-मणिहि आहेत. त्यांपैकीं कांहींचा परामर्श वर घेतलाच आहे. आणखी कांहीं महामहिम आहेत, त्यांचें स्तोत्र पुढें करीन.

श्री. करमरकर हे 'मिस्टिक् टीचिंग ऑफ् हरिदासाज्' या आपल्या ग्रंथांत हरिदासांच्या विचारसरणीचा मागोवा घेऊन त्यांचे तीन वर्ग करतात—

पहिला वर्ग—विजयदास, जगन्नाथदास, वेंकटेशदास यांचा. हे मुख्यत्वें माध्वमतावलंबी होते. यांनीं आपल्या साहित्याच्या द्वारें मध्वाचार्यांचें तत्त्वज्ञान लोकांना सुलभ केलें.

दुसरा वर्ग- व्यासराय, गोपालदास, सुवर्णदास यांचा. यांनीं भक्तीबरोबरच कर्म आणि ज्ञान यांच्यावरहि भर दिला. आणि

तिसरा वर्ग—पुरंदरदास कनकदास यांचा. यांनीं जातपात न मानतां मेघवृष्टीनें सर्व जनांना भक्तिमार्ग उपदेशिला. त्या बरोबरच धर्म, सदाचार, नीति यांचीहि शिकवण दिली. जनमनावर यांचा प्रभाव आजहि इतका गंभीर अन् खोल आहे, कीं ‘ दासकूट ’ असें म्हणतांच पहिलीं दोन नांवें याच दोघांचीं उच्चारलीं जातात. तुलनेनें सांगायचें तर पुरंदरदास आणि कनकदास हे कर्नाटकाचे ‘ नामदेव—तुकाराम ’ आहेत.

कर्नाटकाच्या ओंजळींतून सदैव भावभक्तीची पुष्पवृष्टि घेणारा हा पुरंदरदास मूळचा मराठी मायबोलीचा सुपुत्र होता, हें आवर्जून सांगायला हवें. महाराष्ट्रानें कर्नाटकाला बहाल केलेला हा भक्तीचा कल्पवृक्ष आहे. यानें आपल्या ‘ कीर्तनांत ’ स्वतःविषयीं मौनाची मिठी घातली असल्यानें त्याच्या जीवनाची रूपरेखा निश्चितपणें सांगणें कठीण आहे. पण कमलापूर गांवीं एक ताम्रपट मिळाला आहे; त्यावरून असें कळतें, कीं हा देशस्थ यजुर्वेदी अन् वसिष्ठगोत्री ब्राह्मण होता. याचा जीवनकाल सामान्यतः इ. स. १४८० ते १५६४ असा धरतात.

पुणें जिल्ह्यांतलें पुरंदर हें यांचें मूळ वास्तव्यस्थान. पूर्वीचें नांव श्रीनिवास. हा मोठा धनकनकसंपन्न होता. याची व्यापारी पेढी होती अन् मोठी सावकारीहि होती. वयांत आल्यापासून याला एकच नाद गोड लागत होता अन् तो म्हणजे छन् छन् वाजणाऱ्या रुपयांचा. द्रव्य मिळवणें अन् सांठवणें एवढेंच त्याला ठाऊक होतें. मुलखाचा कृपण म्हणून तो प्रसिद्ध होता. त्यानें द्रव्य कधीं भोगलें नाहीं, कधीं त्यागलें नाहीं. पदरची दमडी काढायची झाली, कीं त्याच्या प्राणांना ऊर्ध्व लागे. पण त्याची धर्मपत्नी सरस्वती ही अगदीं त्याच्या उलट होती. कोणाच्याहि डोळ्यांतलीं आंसवें पाहून ती द्रवे. कोणी भुकेला दीनदुबळा दिसला, तर तिचा जीव कळवळे. तिची ही दानवृत्ति त्या ‘ चिकणमामा ’ ला परवडणारी नव्हती.

त्यामुळें त्यानें किडूकमिडूकसुद्धा तिजोरीबंद करून तिचे दानी हात निष्क्रिय केले.



संत पुरंदरदास

पण या सावकाराचें पूर्वपुण्य बलवत्तर होतें. भविष्यकाळांत तो एका महान् आध्यात्मिक साम्राज्याचा स्वामी होणार होता. म्हणून पंढरीच्या पांडुरंगानेंच त्या भविष्याचा अभिक्रम स्वतःकडे घेतला. तो ब्राह्मणाच्या रूपानें या सावकाराच्या पेढीवर आला. त्रैलोक्याचा तो धनी त्याला उद्धरण्यासाठीं त्याच्या दारींचा दीन याचक झाला. त्यानें तोंड वेंगाडून सावकाराला म्हटलें.

" सावकार ! मी गरीब ब्राह्मण ! पदराला एक मुलगी आहे, तिला उजवीन म्हणतों. पण गांठीला तांबडा पैसा नाहीं. आपण कांहीं मदत केलीत, तर पोरगी संसाराला लागेल. "

सावकारानें त्या याचकाला कस्पटाप्रमाणें झटकून टाकलें. पण तो याचकहि मोठा कोडगा निघाला. तो रोज सकाळ-संध्याकाळ सावकाराच्या पायरीला बसे अन् तुसड्या शब्दांची पूजा घेऊन परत निघे. अखेर शेवटीं त्याची खात्री पटली, कीं दाता याचकापेक्षांहि चिकट आहे.

मग त्यानें निराळा मार्ग धरला. सावकार पेढीवर असतांना तो त्याच्या घरीं गेला. तेंच पूर्वीचें रडगाणें सरस्वतीपुढेंहि रडला. सरस्वती मुळीं दयेची देवताच होती. तिला वाटलें, कीं या ब्राह्मणाला कांहींतरी मदत करायलाच हावी. पण तिच्या हातांत होतें काय! भरल्या घरांत तिचे हात कोरडे! पण कांहीं क्षण विचार केल्यावर तिला सुचलें, कीं आपल्या नाकांत नथ आहे. टपोऱ्या मोत्यांची अन् पाणीदार खड्यांची! कुठल्याहि सराफकट्टयावर नेली, तरी तिचे शें-पांचशें रुपये सहज हातीं लागावे. म्हणून तिनें ती नथ काढून सहानुभूतीच्या ओल्या शब्दांत भिजवून त्याच्या ओंजळींत टाकली. तिनें म्हटलें. ' भटजीबुवा, हौसेनं मुलीचं कार्य करा.'

पण तो ब्राह्मण तरी कसला खमंग! तो ती नथ घेऊन त्या सावकाराकडेच गेला. त्याच्या हातीं ती नथ देऊन म्हणाला, कीं ' मला ही नथ विकायची आहे, काय मोल करतां बोला ! ' सावकारानें नथ हातीं पडतांच ओळखलें, कीं हा आपल्याच घरचा ' नग ' आहे. त्यानें ती नथ तिजोरींत बंद करून ब्राह्मणाला म्हटलें. 'संध्याकाळीं या, त्यावेळीं मोत्याचं पाणी वगैरे पारखून किंमत तुमच्या पदरांत घालीन. '

सावकार तसाच तडक घरीं आला. अन् त्यानें ' आग्या-वेताळ ' बनून सरस्वतीला ठणकावलें. ' तुझी नथ कुठें आहे ती आण ! ' सरस्वती मनांत चरकली, कीं आपलें धर्म करतां कर्म ओढवलें आहे. तिनें प्रथम 'वारें पाणी' करून पाहिलें. पण सावकाराचा हेका सुटेना. तो गर्जून बोलला कीं, ' नथ आणून दिली नाहींस, तर जीवच घेईन तुझा ! '

बिचारी सरस्वती ! दुःखी, कष्टी होऊन ती घरांत गेली. तिला खरोखर जिवाचा वीट आला. पैशाला परमेश्वर मानून माणुसकीला पदोपदीं तुडवणाऱ्या असल्या नवऱ्याच्या हातून तिनें कायमची सुटका करून घेण्याचें ठरवलें. तिनें आपल्या संग्रहांतून एक विषाची कुपी बाहेर काढली. तें विष एका पेल्यांत ओतलें. परमेश्वराला एकवार शेवटचे हात जोडले अन् शेवटीं तो पेला ओठाला लावण्यासाठीं वर उचलला. एवढ्यांत त्या पेल्यांत वरून कांहींतरी टपकलें. काय आहे म्हणून चांचपडते, तर तिची नथ ! जी स्वहस्तें

ब्राह्मणाच्या ओंजळींत टाकली तीच ! तिला ती ईश्वरकरणी अघटित वाटली. तिनें ती नथ लगेच आणून नवऱ्याच्या हातीं दिली.

आतां मान खालीं घालण्याची पाळी आली सावकारावर ! त्याला हें गौड-बंगाल काय झालें आहे, तें कळेना. तो तसाच धावत पळत पेढीवर गेला. तिजोरी उघडून पहातो, तों खणांत नथ नाहीं ! तो मनांत म्हणाला, ' सात कुलपांतलीं नथ इथून घरीं गेली कशी ? केवढें महदाश्चर्य ! ही त्या कर्तुम-कर्तुम् समर्थ अशा परमात्म्याचीच लीला असेल का ? तोच ब्राह्मणाच्या रूपानें आपलें सत्त्व पहायला आला असेल का ? अन्यथा असा दैवी चमत्कार कसा घडेल........! '

त्यानें त्या ब्राह्मणाचा गांवांत शोध केला. पण कुठेंहि त्याचा पत्ता लागला नाहीं. लपलेला देव शोधायला चर्मचक्षु काय कामाचे ! तो ब्राह्मण कुठून तरी परत येईल, म्हणून त्यानें दुपारपर्यंत वाट पाहिली. पण तो मुळीं आलाच नाहीं. मग मात्र सावकाराची खात्री पटली, कीं ही परमेश्वरी लीलाच आहे. आपले धनमदानें धुंद झालेले डोळे निर्मळ करायला तोच स्वतः आला अन् स्वयें कष्टला. धिक्कार असो आपल्या जिण्याला !

त्याच्या बुद्धींत एकाएकीं विचारक्रांति झाली. तो पेढीवरून घरीं आला तो एकदम वेगळाच होऊन. ज्या धनलालसेनें त्याला आजवर बांधून घातलें होतें, ती लालसा त्या धनराशीसह त्यानें तोडून टाकायचें ठरविलें. त्यानें गांवातल्या सर्व भिक्षुकांना अन् याचकांना दवंडी देऊन निमंत्रण केलें. शेंकडों लोक कांहींतरी लभ्यांश असावा, म्हणून त्यांच्या दारीं गोळा झाले. मग तो सर्वांना भुजा उभारून म्हणाला, ' लुटा हें घर ! लुटा तें दुकान ! ज्याला जें हवें अन् जें मिळेल तें खुशाल घेऊन चला ! '

थोड्याच वेळांत त्याचें सारें धन लुटलें गेलें. सावकार सर्वस्व-दानाच्या तीर्थांत न्हाऊन निघाला. मायामोहांच्या मलांतून स्वच्छ झाला. निष्कांचन वृत्तीचें वस्त्र नेसला. अन् सर्वार्थीं दास होऊन प्रभुपदीं विनम्र झाला. आतां गांवांत राहण्याचें प्रयोजन संपलें होतें म्हणून तो आपल्या पत्नी-पुत्रांसमवेत पंढरपुरीं आला. पण माणूस कुठेंहि गेला तरी त्याला दुपारची वेळ चुकवितां

येत नाहीं. पण त्यासाठीं काय करावें, हा प्रश्न त्याच्या पुढें उभा राहण्यापूर्वीच बायकोनें चौपदरी तयार करून त्याच्या खांद्याला अडकवली. ती आठवण सांगतांना पुरंदरदास म्हणतो—

" एका हातांत कमंडलु अन् दुसऱ्या हातीं वेताची काठी घेऊन भीक मागतांना प्रथम मला लाज वाटे. मान खालीं झुके. पण बायकोनें मला भिक्षायज्ञाची दीक्षा देऊन पुढें ढकललेंच. ती मोठी धीराची. अशा स्त्रिया या देशात हजारों जन्मोत. झालें तें चांगलें झालें. आतां पांडुरंगाच्या सेवेला भरपूर अवसर मिळाला......."

पुढें तो म्हणतो—

'पायांत घुंगरू, एका हाती तंबोरा, दुसऱ्या हातीं करताल अन् खांद्याला झोळी, अशा परिवेषांत मीं गात गात भिक्षेला निघालों तों काय !

" नडिवुदेल्लवु नारायणन कीर्तने योन्नि
नडेवु बेल्लवु देवर यात्रेयोन्नि
कोडुवु दानवु कामजनकगर्पित वेन्नि
एडेय अन्नवु हरियप्रसादवेन्नि "

' बोलणेंच भजन झालें. चालणें तीर्थयात्रा ठरली. मागणें देणें कृष्णार्पण. शिळें भोजन हरिप्रसाद ! '

पुढें त्यानें भारतयात्रा केली. नंतर तो व्यासतीर्थांच्याकडे आला. त्यांच्याकडून त्यानें वैष्णव दीक्षा घेतली. व्यासरायांनीं त्याचें नांव ' पुरंदर विठ्ठल ' ठेवलें. हरिकृपेनें पुरंदरदासाच्या हृदयांत कवित्व संचरलें. त्यानें चार लक्ष पंचाहात्तर हजार ' कीर्तनें ' म्हणजे गेय पद्यें रचलीं, असें म्हणतात. नामदेवानें शतकोटी अभंग रचले म्हणतात, त्या जातीचीच ही आख्यायिका आहे. खरी गोष्ट ही, कीं त्याचीं कांहीं हजारच कीर्तनें उपलब्ध आहेत. जीं आहेत तीं अस्सल आहेत. त्यांतली भक्ति, वृत्ति अन् शक्ति पाहून त्याचे गुरु व्यासराय यांनीं म्हटलें आहे, कीं ' हीं कीर्तनें म्हणजे ' पुरंदरोपनिषद् ' होय.'

पुढे यानें जीवनावधि हरिसेवा केली. अमोध अनुभव दिले, घेतले. सर्वांना सन्मार्गाचा उपदेश केला. कन्नडिगांचें सांस्कृतिक जीवन उन्नत केलें. वैष्णव

असूनहि यानें शिवाची अन् शिवपरिवाराची निंदा केली नाहीं. पण याला मात्र निंदक भेटलेच. पण त्यानें त्यांचेंहि भलेंच चिंतिलें. तो म्हणतो--

" हंदि इद्दरे केरि ह्यांगे शुद्धियो हांगे
निंदकरु अदंदु माडिद पापवेंब
भलतंब होगिवरु
दुरुळ जनगळु चिरकल विरुवंते
करव मुगिदु वर बड वेन्नु "

'ज्या गल्लींत ग्रामसूकर असतात, ती गल्ली साफ राहते. हे निंदकहि सूकरांप्रमाणेंच आहेत. ते हरिभक्तांचा पापरूप मल खाऊन त्यांना साफ ठेवतात. मी देवाला प्रार्थितों, कीं 'हे लोक चिरंजीव होवोत.' इथें नाथांच्या एका पद्यचरणाची सहज आठवण होते. त्यांनींहि निंदकाला, 'आत्मारामाचा गडी' मानून पुढें म्हटलें आहे—

" निंदक अमुचा सखा। आमुचीं वस्त्रें धुतो फुका "

पण पुरंदरदासाची नाथांवरहि कडी आहे यांत शंका नाहीं.

पुरंदरदासाचें महत्त्व दुसऱ्याहि एका गोष्टींत सांगितलें पाहिजे. तो कर्नाटक संगीताचा प्रवर्तक आहे. कर्नाटक संगीत म्हणजे कर्नाटकाचें संगीत असा त्याचा अर्थ नव्हे. ती हिंदुस्थानी संगीताहून वेगळीं अशी 'गायनी कळा' आहे. तिला स्वतंत्र अशी शास्त्रीय बैठक आहे. महाराष्ट्र सोडून उभ्या दक्षिण भारताचें तें संगीत आहे. हिंदुस्थानी संगीत, राजे-महाराजे यांच्या दरबारांत अन् विलासी वातावरणांत पोसलें, वाढलें, तर कर्नाटक संगीत दक्षिण भारतांतल्या संत गायकांनीं वैष्णव भक्तीच्या अनुषंगानें वाढवलें. त्याचा शुद्ध नि शाश्वत असा पाया पुरंदरदासानें घातला. त्यानें कित्येक नव्या रागरागिण्याहि आपल्या स्वतंत्र प्रज्ञेतून निर्माण केल्या. आंध्रांतला त्यागराज हा महान् गायक आणि संगीतशास्त्रज्ञ मानला जातो. तुकोबांना जसा केशवचैतन्यांकडून स्वप्नोपदेश मिळाला, त्याचप्रमाणें त्यागराजाला पुरंदरदासाकडूनच संगीताची स्वप्नदीक्षा लाभली. पुरंदरदासानें रचलेल्या पायावर त्यानें या संगीताचा प्रासाद उभा केला. पुढें शामशास्त्री, मुत्तुस्वामी

दीक्षितार इत्यादि गानपंडितांनीं त्या प्रासादाला विविध अलंकारांनीं नटवलें, सजवलें.

पुरंदरदासाची ही संगीतरचना, सुळादि, कीर्तन, आणि उगाभोग अशा तीन भागांत विभक्त आहे. त्याचीं हीं सारीं कीर्तनपदें, भक्तिपर, धर्मप्रवण, नीतिशुद्ध आणि रागबद्ध आहेत. त्यांची भाषा संस्कृतनिष्ठ पण प्रवाही आहे. त्यानें कन्नड लोकोक्तींचा मुक्तहस्तानें वापर केला आहे. कर्नाटकांत भक्ति हा लोकधर्म बनला, त्याचें बरेंचसें श्रेय पुरंदरदासाला आहे. तो म्हणतो—

> " इदु भाग्यविदु भाग्यवैय्या
> पदुमनाभन पादस्मरणे सुखवैया "

" भक्ति हेंच संसारांतलें परम भाग्य ! पद्मनाभाच्या चरणांचें स्मरण, हेंच परम सुख ! "

पुरंदरदास आपल्या जीवनाच्या संध्याकाळीं हंपीला वास्तव्य करण्यासाठीं आला आणि तिथेंच त्यानें आपला देह ठेवला.

पुरंदरदासानंतर त्याच तोलामोलाचा हरिदास कवि म्हणजे कनकदास. हा जातीनें व्याध होता. धारवाड जिल्ह्यांतील बाड या गांवीं याचा जन्म झाला. याच्याविषयीं आख्यायिका सांगतात ती अशी—हा प्रथम एका राजाच्या सेनादळांत मोठा अधिकारी होता. पण भगवंताच्या मनांत त्याच्या हस्तें कांहीं वेगळें घडवायचें होतें. त्याच्याकडून समाजाची सेवा तलवारीनें नव्हे; तर रसवंतीच्या द्वारें करून घ्यायची होती. म्हणून देवानें त्याला एका रात्रीं स्वप्नदृष्टांत देऊन सांगितलें, कीं 'तूं हरिदास हो !' पण कनकदासानें तो दृष्टांत ऐकला न ऐकलासा केला. तलवार टाकून चिपळ्या हातीं घेणें, हें काय पुरुषार्थाचें लक्षण !

पण पुढें थोड्याच काळांत एक युद्धप्रसंग ओढवला अन् आयुष्यभर लक्षांत राहील असा गंभीर पराभव त्याला त्या युद्धांत खावा लागला. मग त्याचे डोळे उघडले. मग त्यानें तो ईश्वरी आदेश मानायचें ठरवलें. तो

नांवाचा नव्हे; तर खराखुरा 'हरिदास' बनला. त्याच क्षणीं त्याच्या अंतरांत रसवंतीचा झरा फुटला. मग उडिपीला जाऊन त्यानें व्यासरायांकडून दास-दीक्षा घेतली. पुढें कांहीं काल तिथेंच राहून त्यानें गुरुसेवाहि उत्कट अशा भावभक्तीनें केली.

तो हीन यातीचा; त्यामुळें उडिपीच्या देवमंदिरांत त्याला प्रवेश नव्हता. चोखोबाप्रमाणें नुसत्या कळसाच्या दर्शनानेंच त्याला देवदर्शनाचें समाधान मानून घ्यावें लागे. इथें आणखी एक चमत्कार घडला. एका रात्रीं त्याला भजन करण्याची अनावर इच्छा झाली. मंदिराच्या पश्चिम अंगाला बसून त्यानें श्रीहरीचें स्तवन मांडलें. देहभान हरपावें इतका तो त्या भजनांत रंगला. रात्र केव्हां संपली, दिशा केव्हां उजळल्या, त्याचाहि त्याला पत्ता लागला नाहीं. सकाळीं पुजारी पूजासाहित्य घेऊन मंदिरांत आले, तर देवाचें तोंड आपलें पश्चिमेला ! या घटनेंतलें रहस्य उडिपीच्या लोकांना जाणून घ्यावें लागलें. हा कनकदासाचा प्रभाव आहे, हें त्यांनीं ओळखलें. मग देवस्थानाच्या चालकांनीं पश्चिमेच्या अंगानें मंदिराला एक नवी खिडकी पाडली. आजहि ती खिडकी 'कनकन किंडी' म्हणून दाखवतात.

कनकदासानें पुरंदरदासाप्रमाणेंच हजारों कीर्तनें रचलीं आहेत. तो जनजीव-नाचा जाणिता होता. जनभाषेचा पंडित होता. त्याच्या काळांत कर्नाटकांत शक्तिपूजेचें प्राबल्य होतें. देवीच्या नांवानें शेंकडों हजारों पशूंचीं मुंडकीं धडा-वेगळीं होत होतीं. कनकदासानें या शाक्तांवर कडाडून हल्ला चढवला आहे. एखाद्याचा उपहास करण्यांत तो सराईत आहे. हरिदास किंवा मठपति म्हणवणाऱ्या महंतांना त्यानें त्यांचें वास्तव स्वरूप उघड करून दाखवलें आहे. तो म्हणतो—

"एल्लारु माडुवदु होट्टेगागि
गेणु बट्टेगागि तुत्तु हिट्टिगागि
ताळदंडिगे श्रुतिमेळ तंबुरीगोडुम्
सूळेयंते कुणियवुदु होट्टेगागि
गेणु बट्टेगागि"

'तुमचें सगळें हें चाललें आहे तें पोटासाठीं. हातभर लांबीच्या फडक्यासाठीं अन् कोरभर भाकरीच्या तुकड्यासाठीं. तें मंजिरा वाजवणें, तें उच्चासनावर बसणें, तें भावभरी गाणें, तें वेश्येप्रमाणें नाचणें, हें सर्व कांहीं देवासाठीं नव्हे ! तें आहे वीतभर पोटासाठीं अन् हातभार फडक्यासाठीं !"

कनकदासाच्या कीर्तनकृतींत त्याच्या असामान्य व्यक्तिमत्त्वाचें सहजपणें दर्शन घडतें. कर्नाटकांत त्याला पुरंदरदासाइतकीच लोकप्रियता लाभली आहे. वैष्णव असूनहि तो पंथाच्या चौकटींत बसूं इच्छित नाहीं. तो स्वतंत्र विचाराचा स्वच्छंद 'दास' आहे.

१५ व्या शतकांत हरिदास संप्रदायानें उत्कर्षाचें शिखर गांठलें. त्याच काळांत हरिदासांचे दोन विभाग झाले. 'दासरु' अन् 'व्यासरु' अशीं त्यांना नावें मिळालीं. ज्यांनीं संस्कृत भाषेच्या द्वारें आपलीं मतें मांडलीं, ते 'व्यासरु' झाले अन् लोक त्यांच्या समुदायाला व्यासकूट म्हणूं लागले. ज्यानीं कन्नड भाषेचा आश्रय करून कीर्तनसाहित्य निर्मिलें, ते झाले 'दासरु.' त्यांच्या समुदायाला दासकूट असें नांव पडलें. व्यासकूटांत मुख्यत्वेंकरून उच्च जातीचे संत सामील होते आणि दासकूटांत आमजातींची भक्तमंडळी एकवटली होती. या हरिदासाचीं एकूण चार केंद्रें झालीं.

पहिलें उडिपी. तें मध्वाचार्यांनीं स्थापन केलें अन् व्यासरायांनीं त्याचें माहात्म्य वाढवलें. दुसरें महाराष्ट्रातलें पंढरपूर. अनेक दास मंडळी पंढरीच्या विठ्ठलाला उपास्य करून तिथें राहत होती. तिसरें हंपी. हें केंद्र विजयनगर साम्राज्याच्या वैभवकाळीं निर्माण झालें अन् त्याच्या अस्तानंतर तिथून उठलें. आणि चौथें मंत्रालयम्. याची स्थापना १७ व्या शतकाच्या अखेरीस राघवेंद्रतीर्थांनीं केली. हें ठिकाण तुंगभद्रेच्या तीरावर आहे. राघवेंद्र हा पट्टीचा पंडित होता. त्यानें मध्वाचार्यांच्या तत्त्वज्ञानावर विस्तृत टीका लिहिल्या आहेत. याच्या काळांत दाससंप्रदाय चक्रनेमिक्रमांत सांपडला होता. त्याचें तेज मंद पडलें होतें. राघवेंद्राला त्याची खंत वाटून त्यानें व्यासकूटाचें पुनरुज्जीवन आणि संघटन केलें. त्याच्या संघटनचातुर्यानें व्यासकूट ऊर्जित झालें नाहीं, तर दासकूटालाहि नवी चेतना मिळाली. आजहि मंत्रालयम् हें माध्वांचें एक महाक्षेत्र राहिलें आहे.

हरिदासांचें बहुमुखी कीर्तन–साहित्य कर्नाटकला गंगेप्रमाणें पावन अन् संजीवक ठरलें. कन्नडिगांच्या सांस्कृतिक विकासाला तें मोठें उपकारक झालें. जें कार्य महाराष्ट्रांत ज्ञानदेव-तुकारामादि संतांनीं केलें, तेंच कर्नाटकांत हरिदासांनीं केलें. मराठी संत हे 'भागवत' तर कर्नाटकसंत हे 'दास.' पण दोघेहि वैष्णव जनच ! दोघेहि 'पांडुरंग हरी'चेच भक्त ! पंपाचें महाभारत किंवा त्याचें नांवहि ठाऊक नसलेले कित्येक भोळेभाबडे जन कर्नाटकांत आढळतील. पण पुरंदरदासाला यच्चयावत् कर्नाटक ओळखतें. त्याचें एक तरी कडवें, एखादें तरी सुभाषित, प्रत्येक कन्नडिगाच्या जिव्हाग्रीं आहेच आहे.

हरिदासानीं भक्तिसाधनेंत संकीर्तन पद्धतीला अग्रमान दिला. त्यामुळें साहजिकच प्रत्येक हरिदास हा कमीअधिक प्रमाणांत गायक झाला. त्यांनीं जें रचलें तें गाण्यासाठींच रचलें. ते गातां गातां नाचूं लागत अन् नाचतां नाचतां नवा चरण जुळवीत. पुष्कळसे हरिदास हे गृहाश्रमी होते. त्यांनीं सामाजिक विषमतेवर कुठार घातला ; पण वर्णाश्रमधर्माला विरोध केला नाहीं. यात्रावर्तीतहि त्यांचें तमिळ आळवारांपेक्षां मराटी संतांशींच जवळचें नातें आहे. त्यांनीं बाह्य आडंबराला तुच्छ मानलें. बडेजावाला धुत्कारलें. त्यांनीं वैराग्यहि प्रतिपादिलें ; पण तें भौतिक विषयांचा उपभोग घेतांना शाश्वत मूल्यें आणि जीवनाचें अंतिम उद्दिष्ट विसरलें जाऊं नये, एवढ्याच अर्थानें. आत्मोन्नति, भगवत्कृपा, ही कोण्या विशिष्ट जातीची मिराशी नव्हे; तर तो मानवमात्राचा ईश्वरदत्त अधिकार आहे, अशी सर्व हरिदासांची घोषणा आहे !






कन्नड भाषा अन् संस्कृति यांच्या विकासक्रमांत वीरशैवपंथाची कामगिरी डोळ्यांआड करतां येत नाहीं. 'वीर विठलाचे गाढे' असें तुकोबानें महाराष्ट्रांतल्या विठलभक्तांना उद्देशून म्हटलें आहे. कर्नाटकांतले विशिष्ट लोक स्वतःला वीरशैव म्हणवून घेतात. शिवभक्तांमधले एकांतिक किंवा वीर म्हणून 'वीरशैव' त्यांच्या गळ्यांत लिंग असतें म्हणून लोक त्यांना 'लिंगायत' म्हणतात. एकट्या शिवालाच सर्वभावें शरण गेल्यामुळें 'शिवशरण' अशीहि उपाधि त्यांना जडली आहे.

वीरशैव संप्रदाय केव्हां निर्माण झाला अन् त्याचा प्रणेता कोण, याविषयीं मतभेदांचें जंजाळ आहे. सामान्य जनांची धारणा अशी, कीं बसवेश्वर हा या संप्रदायाचा जनक आहे. पण इतिहासकार तें मानीत नाहींत. वीरशैव मुळांत शैव आहेत अन् शैवमत हें कर्नाटकाला नवें नाहीं. प्राचीन काळीं कापालिक, कालामुख, इत्यादि शैवपंथ दक्षिण भारतांत वावरत होते, तसे ते कर्नाटकांतहि होते. कित्येक कन्नड राजघराण्यांवर कालामुखांचा प्रभाव होता. त्यांचे मातब्बर मठहि होते. हेच मठ पुढें वीरशैवांच्या उत्कर्षकालीं त्यांच्या मठांत रूपांतरित झाले. तमिळनाडमध्यें प्रचलित असलेल्या शैव मतावर काश्मीरी शैवसिद्धांताचा तसाच गौडीय शैवसंप्रदायाचाहि प्रभाव होता. तोच संप्रदाय पुढें कर्नाटकांत प्रवेशला. डॉ. नंदीमठ यांनीं कित्येक प्रमुख विद्वानांच्या मतांचें आलोडन करून त्यांचा निष्कर्ष सांगितला आहे तो असा—

कर्नाटकांत पूर्वींच प्रचलित असलेल्या शैवमताचा बसवानें परिष्कार केला अन् तें नव्या स्वरूपांत मांडलें. ' वीरशैव ' हें नांवच सांगतें, कीं तें शैव-मताचें परिवर्तित अन् परिवार्धित स्वरूप आहे. बसवानें वीरतेचा अंगीकार करून एका बाजूनें शैव पंथांतील नानाविध विकृति दूर केल्या अन् दुसऱ्या बाजूनें जैनांचें प्राबल्य कमी करून लोकांनां शिवभक्तीकडे आकार्षित केलें. याचा इत्यर्थ असा, कीं या एकांतिक शैव मताचा संस्थापक बसव नव्हे. तो त्या संप्रदायाला क्रांतिकारक वळण देणारा एक धर्मधुरीण आहे.

मग या संप्रदायाचा निर्माता कोण ? पण त्या बाबतींत निराळ्या ठिकाणीं शोधज्योत नेली पाहिजे. वीरशैव पंचाचार्य कल्पना मानतात. रेणुकाचार्य, मरुळसिद्ध, एकोराम, पंडिताराध्य व विश्वाराध्य या पांच शैव आचार्यांनीं युगायुगांत अवतार घेऊन या संप्रदायाचें संचालन केलें. या पांचांतहि एकोराम हा या पंथाचा संस्थापक मानावा लागतो. दंतकथा तशी आहे अन् तिला सोमनाथ मंदिरांतल्या एका शिलालेखाची पुष्टिहि आहे.

' अलंदी ' नगरांतल्या एका वत्सगोत्री ब्राह्मणाचा हा मुलगा. याचें पाळण्यांतलें नांव ' राम ' असें होतें पण त्याची एकांतिक शिवभक्ति पाहून पुढील काळांत लोक त्याला ' एकांतद रामय्य ' म्हणूं लागले. त्याच्या काळीं कर्नाटकांत जैन धर्माचा बराच दबदबा होता. एबलूर हें जैन धर्माचें प्रधान केंद्र होतें. पण हा रामय्य असा बलदंड अन् आक्रमक निघाला कीं त्यानें आपल्या तशाच एकांतिक सहकाऱ्यांसह एबलूरवर धाड घातली, अन् तें विध्वंसून तिथल्या जिनमूर्तींहि उपटून फेंकून दिल्या. हें झालें त्याचें विध्वंसक कार्य. त्याची विधायक कामगिरी म्हणजे त्यानें बांधलेलें वीर सोमनाथाचें भव्य मंदिर. या सर्व हकीगतीवरून एकांतद रामय्या किंवा एकोराम हाच या पंथाचा संस्थापक ठरतो. सुरवातीला हा एक गूढवादी पंथ होता. बसवानें त्या पंथाचा स्वीकार करून त्यावर तत्त्वज्ञानाची इमारत उभारली. बसवाला नंदीचा अवतार मानतात. याचें चरित्रहि गूढतेनें व्याप्त आहे. संप्रदायांत त्याच्याविषयीं कथा, आख्यायिका विपुल आहेत. लिंगायत पुराणांच्या आधारें बसवकथा सांगतां येते ती अशी—

बसवाचा जन्म बागेवाडीस झाला. त्याच्या कालाबद्दल मतभेद आहेतच. सामान्यतः इ. स. ११३० च्या सुमारास त्याचा जन्म मानतात. जात आराध्य ब्राह्मण. बापाचें नांव मादिराज अन् मातेचें मदलांबिका. आठव्या वर्षी आई-बापानीं याचें उपनयन करायचें ठरवलें, तर हा म्हणाला, कीं 'मी जानवें घालणार नाहीं!' लहानपणापासूनच याचे विचार क्रांतिकारक होते. त्याला कर्मकांडाचा विलक्षण तिटकारा होता. आणि त्यामुळेंच जातगंगा त्याच्यावर रुष्ट झाली. आळंदीच्या ब्राह्मणांनीं ज्ञानेश्वरादि भावंडांना जसें छळलें, तीच आवृत्ति त्यापूर्वी बसवाच्या बाबतींत निघाली. बिज्जलाचा प्रधान बलदेव हा त्याचा मामा. तो मात्र आपल्या भाच्याच्या नवीन विचारसरणीवर खूष होता. त्यानें आपली मुलगी बसवाला दिली. तिच्यासह तो कांहीं दिवस कूडल या गांवीं राहिला. पण कुठेंहि गेला तरी त्याच्या मागचा छळवाद कांहीं सुटेना. पुढें त्यानें कप्पडी या गांवीं स्थलांतर केलें. तिथें संगमेश्वर नांवाचें देवस्थान होतें. बसव हा त्या संगमेश्वराचा भक्त बनला.



श्री बसवेश्वर

बलदेवाचा जांवई असल्यामुळें बसवाचा बिज्जलाशीं परिचय झालेला होता. म्हणूनच बलदेवाचा मृत्यु झाल्यावर बिज्जलानें बसवालाच बोलावून घेतलें आणि सासऱ्याच्या अंगावरून उतरललीं प्रधानकीचीं वस्त्रें बसवाच्या अंगावर चढवलीं. बसव राज्यांतला सर्वांत मोठा अधिकारी बनला. आपल्या पंथाचा प्रचार करण्यासाठीं त्याला आतां बळ मिळालें. त्याचा भाचा या

प्रचारमोहिमेंत आघाडीवरचा सेनापति बनला. या भाच्याचें नांव 'चेन्न बसव' असें होतें. बसवाची शिष्यशाखा दिशींमाशीं वाढत चालली. वीरशैव संप्रदाय बळ धरूं लागला. बसव जो भेटेल त्याला धर्मदीक्षा देऊं लागला. 'जुनें जाउं द्या मरणालागुनि' या अभिनिवेशानें तो समाजाचें पुनर्घटन करायला निघाला.

"वर्णाश्रम हें पाखंड आहे. तें समाजांतल्या भेदभावनेला खतपाणी घालतें. लिंग, वर्ण, जाती सारें कांहीं तुच्छ! व्यक्ति तेवढी समान. तें मूर्ति-पूजेचें अवडंबर मूर्तीसहित फेकून द्या. फक्त हृदयावर शिवलिंग तेवढें धारण केलें कीं बस्स! शिवभक्तीचा एक प्रकार या भावनेनें शरीरश्रम करा. कष्टांना हलके लेखूं नका. सोहेर-सुतक मानूं नका. प्राणिहिंसा वर्ज्य! 'एको देवः' माना अन् तो म्हणजे परमशिव!" हा बसवाचा सर्वांना आदेश होता.

या संप्रदायाची शिवभक्ति ही विशेषत्वानें दास्यभक्ति होती. म्हणजे शिव हा स्वामी अन् भक्त हे त्याचे दास. पण बसव केवळ भक्तच नव्हता; तर तो नवसमाजाचा नेताहि होता. तो समाजांतल्या दुष्ट रूढींचा दुष्मन् होता. त्यानें स्त्रियांनाहि धर्मद्वार उघडलें अन् तेंहि पुरुषांच्या बरोबरीनें अधिकार देऊन. तत्त्वज्ञानापेक्षांहि धर्माचरणावर त्याचा विशेष भर होता. धर्म हा जीव-नांत रिंगला पाहिजे, दैनंदिन आचरणांतून त्याचा प्रकाश बाहेर पडला पाहिजे, असें तो मानी. त्यानें 'काय-कैलासाचें तत्त्व' मांडलें तें यासाठीं. मानव शरीर हेंच शिवाचें कैलासस्थान; अन् त्यासाठींच तें पवित्र राखलें पाहिजे, असें तो सांगूं लागला. उपचार अन् उत्सव यांच्या आडंबराला विरोध करून त्यानें शिवाच्या मानसपूजेवर भर दिला.

उपास्य परम शिवाविषयीं तो सांप्रदायिकांना आदेश देतो तो असा—

"नंबिन हेंडतिगे गंडनोब्बा काणिरो
नंबवल्ल भलंगे देवनोब्बा काणिरो
बेड बेड अन्य देवद्संग होल्ल
बेड बेड अन्य दैववेंबुदु हादर काणिरो
कूडलसंगमदेव कंडरे कोटव काणिरो"

'पतिव्रतेला जसा एकमेव पति, तसा खऱ्या भक्ताला एकच परमात्मा असतो. अन्य देवदेवतांचें स्मरणहि पाप आहे. तो व्यभिचार आहे. देवाला तें समजलें, तर तो त्याचें प्रायश्चित्त दिल्यावांचून राहणार नाहीं.'

अस्पृश्यतेविषयीं त्यानें मांडलेला विचार म्हणजे रूढिवाद्यांना झोंबणारा फटकाच आहे. अस्पृश्य कोण, तें तो वेगळ्याच विचारसरणीनें सांगतो—

"आई-बापांना शिवीगाळ करतो, तो खरा अस्पृश्य. परोपकारांत विघ्न आणतो, तो खरा चांडाळ! धनासाठीं दुसऱ्याचे प्राण घेतो, तो मांग. परस्त्रीची कामना धरतो, तो महार, धेड! देवा, असले हे अस्पृश्य जर गांवांत अन् गांवभर राहत असलेले दिसतात, तर मग महार-ढोरांना गांवाबाहेर कां ठेवायचें? तें काय न्यायाला धरून आहे?"

बसवाच्या भक्तींत देण्याघेण्याची भावना किंवा वाणिज्यवृत्ति नाही. त्याची भक्ति स्वर्ग किंवा मोक्ष यांच्यासाठींहि नाहीं. भक्तीचें फळ भक्तिच असेंच तो मानतो.

" ओडुवात लेकनल्ल। बेडुवात भक्तनल्ल
ओडलागदु लेकन्नु। बेडलागदु भक्तनु
ओडनय्या बेडनय्या। कूडलसंगम देवा "

"प्रसंगीं पळून जातो, तो नोकर नव्हे. हात पसरतो, तो भक्त नव्हे. नोकरानें पळतां कामा नये. अन् भक्तानें तोंड वेंगाडतां कामा नये. हे कूडलसंगम देवा, मी पळतहि नाहीं अन् मागतहि नाहीं."

बसवानें कल्याण येथें 'शिवानुभवमंडप' नांवाची एक ज्ञानसंस्था निर्माण केली आणि 'बाहेरि कर्में क्षाळला। भीतरी ज्ञानें चोखाळला.' अशा अल्लम प्रभूची त्या संस्थेवर अध्यक्ष म्हणून नेमणूक केली. शिवतत्त्वाचे जिज्ञासू वीरशैव, तिथें आत्मज्ञानाच्या अभ्यासासाठीं येऊं लागले. अल्लम प्रभू त्यांचे संशय छेदून त्यांना ज्ञानाचा प्रकाशमार्ग दाखवूं लागला.

पण बसवाचें हें धर्मकार्य 'सर्वेषाम् अविरोधेन' चालूं शकलें नाहीं. त्याला एका बाजूनें जैनांचा विरोध सुरू झाला, तर दुसऱ्या बाजूनें सनातनी ब्राह्मणहि

त्याच्यावर खवळले. बिज्जल राजा जैनधर्मी अन् जैनांचा आश्रयदाता होता. जैन श्रमणांनीं आणि श्रावकांनीं बसवाच्या बाबतींत त्याच्याकडे हळू हळू तक्रारी सुरू केल्या. त्यामुळें एक दिवस बिज्जलाची सहिष्णुता ढळली. त्याच्या हातून दोन वीरशैव मारले गेले. त्यांतून आगीची ठिणगी पडली. दोन्हीं पंथांत उघड उघड बंडाळी सुरू झाली. त्या बंडाच्या वणव्यांत बिज्जलाची तर आहुति पडलीच अन् शिवाय बसवालाहि देहांत करून घ्यावा लागला. अशा प्रकारें समाजांत नवक्रांति घडवून आणण्याच्या या घाईगर्दींत त्या क्रांतीचा नेताच हुतात्मा झाला,

जैन आणि वीरशैव यांच्या साहित्यांत बसवाच्या मृत्यूविषयीं भिन्न भिन्न पर्याय आहेत. जैन सांगतात तें असें—

बसवानें एका जंगमाला जैनाचें सोंग देऊन बिज्जलाकडे एक विषारी फळ पाठवलें. राजानें तें चाखलें; पण तो मेला नाहीं. त्याला केवळ मूर्च्छाच आली. बसव आपल्या प्राणांवर उठला हें समजतांच त्यानें क्रोधाविष्ट होऊन बसवाला धरणें पाठवलें. बसवाला हें समजतांच तो राज्यांतून पळाला. पण राजपुत्रानें त्याचा पाठलाग सुरू केला. तो जिथें जिथें जाई, तिथें तिथें राजपुत्र त्याचा पिच्छा पुरवी. सरतेशेवटीं त्याला लपून राहायला जागाच कुठें उरली नाहीं. बसव सर्व बाजूंनीं निराश झाला अन् अखेरीस त्यानें संगमेश्वराच्या विहिरींत उडी टाकून आत्महत्या केली.

पण वीरशैवांना ही जैनांची कल्पित कादंबरी वाटते. ते हकीगत सांगतात ती अशी—

बिज्जल राजानें दोघां शिवशरणांचा अमानुष वध केल्यामुळें वीरशैव मंडळींत प्रक्षोभ उठला. ते राजाच्या सूडाला प्रवृत्त झाले. जगद्देव नांवाचा एक माथेफिरू वीरशैव होता. तो शस्त्र हातीं घेऊन आपल्या दोन साथीदारांसह राजमहालांत घुसला अन् त्यानें कृष्णानें कंसाला घातलें तसें बिज्जलाला कंठस्नान घातलें. मग रस्त्यावर येऊन त्यानें आपल्या त्या शतकृत्याची घोषणा केली. त्यामुळें बिज्जलाचें सैन्य खवळलें. वीरशैवहि मारामारीस उद्युक्त झाले. उभयपक्षीं तुंबळ युद्ध माजलें. कल्याणनगरींत प्रेतांचे ढीग

पडले. त्या यादवीयुद्धांत बिज्जलाचा राजवंशच नष्ट झाला. पण बसवाला या सर्वच दुर्घटनांचा उबग आला. तो कल्याणनगरीचा त्याग करून संगमेश्वराच्या चरणांपाशीं आला. आणि त्यानें शिवाच्या आत्मज्योतींत स्वतःची प्राणज्योत विलीन केली.

पण बसवाचा अंत असा एकाएकीं आणि अनपेक्षित झाला असला, तरी त्यामुळें त्याचा संप्रदाय मात्र कोलमडला नाहीं. अल्लम प्रभु अन् चेन्न बसव या दोन खांबांवर त्याची द्वारका उभी राहिली. बसवाचा उद्योग, उत्साह जणूं त्या दोघांच्या हृदयांत संचरला. संप्रदाय आबाडीवर ठेवण्याच्या कामीं ते दोघे 'यशवंत' ठरले. त्यामुळेंच बसव, अल्लम आणि चेन्न बसव ही शिवशरणांची त्रिमूर्ति ठरली आहे. बसव भक्तीसाठीं, अल्लम विरक्तीसाठीं आणि चेन्न बसव ज्ञानासाठीं, वीरशैवांत प्रसिद्ध आहे.

अल्लमाला वैराग्य उत्पन्न झालें, तें त्याच्या तरुण पत्नीच्या निधनानें. ती गेली अन् तो संसाराला उबगला. त्यानें मग विजनवास पत्करून कठोर तप केलें अन् आत्मज्ञान मिळवलें. मग एका शैव साधूकडून शिवदीक्षा घेतली. नंतर शिवाद्वैताचा प्रचार करीत तो भारतभर हिंडला. त्या भ्रमंतींत अनेक शिष्य त्याच्या भोवतीं गोळा झाले. एवढ्यांत बसवाची कीर्ति त्याच्या कानीं आली. तो मग सर्व शिष्यांच्या मेळाव्यासह बसवाच्या भेटीस गेला. त्याच्या दर्शनानें बसव प्रभावित झाला. बसवाला जो कांहीं सूक्ष्म अहंकार होता, तो अल्लमाच्या दर्शनानें तात्काळ गळाला. अल्लमाच्या तेजःपुंज व्यक्तिमत्त्वानें तो जणुं भारून गेला. त्याला वाटलें, कीं आपल्या शिवानुभवमंडपाचा पहिला अध्यक्ष व्हायला हाच महाभाग सर्वार्थी लायक आहे. बसवानें तावडतोब ती गोष्ट अंमलांत आणली. अल्लमानें त्या संस्थेची धुरा वाहून शिष्यांना पढवतां पढवतां 'षट्स्थल ज्ञानचारित्र्य' 'शून्य संपादने' 'मंत्रगौप्य' 'सृष्टिवचन' इत्यादि ग्रंथ लिहिले. आजहि त्याची गादी 'शून्य सिंहासन' म्हणून प्रसिद्ध आहे.

चेन्न बसव हा बसवाचा भाचा तर खराच; पण तो त्याचा सहकारीहि होता. बसवाच्या खांद्याला खांदा भिडवून त्यानें संप्रदायाचें कार्य केलें.

जन्मभर आपल्या मामाला जीवेंभावें साथ दिली. मामाच्या मृत्यूनंतर तर सारा भार त्याच्यावरच पडला. वीरशैव संप्रदायाला तत्त्वज्ञानाची बैठक मिळवून दिली ती यानेंच. चेन्न बसव हा मोठा विद्वान् होता. म्हणूनच शिवानुभवशास्त्रांत त्याच्या ग्रंथांना प्रमुख स्थान आहे. शिवशरण त्याला ' षट्स्थल चक्रवर्ती ', अशी पदवी देतात. ' करण हसिगे ', ' मिश्रार्पण ', ' पदमंत्रगोप्य', 'घटचक्र' हे त्याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. संप्रदायांतल्या विधि-नियमांची प्रतिष्ठा यानेंच वाढवली. अल्लमाच्या नंतर शून्यसिंहासनाच्या गादीवर हाच बसला.

वीरशैवांच्या प्रमुख नामावळींत आणखी दोन नांवें गुंफावीं लागतात. एक अक्क महादेवीचें अन् दुसरें सर्वज्ञाचें. अक्क महादेवी १२ व्या शतकांत जन्मली आणि आपल्या असामान्य गुणांनीं साऱ्या शिवशरणांची ' अक्का ' ठरली. ही बाई महाविलक्षण आहे. हिच्या रूपाला एक जैन राजा भाळला. त्यानें तिला मागणी घातली. तिच्या मनांत लग्न करायचें नव्हतें. किंबहुना तिनें स्वतःचें लग्न चेन्न मल्लिकार्जुनाशीं आधींच लावून टाकलें होतें. पण मागणी धुडकावल्यास तो जैन राजा आईवडिलांवर आफत आणायला कमी करणार नाहीं, या जाणिवेनें तिनें त्या गोष्टीला कष्टाचा रुकार दिला. मात्र तिनें त्याला कांहीं अटी घातल्या. आपल्या शिवोपासनेंत त्यानें कधींहि व्यत्यय आणतां कामा नये, ही तिची मुख्य अट होती. राजानें ती तोंडा-पुरती मान्य केली; पण पुढें तिचें पालन मात्र केलें नाहीं. त्याला तिची उपासना नको होती. हवें होतें तें तिचें रसरशीत विलोभनीय तारुण्य ! तो तिच्या उमलत्या कळींतला भुंगा होऊं पहात होता.

पण अक्क महादेवीला तें मुळींच रुचलें नाहीं. ती सत्ता-वैभवासह आपल्या पतीचा त्याग करून एक दिवस राजवाड्याबाहेर पडली. सजवलेल्या राणी-वशांतून उघड्या आभाळाखालीं आली. लोकांनीं तिला विचारलें, ' तुझी पुढची सतगत काय ? ' ती म्हणाली, ' मला त्याची काळजी नाहीं. भूक लागली, तर भीक आहे. तहान लागली, तर झऱ्याचें निर्मळ पाणी आहे. झोपायला कुठेंहि ओसाडीचें पडकें घर आहे. आणि माझा परमाराध्य चेन्न मल्लिकार्जुन जिथें जाईन तिथें माझ्या सोबतीला आहेच.'

अनुक्रम ३१४२८ दि: १८-११-१९
क्रमांक ३८८ नों दि: २३।१०।६७

ती सरळ कल्याण येथें आली अन् शिवानुभवमंडपांत दाखल झाली. तिचें वैराग्य तीव्र होतें. श्रद्धा अभंग होती. त्यामुळें शिवैक्य संपादायला तिला मुळींच वेळ लागला नाहीं. जोंवर ती कल्याणला राहिली, तोंवर भक्ति, शील अन् उज्ज्वल चारित्र्य या गुणांनीं सर्वांना पूज्य झाली. अंतीं श्रीशैलावर जाऊन तिनें आपला देह टाकला.

तिनें आपल्या वीरचरित्रानें अध्यात्ममार्गांतहि अबला ह्या सबला होऊं शकतात, हें स्वच्छ दाखवून दिलें. अध्यात्मांतली तिची वीरवाणी अन्यत्र दुर्लभच आहे. तिनें भयालाच भिववून टाकलें आहे. ती म्हणते—

" ज्यानें डोंगरावर मठी उभारली, त्यानें वाघा-वांशेलाला घाबरतां कामा नये. ज्यानें आपलें तारूं समुद्रांत लोटलें, त्यानें लाटांच्या तांडवाला भितां कामा नये. जो बाजारांत बसला, त्यानें कोलाहलाचा कंटाळा करतां कामा नये. आणि या भल्या बुऱ्या जगांत ज्यानें जन्म घेतला, त्यानें निंदा-स्तुतीची पर्वा करतां कामा नये.............. "

यानंतर उल्लेखायचें तें सर्वज्ञाला. हा जरा लांबचा म्हणजे १७ व्या शतकांतला आहे. तो एका कुंभाराच्या घरीं जन्मला आणि तिथेंच लहानाचा मोठा झाला. मोठेपणीं त्यानें आपल्या कवित्वाच्या द्वारें कन्नडिगांच्या अंतःकरणावर प्रभुत्व मिळवलें. आजहि तोच, कन्नड जनतेचा सन्मार्गदर्शक आहे. जाणते त्याला कर्नाटक जनपदसाहित्याचा शिरोमणि समजतात. सर्वज्ञाचें नांव माहित नाहीं असा माणूस तिकडे विरळाच सांपडेल. सर्वज्ञ हें त्याचें मूळ नांव नसावें असें म्हणतात. तें त्याचें कविनाम असावें. ज्ञानेश्वरांच्या नांवाबद्दलहि विद्वानांत अशीच धारणा आहे. पण या दोघांहि संत कवींच्या बाबतींत त्यांचीं हीं प्रसिद्ध नांवेंच सार्थ ठरलीं आहेत.

कबिराचे दोहे, तुकोबाचे अभंग, तर सर्वज्ञाची त्रिपदी. ती जणूं त्रिपदा गायत्रीच ! पहिल्या ओळींत दोन चरण, दुसरी ओळ सलग आणि तिसरी ओळ अर्धी, अशी सर्वज्ञत्रिपदीची रचना आहे. एक त्रिपदी म्हणजे नेमका एका मराठी ओवीचा ऐवज. फक्त यमक तेवढें वजा करायचें.

सर्वज्ञ मोठा होतांच त्यानें घर सोडलें. तो देशभर हिंडला. आपलींच वचनें गात गात त्यानें सर्वत्र संचार केला. जी घटना पाहिली, जें दृश्य मनावर ठसलें, ज्या भावना विशेष प्रसंगीं स्फुरल्या, जे विचारकण हृदयाकाशांत चकचकले, त्या सर्वांना त्यानें चालतां बोलतां काव्याच्या मुशींत ओतलें आहे. त्याच्या नांवानें अंकित झालेलीं हजारों वचनें कर्नाटकाच्या मनोभूमींत संचार करीत आहेत. त्यांतलीं कांहीं अन्य कवींनीं रचून सर्वज्ञाच्या नांवावर खपवलेलीं असलीं तरी त्यांतली फार मोठी रचना सर्वज्ञाचीच आहे, हें त्यांतल्या मौलिक विचारांच्या स्पर्शानें कळून येतें. सर्वज्ञाच्या सुलभ, सुगम रचनेमुळेंच पुढच्या कवींना आपल्या पंक्ति त्याच्या पाठांत घुसडून देण्याचा मोह झाला असावा. सर्वज्ञानंतर कर्नाटकांत जें काव्य निर्माण झालें, त्यावर सर्वज्ञाचाच ठसा आहे.



सर्वज्ञ कवि

सर्वज्ञ देवाविषयीं बोलला आहे, भक्तीविषयीं बोलला आहे, नीतीविषयीं, व्यवहाराविषयीं, इतकेंच काय, त्याच्या काळीं महत्त्व पावलेल्या अनेक लौकिक आणि पारलौकिक विषयांसंबंधींहि बोलला आहे. त्यानें लोकांना उपदेश दिला. लोकांनीं त्याला प्रेम दिलें. मार्गभ्रष्ट आणि कर्तव्यच्युत जनांना टोचीत, जागवीत, बजावीत, तो अनेकांचा गुरु झाला. समाजांत शिरलेले दोष उघड करण्याचें कटु कर्तव्य तुकोबाप्रमाणेंच सर्वज्ञानेंहि निर्भीडपणें केलें. आणि एवढें करूनहि तो अकर्ताच राहिला. तो स्वतःच्या सर्वज्ञत्वाबद्दल एका ठिकाणीं सांगतो—

" सर्वज्ञ वेम्बुवनु । गर्वदिन्दादवने ।
सर्व रोळु ओन्दोन्दु नुडिग लितो विद्यद ।
पर्वते आय सर्वज्ञ ॥ "

'सर्वज्ञ हा गर्वानें नाहीं सर्वज्ञ बनला, तर प्रत्येकाजवळून एकेक गोष्ट शिकून तो विद्येचा पर्वत झाला आहे.'

सर्वज्ञ हा वीरशैव पंथाचा अनुयायी होता; पण तरीहि त्याच्या कवित्वावर नाथपंथाचा बराच प्रभाव दिसतो. सर्वज्ञाच्या वचनांत नादबिंदु, सहस्रारचक्र, नाडी, वह्निमंडळ, इत्यादि कुंडलिनीयोगांतल्या परिभाषेंतले शब्द येतात, त्याचें कारण हेंच असावें. सर्वज्ञ शिवाबद्दल जें बोलला आहे, तीं वचनें श्री. 'बोम्मण्णा' यांनीं एका ठिकाणीं उद्धृत केलीं आहेत—

" मण्णिनल्लि कल्लिनल्लि । मुल्लिन मोनेयल्लि
एल्लि नेनेदल्लि शिवनिर्प । अव नीनिद्दल्लिय सर्वज्ञ "

'मातीच्या कणांत, कंटकाच्या अग्रांत, जिथें कुठें तुम्हीं ध्यान कराल, तिथें शिव आहे. जिथें तुम्हीं आहां, तिथें तो आहे. ज्याप्रमाणें एवढा प्रचंड हत्ती एवढ्याशा आरशांत सामावतो, त्याप्रमाणें शिव ज्ञानियाच्या अंतःकरणांत प्रतिबिंबित होतो. देव एक आहे. तो दोन असूंच शकत नाहीं. सगळ्या विश्वाला एकच एक देव ! हा देव, तो देव, लहान देव, मोठा देव, असली भाषाच करूं नका. मनानें त्याला शरण जा. मन नाहीं तर पूजोपचार व्यर्थ !'

सर्वज्ञाची विनोदबुद्धिहि तल्लख आहे. त्याला लोकव्यहारांतली विसंगति चटकन् दिसते. माणसाचें दुबळेपण त्याला नेमकें प्रतीत होतें. तो जातां जातां असल्या गोष्टींवर शेरे मारून जातो. बायकांच्या स्वभावांतलीं मर्मस्थळेंहि त्याच्या सूक्ष्म दृष्टींतून निसटलेलीं नाहींत. निरनिराळ्या व्यावसायिक लोकांचे स्वभावधर्महि त्यानें ओळखून ठेवले आहेत. त्याचीं हीं पुढचीं वचनें सहज नजरेखालून घाला—

'सोनाराचा बच्चा लहान म्हणूं नका. एवढीशी माशी जशी कूंस मारल्यावांचून राहत नाहीं, तसा तोहि आगट्याकडे बसला, कीं आपलें हस्तलाघव

दाखवल्याशिवाय राहायचा नाहीं. तेली तर देवाला देव म्हणून ओळखायला तयार नसतो. साक्षात् शिव जरी त्याच्यापुढें उभा राहिला तरी तो म्हणेल, कीं 'माझा घाणा जरा चालव.' गांवच्या पाटलाशीं भांडणें आणि बहिऱ्या माणसाशीं कानगोष्टी करणें म्हणजे भुकेनें पिडलेल्या माणसानें फोलपट खाण्यासारखें आहे. जिथें माणसें तारतम्यानें वागतात, तिथें कसें तरी राहतां येईल, पण जिथें माणसें हत्तीला डुक्कर म्हणतात तिथें कसें राहायचें! घराचें छप्पर मोडलें, स्वैरिणी स्त्रीची जीभ मोकळी सुटली अन् राजा खोटें बोलूं लागला, कीं त्या क्षणीं कोणालाहि न सांगतां गांव सोडून चालतें व्हावें.'

## वीरशैव तत्त्वज्ञान

वीरशैवांचे पंचाचार्य प्रसिद्ध आहेत. प्रत्येक युगांत एकेका आचार्याकडून संप्रदायाचें संचालन होतें, अशी वीरशैवांची श्रद्धा आहे. भारतांत वेगवेगळ्या ठिकाणीं या पंचाचार्यांचे पांच प्रधान मठ आजहि विद्यमान आहेत. या बाबतींत त्यांनीं शंकराचार्यांचा कित्ता गिरवलेला दिसतो. त्या मठांवरचे आद्याचार्य पुढील प्रमाणें—

(१) रेणुकाचार्य—बाळेहाळ्ळि
(२) मरुळसिद्ध—उज्जयिनी
(३) एकोराम—श्रीशैल
(४) पंडिताराध्य—केदार
(५) विश्वाराध्य—काशी.

वीरशैवांचें तत्त्वज्ञान काश्मिरी शैवागम आणि पंडिताराध्य यांनीं वेदांत सूत्रांवर लिहिलेलें श्रीकरभाष्य, यांवर आधारलेलें आहे. वीरशैव हे एकेश्वरी आहेत. हा एकेश्वर म्हणजे परमशिव. तो नित्य, स्वतंत्र, सृष्टि-स्थिति-लयाच्या परता, अनिर्वचनीय, अगोचर, चैतन्यस्वरूप अन् निराकार आहे. उपनिषदें ज्याला 'नेति नेति' म्हणतात, तोच वीरशैवांचा 'बयलु' म्हणजे शून्य आहे.

तो विनोदासाठीं आपल्या शक्तिविकासानें सृष्टि निर्माण करतो अन् अखेरीस ती आपल्यामध्येंच झांकून टाकतो. जग हें परमात्म्याचें अंशभूत

खरें; पण तें म्हणजे परमात्मा नव्हे. परमात्मा हा विश्वव्यापक पण विश्वातीत आहे.

काश्मीरीय शैव सिद्धान्ताप्रमाणें वीरशैवहि शिवाबरोबरच शक्तीलाहि महत्त्व देतात. शिवाचे सर्व गुण शक्तीच्या अंगीं वसतात. ती शिवामध्यें अविनाभावानें राहते म्हणून नित्य. शिव जसा शक्तविशिष्ट, तसेंच जगहि आहे. विश्वांतल्या प्रत्येक पदार्थांत शक्ति असते. भूमींत धारणा, जलांत आप्यायन, तेजांत उज्ज्वलन, हे धर्म म्हणजे त्या त्या पदार्थांतील शक्तीच होत.

वीरशैव जीवाला ‘ अंग ’ म्हणतात. हें अंग सदाशिवापासून उत्पन्न होत असून त्यावर अविद्येचें आवरण असतें. शिव म्हणजे लिंग. या लिंगाचे प्रकार तीनः– भाव, प्राण अन् इष्ट. भावलिंग हें सर्वोच्च तत्त्व होय. प्राणलिंग हें त्याचें सूक्ष्म रूप आणि इष्टलिंग हें स्थूल रूप समजावें. हीं तीन अनुक्रमें आत्मा, जीव आणि देह यांचे प्रतिनिधि होत. अंग-लिंगांचें सामरस्य घडवून आणणें हें वीरशैवांचें मुख्य ध्येय असतें. हें सामरस्य भक्तीनें साध्य होतें. भक्ति ही शक्तीपेक्षांहि श्रेष्ठ आहे. कारण शक्ति ही जीवाला प्रवृत्तिमार्गाच्या प्रवाहांत ढकलते, तर भक्ति निवृत्तीच्या पैलपार पोंचवते.

पुराणांतला भक्तिमार्ग नवविध आहे. पण वीरशैव आपला भक्तिसिद्धांत षट्स्थल, या कल्पनेनें मांडतात. वीरशैवांचा मुख्य मंत्र ‘ ॐ नमः शिवाय ’ असा आहे अन् तो षडक्षरी आहे. त्यावरून त्यांनीं भक्तिमार्गहि षड्विधच ठरवला आहे. त्यांचा ‘स्थल’ हा शब्द व्यावहारिक अर्थाचा नसून तो यौगिक आहे. परम शिवालाच ते ‘स्थल’ म्हणतात आणि त्याची व्याख्या पुढीलप्रमाणें सांगतात—

“ स्थीयते लीयते यत्र जगदेतच्चराचरम् ।
तद् ब्रह्म स्थलमित्युक्तं स्थलतत्त्वविशारदैः ”

हें चराचर जगत् जिथें राहतें अन् जिथें लीन होतें, तें परब्रह्म म्हणजेच स्थल होय.

या स्थलाच्या प्राप्तीसाठीं निर्माण झालेला साधनमार्गहि स्थल या नांवानेंच त्यांनीं विशद केला आहे. भक्त, महेश्वर, प्रासादि, प्राणलिंग, शरण आणि ऐक्य, अशीं हीं सहा स्थळें म्हजे शून्यसंपादनाच्या सहा पायऱ्या होत. साधक शेवटच्या स्थलावर पोंचला, कीं तिथे जिवा–शिवांचें सामरस्य घडतें.


वीरशैवांचें हें तत्त्वज्ञान जोंवर वेष्टनांच्या ग्रंथांतच बंदिस्त होतें, तोंवर तें मोजक्याच मंडळींना उपलब्ध होतें. पण तें तत्त्वज्ञान जेव्हां बसव, अल्लम, चेन्न बसव, सर्वज्ञ, यांच्या हृदयांत प्राणवान् होऊन 'वचन' रूपानें बाहेर पडलें, तेव्हां राजवाड्यापासून तों गरिबाच्या तणारापर्यंत सर्वत्र फळीं फुलीं बहरलें. या महाभागांनीं खरें वीरशैवदर्शन अधिक विकसित केलें. त्यामुळें त्यानें जनहृदयाचा सहजपणें ठाव घेतला.

## वचनसाहित्य

वीरशैवांच्या या साहित्याला वचनगळु म्हणतात. त्यांनीं जीव, जगत्, ब्रह्म, मोक्ष, इत्यादि तात्त्विक विषयांवर गंभीर चिंतन केलें आहे. ग्रंथोक्त ज्ञान अनुभवाच्या कसवटीवर घासून घेतलें आहे. त्यांचीं वचनें म्हणजे ती रोकडी प्रचीति आहे. 'बोलणें नाहीं संदिग्धीं ' असें तिथलें रोख ठोक काम !' दृष्टांत आहेत ते सामान्यांच्या व्यवहारांतले. म्हणी, वाक्प्रचारहि लोकव्यवहारांतूनच घेतलेले. त्यामुळें एखादें वचन कानीं पडतांच तें सहज समजून जातें. त्याची अनोळखी एकदम फिटते. तें जणूं आपलेंच ज्ञान आंगडें कुंचडें लेवून आपल्याजवळ दुडदुडत आलें असें वाटतें. या वचनसाहित्यांत धार्मिक, सामाजिक, नैतिक अशा सगळ्याच विषयांवर निर्भींड बोल ऐकायला मिळतात. हीं वचनें भावगीताप्रमाणें गातांहि येतात, हें त्यांचें आणखी एक वैशिष्ट्य !

वीरशैवांपैकीं असे दोनशेंच्या वर वचनकार आढळतात. त्यांत कित्येक स्त्रियाहि आहेत. अल्लमापासून सुरू झालेले हे ' वचन ' तुषार, तेराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत पौषांतल्या दंवाप्रमाणें कन्नड जनांवर वर्षत राहिले. या वचनांच्या साथी-संगतीनेंच कन्नड साहित्य उत्क्रांत झालें.

★




गेल्या प्रकरणांतून कर्नाटकाच्या राजकीय इतिहासावर आपण धावती दृष्टि टाकली. कर्नाटकाचा सांस्कृतिक इतिहासहि तसाच वैचित्र्यपूर्ण आहे. अनेक मतें अन् धर्मपंथ कर्नाटकांत जन्मले, वाढले अन् एकमेकांना कांहीं-तरी देऊन घेऊन गेले. कधीं परस्पर द्वेष, कधीं स्पर्धा, क्वचित् अनुकरण, क्वचित् समन्वय, अशा सगळ्या तऱ्हा कर्नाटकाच्या सांस्कृतिक इतिहासांत दृग्गोचर होतात.

आर्यांचा दक्षिणेंत प्रवेश होण्यापूर्वीं कर्नाटकाचा धर्म हा शुद्ध द्राविड धर्म होता. उग्र आणि भयंकर अशा मारी देवतांना पुजणें, त्यांच्यापुढें कोंबडीं-बकरीं कापणें, प्रसंगविशेषीं त्यांना नरबलीहि देणें, वर्षांतून एकदा देवीची जत्रा करून तिच्यापुढें नृत्य-नाट्य करणें, आणि अशा रीतीनें तिला संतुष्ट करून गांवासाठीं तिच्याकडून बऱ्याभल्याचा कौल मिळवणें, असें त्या धर्माचें ढोबळ स्वरूप होतें. याच्या जोडीला ते नाग, लिंग, वृक्ष, भूत-प्रेत, अशांचीहि पूजा करीत. वर्षकृत्यांत त्यांनाहि यथायोग्य स्थान देत.

पुढें वैदिक धर्मी आर्यांच्या संपर्कांत आल्यावर त्यांनीं त्यांच्याहि कांहीं देवता स्वीकारल्या. आपल्या मूळच्या दैवतांना न सोडतां त्यांनीं ही अधिकाची जोड दिली. आर्य हे पंथस्थापक नव्हते. त्यांच्या धर्मांत शिक्षा होती; पण दीक्षा नव्हती. त्यांनीं आपल्या धर्माची उभारणी कोणाच्या तरी विरोधावर केलेली नव्हती. ते मेघवृष्टीनें उपदेश करीत होते, पेरीत जात होते. जें कांहीं रुजेल तें रुजेल.

पण जैन-बौद्ध हे धर्मपंथ वैदिक धर्माच्या विरोधावर उभे झालेले. अहिंसा-तत्त्व हें वैशिष्ट्य करून त्यांनीं वैदिक धर्माच्या हिंसायुक्त यज्ञसंस्थेवर आघात करण्यासाठीं, तिला बुडवण्यासाठीं आपली गुढी उभारलेली. त्यापैकीं कर्नाटकांत प्रथम पदार्पण करणारा धर्म म्हणजे जैनांचा. सनपूर्व तिसऱ्या शतकाच्या सुमारास भद्रबाहु अन् चंद्रगुप्त मौर्य ही गुरु-शिष्यांची जोडी आपल्या शेंकडों अनुयायांसह कर्नाटकांत उतरली. पूर्व भारतांत त्या काळीं प्रचंड दुष्काळ पडला होता. त्या दुष्काळांतून प्राण वांचवण्यासाठीं त्यांनीं हें दक्षिणेचें महाप्रस्थान काढलें होतें. कर्नाटकाची भूमि त्यांना मानवली. त्यांनीं तिथें वास्तव्य केलें. त्या वास्तव्यकालांत भद्रबाहूनें तिथें अनेक जैन मठ उभारले आणि अनेक कन्नडिगांना आपल्या धर्माची दीक्षाहि दिली.

त्या काळापासून तों आज तागायत कर्नाटकांत जैन धर्म सुस्थिर आहे. मात्र त्याची प्राचीन काळची समृद्धि आतां राहिलेली नाहीं. आठव्या शतकांत शंकराचार्यांचा अवतार होईपर्यंत जैनाची तिथें सद्दी होती; पण आचार्यांनीं आपल्या समर्थ वाणीनें आणि करणीनें वैदिक धर्माला पुनश्च उजळा दिल्यावर तिथें जैनांना उतरती कळा लागली. शंकराचार्यांनीं स्थापलेल्या चार प्रमुख मठांपैकीं एक मठ कर्नाटकांत शृंगेरी येथें आहे. त्यांच्या अद्वैत-सिद्धांताचा प्रचार पुढें चौदाव्या शतकांत कर्नाटकाच्या भूमीवर विद्यारण्य-स्वामींनीं मोठ्या हिरीरीनें केला.

बौद्ध धर्माचा पायरव कर्नाटकांत सुरू झाला, तो जैनांच्या नंतर आणि अशोकाच्या प्रेरणेनें. पण वनवासी प्रांतांत त्याचा थोडा फार बोलबाला झाला, तरी कर्नाटकाची भूमि बौद्धांना ‘ बरड ’च ठरली. शंकराचार्यांनंतर तर त्याचा तिथें मागमूसहि उरला नाहीं.

बाराव्या शतकाच्या प्रारंभीं रामानुजाचार्य तमिळनाडमधून कर्नाटकांत आले. श्रीरंगम् येथील कुलतुंग राजा हा दुराग्रही शैव होता. त्यानें तिथल्या वैष्णवांचा छळवाद मांडला आणि तो रामानुजांच्याहि जिवावर उठला. रामानुज तिथून निसटले म्हणून सुटले. ते कर्नाटकांत आले आणि तिथें त्यांची चहा झाली. कर्नाटकांत विष्णुभक्तीचा पाया त्यांनीं घातला. त्यांच्या त्या वैष्णवधर्मामुळें जैन धर्माचें क्षेत्र आणखीच आकसलें. तेराव्या शतकांत मध्वा-

चार्य हे कर्नाटकाच्या भूमींतच जन्मले. त्यांनीं द्वैताश्रयी विष्णुभक्ति कर्नाटकांत खूपच वाढवली. चौदाव्या शतकांत इस्लाम धर्म कर्नाटकांत प्रवेशला. तो आला तो ' धर-मार ' करीतच आला. त्यानें कर्नाटकाची सत्ता हस्तगत करण्यासाठीं एका मागून एक आक्रमणें सुरू केलीं. कर्नाटकांत हिंदु संस्कृतीच्या संरक्षणाची अन् संवर्धनाची प्रेरणा इस्लामच्या आक्रमणांतूनच निर्माण झाली. विजयनगरचें साम्राज्य हें त्याचें फळ होय. पण विजयनगरचें साम्राज्य इस्लामी साम्राज्यवादाचीं पाळें मुळें उखडून टाकण्यासाठीं स्थापन झालें असलें, तरी त्या सम्राटांनीं इस्लामी धर्मावर कधीं प्रहार केला नाहीं. त्यांच्या राजवटींत हिंदु–मुस्लीमसंबंध सलोख्याचे अन् अबाधित राहिले. या धर्मसहिष्णुतेची त्या सम्राटांनीं बुद्धिपुरस्सर जोपासना केली. विजयनगरच्या सम्राटांचें सर्वच धर्म–पंथांच्या बाबतींत समन्वयाचें धोरण होतें. त्यांनीं तसे प्रयत्नहि केले. बुक्करायानें जैन आणि वैष्णव यांच्यांतली तेढ कमी करून उभयांचा सलोखा राखण्याच्या कामीं बरेंच यश मिळवलें. कंपरायानें तर सर्वांनीं सर्व देवता वंद्य मानाव्या असें आज्ञापत्रच काढलें होतें.

कर्नाटकांतले सर्व राजे महाराजे यांनीं आपल्या नसलेल्या धर्मपंथांनाहि उदार आश्रय दिलेला दिसतो. सातवाहन राजे वैदिक होते; पण त्यांनीं बौद्धांना सढळ हातानें देणग्या दिल्या. कदंबवंश शैव असूनहि त्यांनीं जैन मठांचें वैभव वाढवलें. गंग राजे जैन खरे; पण त्यांनीं ब्राह्मणी धर्माला उदारपणें वागवलें. चालुक्य हे वैष्णव; पण त्यांनीं जैन आणि शैव या दोघांच्याहि बाबतींत आपलें मन उदार ठेवलें. होयसळ राजे जैन असूनहि त्या वंशांतल्या बिट्टिदेव राजानें वैष्णव रामानुजांना समर्थ आसरा दिला आणि त्यांच्या विष्णुभक्तीच्या प्रचारालाहि अमोल साह्य केलें. विजयनगरचें हिंदु साम्राज्य गाजत असतांनाच ख्रिस्ती धर्मानें कर्नाटकांत चंचुप्रवेश केला आणि त्यालाहि तिथें आपली वाढ करायला पूर्ण अवसर मिळाला.

कर्नाटकांतल्या राजांना विद्येची कदर होती; किंबहुना रुचि होती. आपल्या राज्यांत विद्येचा सुकाळ व्हावा, गांवोगांवीं विद्वान् वावरावे, असें त्यांना वाटत होतें. विद्येची वाढ अन् विद्वानांचा योगक्षेम या दोन्ही बाबतींत त्यांचा हात सढळ असे. ते पंडित ब्राह्मणांचा तसाच जैन आचार्यांचा समुदाय करून त्यांना अग्रहार देत. अग्रहार म्हणजे विद्वान आचार्यांसाठीं,

अध्यापकांसाठीं दिलेलें भूमिदान ! त्या भूमीला राजस्व तर नसेच; शिवाय त्या भूमींत होणारें उत्पन्न त्या अग्रहाराच्या चरितार्थासाठीं लावून दिलेलें असे. हे अग्रहार सामान्यपणें हिरवें मैदान, नदीचें तीर किंवा पर्वताचें सान्निध्य पाहून स्थापले जात. मध्यभागीं देवालय, होमशाळा, भोजनशाळा अन् रुग्णालय या वास्तु उभ्या करीत. त्यांच्या भोंवतीं गुरुजनांचीं घरें उभीं राहत. विद्या, कला अन् संस्कृति यांचा तिथें त्रिवेणीसंगम होई. देशोदेशींचे विद्यार्थी अशा अग्रहारांत राहून विद्यार्जन करीत.

तिथें वेदघोष दुमदुमे. शास्त्रांची चर्चा चाले. पंडितांचे वाद रंगत. अग्रहार म्हणजे तें एक विद्यापीठच; त्यामुळें त्याचा कारभारहि लहानशा संस्थानासारखाच असे. राजा नसल्यामुळें तो लोकशाही पद्धतीवर चाले. त्या त्या वसाहतींतून निवडलेले महाजन बहुमतानें त्या अग्रहाराचा कारभार चालवीत. सर्वांच्या वर अग्रहाराध्यक्ष असे. म्हैसूर राज्यांत असे किती तरी अग्रहार प्रसिद्ध होते. कदंबांनींहि अग्रहार निर्मिले होते. गोव्यावर त्यांची सत्ता असतांना त्यांनीं काणकोण विभागांत आठ अग्रहार दिले होते. आजहि तो भाग अष्टागर ( अष्टाग्रहार ) म्हणूनच प्रसिद्ध आहे.

कर्नाटकांतले चालुक्यादि राजे केवळ युद्धेंच लढले नाहीत. केवळ भोगविलासांतच रंगले नाहींत. त्यांनीं शिल्पादि कलांना राजाश्रय दिला आणि कलाक्षेत्रांत कर्नाटकाला अजरामर करून ठेवलें. ते गेले, नामशेष झाले; पण कलेच्या रूपानें अमर राहिले. कर्नाटकाची शिल्पकला ही भारताला मिळालेली बहुमोल देणगी आहे. तिथली वास्तुदेवता आजहि ' सालंकृत ' होऊन उभी आहे. मौर्य–सातवाहनांपासून कर्नाटकाला कलेचा सिद्धहस्त लाभला आहे. सातवाहनकालांत बौद्धांच्या प्रेरणेनें कलाकारांनीं जे विहार अन् जीं लेणीं खोदलीं, तो कर्नाटकाच्या वास्तुशिल्पाचा श्रीगणेशा होय !

कदंब आणि चालुक्य यांच्या राजवटींत तिथें शिव-विष्णूचीं कलासुंदर मंदिरें निर्माण झालीं. कदंबांच्याच काळांत तिथें जैन-शिल्पहि विकसित झालें. होयसळांच्या कारकीर्दींत म्हणजे अकराव्या, बाराव्या शतकांत कन्नड शिल्पानें स्वतःचा जणूं ' कलशाध्याय 'च रचला. विजयनगरच्या कालखंडांत दक्षिणेकडील द्राविड शिल्पाच्या प्रभावामुळें कर्नाटक शिल्पांत

अनेक नवीन प्रथा निर्माण झाल्या आणि कर्नाटकाच्या रसिकतेचीं आणि सौंदर्यप्रीतीचीं अनेक अक्षय्य स्मारकें सर्वत्र उभीं झालीं.

कर्नाटकाच्या नृत्य-नाट्याच्या बाबतींतहि कांहीं सांगण्याजोगें आहे. तमिळनाडच्या भरतनाट्यम्प्रमाणें किंवा केरळाच्या कथकळीप्रमाणें अखिल भारतीय गौरव लाभेल अशी एखादी नृत्यकला कर्नाटकानें पुढें आणली नाहीं हें खरें; पण कथकळीला जवळची अन् नृत्य-नाटय हीं दोन्ही अंगें प्रदर्शित करणारी एक लोककला मात्र कर्नाटकांत गाजते आहे. ' यक्षगान ' हें तिचें नांव. ही कला विशेषेंकरून पश्चिम कर्नाटकाची आहे.

### यक्षगान

मात्र यक्षगानकला केवळ कर्नाटकाचीच मिराशी नव्हे. तें आंध्रांत आहे अन् तामिळनाडमध्येंहि आहे. आंध्रांत त्याला ' वीथिनाटकम् ' म्हणतात, तर तमिळनाडमध्यें 'भागवत मेळ' म्हणतात. जी व्यक्ति भिन्न रूपें अन् भिन्न वेष धारण करते तिला तेलुगुमध्यें ' जक्कुलु ' म्हणतात. जक्कुलु म्हणजेच यक्ष. आंध्रांतल्या अनंतपुर जिल्ह्यांत ' जक्कुलु चेरुवु ' नांवाचें एक गांव आहे. तिथले रहिवासी पिढीजात यक्षगानकुशल आहेत. त्यांचा तो धंदाच आहे. हे लोक नाट्याभिनय करतांना जीं पदें गातात, त्यांना यक्षगान किंवा ' जक्कुलु पाटा ' म्हणतात. पण तें कांहीं असलें तरी यक्षगानाचा खरा बोलबाला आहे तो कर्नाटकांतच. कन्नडिगांचा तो एक अत्यंत लोकप्रिय कलाप्रकार आहे.

प्रारंभीं यक्षगान हें कथकळीप्रमाणेंच मूक नाटक होतें. कालांतरानें त्यांत रामायण-महाभारतांतले कथा-प्रसंग शिरले अन् तें संवादाच्या रूपानें बोलकें झालें. अहिल्योद्धार, सुदामचरित्र, ध्रुवाख्यान, हरिश्चंद्र, प्रल्हादचरित्र, रुक्मिणी-स्वयंवर, इत्यादि विषयांवर यक्षगाननाट्यें अभिनीत होऊं लागलीं.

तंजाऊरचे शहाजीराजे ( द्वितीय ) यांनीं यक्षगान-पद्धतीवर सुमारें वीस नाटकें रचलीं आहेत. त्यांना संगीतांत चांगली गति होती. संस्कृतसह अनेक दाक्षिणी भाषाहि अवगत होत्या. त्यांनीं यक्षगानांतील सूत्रधार, नटी, विदूषक इत्यादि पात्रांच्या कार्याविषयीं कांहीं नियम घालून दिले. त्यामुळें यक्षगानाचें स्वरूप सुसंस्कृत अन् चित्ताकर्षक झालें.

यक्षगानावर एक अभ्यासपूर्ण लेख श्री. बा. द. सातोस्कर यांनीं लिहिला आहे. त्याच्याच आधारें मी या यक्षगानाविषयीं चार शब्द सांगणार आहें.

कन्नड यक्षगानाचें कोंकणांतल्या दशावतारी खेळाशीं बरेंच साम्य दिसतें. रंगमंचाची रचना, सूत्रधाराची रंगमंचावरती सतत उपस्थिति, पात्रांनीं कथानकाला धरून ( कधीं सोडूनहि ) स्वयंस्फूर्त संवाद बोलणें, सूत्रधाराकडून कथानकाला गति मिळत राहणें, सूत्रधार व पात्रें यांचेंहि अधूनमधून संभाषण होणें, वगैरे गोष्टी यक्षगान आणि मराठी दशावतार यांच्यांत समान आहेत.

कर्नाटकांतहि यक्षगानाला कुठें कुठें 'दशावतार यक्षगान' म्हणतातच. कोंकणांतल्या दशावतारांत विष्णूच्या दहाहि अवतारांचें दर्शन अपेक्षित असलें तरी मत्स्य, क्वचित् परशुराम, आणि कृष्ण, एवढ्याच अवतारांची त्यांत संभावना होते. यक्षगानांतहि तसेंच आहे.

दक्षिण भारतांतलीं सर्व नृत्यनाट्यें देवतांच्या कृपाप्रसादासाठीं होत असतात. यक्षगानहि त्याला अपवाद नाहीं. आंध्रांतलें कुचिपुडी नृत्य हें शैव देवतांच्या प्रसन्नतेसाठीं असतें. तमिळनाडमधलीं भागवत मेळ हीं नाटकें वैष्णव देवतांच्या प्रसादासाठीं होत असतात. केरळांतलें कथकळी आणि कर्नाटकांतलें यक्षगान हीं शक्तिदेवतांच्या कृपेसाठीं उभीं राहतात. यक्षगान करणाऱ्या ज्या प्रसिद्ध मंडळ्या द. कानडा जिल्ह्यांत आहेत, त्यांत कोल्लुरु-मेळा, मारणाकट्टी मेळा, मंदाती मेळा या मंडळ्या सुप्रसिद्ध आहेत.

यक्षगानाचा देवास्थानाशीं दोन प्रकारचा संबंध असतो. एक धार्मिक अन् दुसरा व्यावहारिक. यक्षगानाकडे सर्वसाधारण जनता केवळ करमणुकीचें साधन म्हणूनच पाहत नाहीं; तर दैवतोपासनेचा एक प्रकार म्हणूनहि पाहते. 'माझी अमुक तमुक मनकामना पूर्ण झाली, तर तुझ्यासमोर यक्षगानाचा प्रयोग करवीन' असे देवतांना नवसहि बोलले जातात. देवस्थानाशीं असा संबंध जडल्यामुळेंच दक्षिण कर्नाटकांत या कलेची भरभराट झाली. यक्ष-गान ही खऱ्या अर्थानें लोककला आहे. लोकांची, लोकांनीं, लोकांसाठीं, निर्मून वाढवलेली नाट्यगानकला आहे.

यक्षगान सादर करणारे नट म्हणजे कुळवाडी–शेतकरी. कार्तिकापर्यंत त्यांचीं भातें मळणी होऊन घरांतल्या कणगींत येऊन पडतात. पुढचा हिवाळा

म्हणजे चैत्रापर्यंतचा काळ त्यांना मोकळा असतो. मग एखाद्या गांवांतले खेळगडी एकत्र होतात अन् यक्षगानाचें ' पंगड ' बनवतात.

पण पुढें प्रश्न येतो तो नाट्यसाहित्याचा. हौस अंगची असली तरी वेषभूषेचें साहित्य तयार करून घेणें त्यांच्या शक्तीच्या बाहेरचें असतें. पण कांहीं श्रीमंत देवस्थानांनीं त्यांची ती सोय करून ठेवलेली आहे. उत्पन्नाचा ठराविक हिस्सा देवस्थानाला देण्याच्या करारानें आवश्यक तें सगळें साहित्य घेऊन या ग्रामीण नाटक मंडळ्या लोकाराधनासाठीं आणि रिकामे दिवस सार्थकीं लावून चार पैसे कमावण्यासाठीं दौऱ्यावर निघतात. बहुधा प्रत्येक गांवीं ग्रामदेवतेपुढें वर्षांतून एकदा यक्षगान व्हायचें हें ठरलेलें. या शिवाय कांहीं हौशे अन् नवशे श्रीमंत आपल्या अंगणांत यक्षगान घडवून आणतात तें निराळेंच.

यक्षगानांतलें नाट्य ज्या पौराणिक आख्यानांवर उभें करायचें, त्यांना ' प्रसंग ' म्हणतात. त्यांची भाषा कन्नड असते. मंगळूरकडची कोंकणी असते. यक्षगानाच्या पद्धति दोन : कूट अन् आट. कूटाला ' ताळमद्दळे ' असेंहि म्हणतात. ताळमद्दळे म्हणजे टाळ मृदंगाच्या साथीवर केलें जाणारें यक्षगान. एखाद्या घरांतल्या प्रशस्त सदरेवर हें होतें. यांत नृत्यनाट्याला फांटा असतो. त्यांत असतें तें केवळ प्रसंगाचें गायन. गायनाची पद्धत कर्नाटक संगीताशीं जुळणारी असते.

यक्षगान आट म्हणजे ' बैल आटम् ' याचे प्रयोग उघड्या माळावर अन् आम जनतेसाठीं होतात. सहा हात उंचीचे चार बांबू चार दिशांना उभे करून १५ × १२ फुटांची भूमि मर्यादित केली, कीं 'रंगस्थळ' तयार झालें. त्याला वर आंब्याचे टाळे बांधले, कीं त्याची शोभा झाली. बाजूला लहानशी जागा माडाच्या झांपांनीं कुडून घेतली, कीं रंगपट बनला. जमलेल्या प्रेक्षकांनीं समोर अन् दोन्ही बाजूंनीं आपापली जागा धरून बसावें. अस्तमानीं नटमंडळीचें जेवण आटपतें अन् मग ते रंगपटांत रंगायला बसतात. फाजील उत्साही प्रेक्षक झांपांच्या डोळ्यांना आपले डोळे भिडवून कोणता नट दुर्योधन होणार, कोणता युधिष्ठिर बनणार अन् द्रौपदीसाठीं कोण लुगडें नेसणार, त्याचा सुगावा घेऊं लागतात. घटका दोन घटका रात्र होते न होते, तों चारी दिशांनीं रंगस्थळाकडे प्रेक्षकांची रीघ सुरू होते. प्रहर रात्र होतांच रंगपटांत चेंड्यावर काठी पडते. 'चेंडें' म्हणजे ढोलासारखें एक वाद्य. तें उभें धरून दोन काठ्यांनीं

वाजवतात. पाठोपाठ मृदंगाचे बोल घुमूं लागतात. त्यांना झांजेची साथ मिळते. धुपाचा सुगंध दरवळूं लागतो. भागवताच्या म्हणजेच सूत्रधाराच्या मुखानें गणपतीचें स्तवन होतें. हें सगळें रंगपटांतच घडतें; रंगभूमीवर नव्हे.

गणेशस्तवन झाल्यावर मग रंगपटापासून रंगस्थळापर्यंत भागवताची मिरवणूक निघते. भागवताच्या मागें वादक आपापलीं वाद्यें वाजवीत चालतात. त्यांच्या आगेमागें 'दिवटिगे' म्हणजे दिवट्या धरणारे असतात. मिरवणूक रंगस्थळावर येतांच सगळे आपापली जागा घेतात. भागवत रंगस्थळाच्या मागें एका बाकावर बसतो.

भागवत ही यक्षगानांतली सर्वांत महत्त्वाची व्यक्ति होय. तो व्युत्पन्न असतो. पुराणग्रंथांचें त्याचें वाचन विस्तृत असतें. तो अथपासून इतीपर्यंत संगीताची बाजू सांभाळतो. पात्रांना नृत्य शिकविण्याचें अन् 'प्रसंगा' ची रूपरेखा समजावून देण्याचें कामहि तोच करतो. पात्रांनीं कांहीं वाह्यातपणा केल्यास तो रंगस्थळावरसुद्धा त्यांना चापतो. तो खऱ्या अर्थानें सूत्रधार असतो. तो सर्वांना आदरणीय असतो.

यक्षगान सादर करणारे लोक वयानें प्रौढ आणि पौराणिक आख्यानांशीं परिचित असतात. वेळीं-प्रसंगीं रंगभूमीवर ते स्वयंस्फूर्त संवाद रंगवतात, ते त्याचमुळें. राम, रावण, धर्म, दुर्योधन, यांचें त्या त्या प्रसंगांतलें काम ठरलेलें असतें. पण तें काम करणारीं माणसें बदललीं, कीं त्यांच्या बौद्धिक कुवतीप्रमाणें त्या त्या कामांत एक वेगळेंपण चमकून जातें. 'प्रसंग' नटांना माहीत असतो, तसाच तो प्रेक्षकांनाहि माहीत असतो. त्यामुळें पात्रापात्रांमधील शाब्दिक स्पर्धा त्यांना मोठी गमतीची वाटते. पण पात्रांनीं नाटकांत आपल्या कल्पनेचा स्वैर विहार सुरू करून कथानकाची गति रोधली, तर सूत्रधार आपल्या झांजेंतून विशिष्ट आवाज काढून त्यांना वळणावर येण्याची सूचना देतो. भागवत रंगभूमीवर स्थानापन्न झाल्यावर मग दोन 'कोडंगी' प्रवेश करून नाचूं लागतात. कोडंगी म्हणजे विदूषक. कोंकणांतल्या दशावतारांत त्यांनाच 'म्हादवी' म्हणतात. म्हादवी म्हणजे संस्कृत 'माढव्या'चा अपभ्रंश होय. आजचे कोडंगी ते उद्याचे नट असतात. वेडयावाकडया उडया मारून अन् प्रेक्षकांच्या चेहऱ्यावरच्या सुरकुत्या मोडून ते अंतर्धान पावले, कीं मग बाळगोपाळांचा प्रवेश !

बाळ-गोपाळ म्हणजे कृष्ण–बलरामाचीं प्रतीकें होत. पण ते एकदम रंगभूमीवर न प्रवेशतां प्रेक्षकांची उत्सुकता यथेच्छ ताणून मगच आपलें श्रीमुख दाखवतात. त्यासाठीं रंगभूमीवर दोघेजण एक चादरीवजा पडदा ताणून धरतात अन् त्याच्यामागें बाळ-गोपाळांचें नृत्य सुरू होतें. या नृत्याचें नांव आहे 'तेरे कुणित.' मग एकदम पडदा खेंचून घेतला जातो आणि तेंच नृत्य प्रेक्षकांना दृश्य होतें. ते समोर नाचत असतांनाच मागें भागवत नांदीचीं पदें गात असतो. गणपतीची लाकडी मूर्ति रंगस्थळावर आणीपर्यंत ती नांदी अन् तें नृत्य चालू राहतें.


बाळ-गोपाळ

मग येतात, ते दोन 'स्त्रीवेष.' हे स्त्रीवेष गोकुळांतल्या गोपींचे प्रतिनिधि असतात. त्यावेळीं जीं पद्यें गायिलीं जातात, त्यांत गोपींच्या कृष्णकन्हय्या-विषयींच्या गोड तक्रारी असतात.

यक्षगानाचा 'प्रसंग' कोणताहि असो; त्याच्या आधीं 'स्त्रीवेषा' पर्यंत हा सगळा पूर्वरंग व्हावाच लागतो. त्यानंतर मुख्य नाटकाचा प्रारंभ. मग त्या नाटकांत जीं पात्रें काम करणार असतील, त्यांचा रंगभूमीवर प्रथम परिचय करून देतात. रामलक्ष्मण असोत; अथवा पांच पांडव असोत; ते रंगभूमीवर एकदम आणि नाचत नाचतच प्रवेश करतात. या नृत्याला 'बोड्डलग' असें नांव आहे. चेंडयाच्या साथीनें तें केलें जातें.

मग 'प्रसंग' महाभारतांला असेल, तर युधिष्ठिर रथावर म्हणजे चार चाकें लावलेल्या छोट्याशा टेबलावर आरूढ होतो. हें टेबल नाटकांतल्या

द्वारपालाप्रमाणेंच हरकामी असतें. प्रसंगीं ते रथ होतें, प्रसंगीं शय्या होतें अन् प्रसंगीं सिंहासनहि बनतें. मग भागवत अन् युधिष्ठिर यांचें संभाषण अन् त्यांतूनच युधिष्ठिराची प्रेक्षकांना ओळख. हा संवाद कन्नडमध्यें किंवा कोंकणींत असला तरी तो साध्या बोलभाषेंत नसतो. भागवत व्युत्पन्न अन् युधिष्ठिर हस्तिनापुरचा सम्राट् ! मग ते इतरांप्रमाणें 'येरें गबाळें' काय म्हणून बोलतील ! त्याला संस्कृत भाषेचा वास हवा अन् कवीचें शब्दावडंबरहि हवेंच !

भागवत—राजाधिराज, राजमार्तंड, कोटिप्रकाश–

युधिष्ठिर—शाहबास !

भागवत—अरितिमिर मार्तंड–

युधिष्ठिर—शाहबास !

भागवत—सुस्वागतम्

युधिष्ठिर—वाहवा !

भागवत—नामाभिधानम् ?

युधिष्ठिर—भागवत महाशय ! तुम्ही हस्तिनापुरच्या राजाचें नांव कधीं ऐकलं आहे ?

भागवत—राजा युधिष्ठिर !

युधिष्ठिर—शाहबास, शाहबास ! आमीचि, आमीचि !

भागवत—यावेळीं सभाप्रवेश करायचं कारण ?

युधिष्ठिर—कारणं अनेक. निवेदन करतों—

आणि मग प्रेक्षक समजतात, कीं रंगभूमीवर आलेला हा भरघोस मिशांचा पायघोळ झगा नेसलेला, चुणीदार अंगरखा घातलेला, रत्नमालांनीं नटलेला, रंगीत पुरुष म्हणजे युधिष्ठिर.

यानंतर प्रसंग सुरू होतो. स्त्री पात्रें, विरोधी पात्रें, रंगभूमीवर यथायोग्य कालीं दाखल होतात. कधीं शृंगार, कधीं करुण, कधीं वीर, कधीं अद्भुत अशीं संस्कृतनिष्ठ संभाषणें त्यांच्यामध्यें झडूं लागतात. कथानक हळूहळू युद्ध-घटनेकडे सरकूं लागतें. 'प्रसंग' कोणताहि असो, त्याची इतिश्री कोणाच्या ना कोणाच्या तरी युद्धांतच व्हायला हवी. युद्ध नाहीं म्हणजे सगळें अळणी ! तें प्रेक्षकांना मुळींच मानवायचें नाहीं. त्यामुळें युद्ध-नृत्य हा यक्षगानाचा

उत्कर्षबिंदु असतो. युद्ध म्हणजे दोन युध्यमान व्यक्तींनीं तांडव पद्धतीनें फेर धरून नाचायचें अन् अधून मधून तलवार फिरवायची.

हें युद्धहि मुकें नसतें. त्यांत शत्रूला ‘ सावधान ’ म्हणून इशारा असतो. एकमेकांचीं उणींदुणीं काढून संवादहि चालू असतो. प्रसंगीं त्यांत राजनीतीचाहि वापर होत असतो. अधून मधून वीरगर्जनाहि होत राहते. दणकट पदाघात धूळ उभवीत राहतात. वीर अन् रौद्र असे दोन्ही रस तिथें पुंजाळून उठतात. चेंडें दणदणीत वाजूं लागतें. भागवत दमदार चालीचें पद गाऊन तो युद्धप्रसंग कां ओढवला, तें सांगत असतो. प्रेक्षकवर्ग डोळे ताणतो. त्याची खात्री असते, कीं या युद्धांत रामाला किंवा युधिष्ठिरालाच जय मिळणार आहे. त्याचा प्रतिस्पर्धी अखेर उताणा पडणार आहे. सत्य अन् आदर्शभूत असेल त्याचा पुरस्कार करणें, हा तर यक्षगानाचा अलिखित नियमच होय.

एवढें सगळें होईतों बाहेर अरुणोदय झालेला असतो. स्त्रीवेष हातांत आरती घेऊन नाचत नाचत रंगभूमीवर येतात. भागवत भरतवाक्य गाऊं लागतो. वाद्यें मृदु होतात. अन् रात्रभर एका जागीं ठिय्या देऊन बसून राहिल्यामुळें पायांना मुंग्या आलेले प्रेक्षक उभे राहून आपापलीं आसनें झटकतात. त्यांच्या मुद्रेवर समाधान असतें. त्यांच्या डोळ्याचेंहि पारणें फिटलेलें असतें.

यक्षगानांतल्या पात्रांचा अधिकार अन् जातिपरत्वें पोषाख वेगवेगळा असतो. राजा असेल तर त्याचा किरीट वेगळा, केवळ योद्धा असेल तर त्याचा वेगळा अन् दैत्य-राक्षसांचा त्याहून वेगळा! चेहरेपट्टी रंगवण्यांतसुद्धा हा फरक दाखवतात. राम-कृष्ण निळे रंगवतात. राजे महाराजे त्यांच्या दर्जाप्रमाणें गुलाबी, हिरवे किंवा लाल बनवतात. यम असेल, तर त्याच्या वाट्याला कोळसा! खलनायक अन् सेवक



यक्षगानांतले राजवेष

किंवा द्वारपाल यांची वेषभूषाहि त्यांच्या स्वभावधर्माला अन् दर्जाला शोभेल अशी ठेवतात. स्त्रियांची वेषभूषा परंपरेनें चालत आली असेल तीच असते. पण अलीकडे कालपरत्वें त्यांत 'फॅशनी' शिरूं लागल्या आहेत. पण एकंदरींत वेषभूषा अलंकारखचित, भडक अन् अवजडच असते.


दंतकथा अशी सांगतात, कीं यक्षगानाच्या त्या अज्ञात कर्त्याला त्यांतील नायक, खलनायक इत्यादि पात्रांची वेषभूशा कशी असावी, तें कांहीं केल्या सुचेना. त्याच चिंतनांत सदैव मग्न असतां एका रात्रीं त्याला स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत सारीं पौराणिक पात्रें रंगून, सजून त्याच्यापुढें उभीं राहिलीं. त्या दृश्याप्रमाणें मग त्यानें यक्षगानांतल्या नायकादि पात्रांच्या वेषभूषेची रचना केली. पण तरीहि एक संदेह त्यांत राहूनच गेला होता. त्याला स्वप्नांत दिसला, तो त्या त्या पात्रांचा छातीच्या वरचा भाग. खालीं कांहींच दिसलें नाहीं. म्हणून मग त्यानें छातीखालचा भाग झांकण्यासाठीं सर्वांना एकाच प्रकारचे झगे वापरायला दिले.

इथें यक्षगान आणि कथकळी या दोहोंतलें साम्य-वैधर्म्य सांगितलें पाहिजे. दोहोंतहि 'तेरे कुणित' अन् 'वोड्डुलग' नृत्य होतें. दोहोंतहि वेषभूषा बोजड, हालचालीला त्रासदायक अन् भडक अशी असते. फरक आहे तो पुढील गोष्टींत—

कथकळींत संवाद नसल्यामुळें सारा भर अभिनयावरच राहतो. नाट्यशास्त्रांतल्या मुद्रांच्या साहाय्यानें कथकळी-नटाला भावाविष्कार करावा लागतो. यक्षगान संवादप्रचुर असल्यामुळें त्यांतल्या अभिनयाचें स्वरूप स्थूल असतें. कथकळींत नृत्य प्रमुख, तर यक्षगानांत तें संवादाचें एक पूरक अंग असतें.

कर्नाटकांतली ही 'यक्षगान' नाट्यकला सुमारें चार-पांचशें वर्षांइतकी जुनी आहे. अनेक थोर कवि, भागवत व नट यांनीं तिची जोपासना केली आहे, कुञ्जल शेषगिरी भागवतार हे आजमितीस यक्षगानाचे सर्वश्रेष्ठ भागवत समजले जातात. पहाडी पण गोड आवाजाची देणगी त्यांना लाभलेली आहे. हराडी रामा, मटपाडी वीरभद्र, मारवी रामकृष्णय्या, चक्टी चावणय्या हे यक्षगान मेळ्यांतले कांहीं श्रेष्ठ नट होत.

★




कर्नाटकांत दर्शनीय अशीं बरींच स्थळें आणि क्षेत्रें आहेत. त्यांना धार्मिक महत्त्व  मी; पण ऐतिहासिक अन् कलाविषयक महत्त्व अधिक आहे. कर्नाटकाच्या भूमीवर अनेक राजवटी मांडल्या, मोडल्या. अनेक राजवंश उगवले, मावळले. अनेक संप्रदाय जन्मले, गाजले. त्या सर्वांनीं आपापल्या कारकीर्दीत त्या भूमीवर कांहींतरी निर्मून ठेवलें आहे. अक्षत, भग्न, अर्धभग्न, अशा कोणत्या तरी अवस्थेंत आजहि तें आपल्याला पाहायला सांपडतें. हाडामांसाचा मानवदेह शंभरीलाच खचतो; पण त्याची एखादी कलाकृति, त्यानें फुलवलेलें एखादें पाषाणपुष्प मात्र त्याच्याहून कितीतरी पटींनीं दीर्घजीवी होतें. योग्य प्रकारें जतन झाल्यास त्याला सहस्रकांचीहि आयुर्मर्यादा लाभते. कर्नाटकांतलीं अशीं कितीतरी शिल्पें अन् स्थापत्यें हजार वर्षांचें आयुष्य घेऊन उभीं आहेत. त्यांच्या दर्शनानें मन फुलतें, बुद्धि स्तंभित होते आणि आत्मा तृप्त होतो.

कर्नाटकाच्या या स्थलयात्रेला आपण विजापुरापासून प्रारंभ करूंया.

## विजापूर

विजापूर शब्द उच्चारतांच आदिलशाही हा शब्द त्याला येऊन चिकटतो. पण विजापूर कांहीं अदिलशाहीनेंच जन्माला घातलें नाहीं. त्याच्याहि आधीं तें विजयपूर नांवानें प्रसिद्ध होतें. कांहीं शिलालेखांवरून तें यादव घराण्यांतल्या जयतुंगाची राजधानी असल्याचेंहि कळतें. १४८९ सालीं अदिलशाही अस्तित्वांत आल्यावर विजापुराला तिच्याहि राजधानीचा मान मिळाला.

त्यानंतर पुढें दोनशें वर्षे तें यावनी वैभवानें तळपलें खरें; पण त्यानें शांति मात्र उपभोगली नाहीं. तें अनेक राजसत्तांच्या डोळ्यांत खुपरीसारखें सलत राहिलें. शिवाजीनें १७ व्या शतकांत अदिलशाहीचें कंबरडें मोडलें, हा इतिहास सर्वांना अवगत आहे. पण त्याचबरोबर अन्य यवनपातशाह्यांचीहि त्याच्यावर सतत वक्र दृष्टि होती. विजापूर गिळंकृत करायला सगळेच आसुसलेले. ' अमक्या तमक्यानें विजापुरावर चाल केली ' हें वाक्य विजापुरच्या इतिहासांत पानोपानीं लिहावें लागलें आहे. आणि म्हणूनच अदिलशाहीला त्याच्या सुरक्षिततेसाठीं अनेक तटबंद्या उभाराव्या लागल्या आहेत.

विजापूर शहर मोठें आहे. जिल्ह्याचें ठिकाण आहे. शेंगदाण्याच्या व्यापाराचें केंद्र आहे. पण त्याहीवर तें " City of tombs " आहे. पाश्चात्य प्रवाशांनीं त्याला हें नांव दिलें आहे. जागोजाग ढासळलेले तट, इतस्ततः दिसणारीं थडगीं अन् काळवंडलेले घुमट, यांच्यामुळें त्याच्यावर उदासीनतेचें आवरण पडल्यासारखें दिसतें. त्यावर चौफेर नजर टाकतांना जीवनाआधीं मरणाचें स्मरण होतें. कपटें, कारस्थानें, सत्तेचा मद, राजैश्वर्याचा दिमाख, अनिर्बंध भोगविलास, हें सगळें अखेर मातींत मिळायचें, असा संदेश ती भूमि मानवला बजावून बजावून देत आहे, असें वाटतें.

विजापुरांत माणूस जातो तो गोलघुमटाची जपमाळ ओढीत. पण त्या आधीं तिथला 'उपळ्या बुरुज' पाहायलाहि हरकत नाहीं. त्याची ऐंशी फूट उंची आक्रमिण्यासाठीं दगडी पायऱ्या बांधून काढल्या आहेत. हैदरखान नांवाच्या एका सेनापतीनें खाविंदांना खुष करण्यासाठीं स्वखर्चानें तो बुरुज बांधलेला आहे. पहिल्या अली अदिलशहाला लढाईत संपादलेल्या दोन मोठ्या तोफा ठेवण्यासाठीं सोयीस्कर जागा हवी होती आणि ती त्यानें हैदरकडून बनवून घेतली.

विजापूरची तिसरी मोठी तोफ म्हणजे मुलुखमैदान! तिचें खरें नांव आहे ' मालिक–इ–मैदान, म्हणजे मैदानाची अधिराज्ञी. उपळ्या बुरुजाच्या पूर्वेला तशाच एका दुसऱ्या बुरुजावर ती अधिष्ठित आहे. चौदा फूट लांबी, पांच फूट व्यास आणी सव्वा दोन फुटी तोंड, हें तिचें मोजमाप आहे. ही महामाया लांब पल्ल्याची नसून आंखूड पल्ल्याची आहे. भूमीचा

भार मस्तकीं वाहणाऱ्या शेषाला जें शक्तिसर्वस्व पणाला लावावें लागलें असेल, तेंच ही मुलुखमैदान शिरीं वाहणाऱ्या बुरुजाला लागत असलें पाहिजे. आज शतकानुशतकें ती थंड आहे, मुकी आहे; पण तालिकोटच्या लढाईंत विजयनगरच्या सैन्यावर हिनेंच गर्जून आग पाखडली होती, हा इतिहास समजल्यावर तिच्याजवळ जातांना जरा दचकच वाटतो.


गोलघुमट पाहण्याच्या पूर्वीं जोडघुमट पाहावा. एकाच उंचीचे हे दोन घुमट सख्ख्या प्रेमळ भावासारखे शेजार संभाळून उभे आहेत. एकाची बांधा-वळ अष्टकोनी असून दुसऱ्याची चौकोनी आहे, एवढाच दोहोंत फरक. विजापूर दरबाराशीं बेइमान ठरलेले आणि त्यामुळेंच मृत्युदंडानें उत्तीर्ण झालेले खान महंमद आणि खवासखान हे दोघे पितापुत्र तिथें काळझोप घेत आहेत.

बालेकिल्याच्या तटाला लागूनच खंदकाच्या पलीकडे आसार महाल आहे. तो पहायचा, तर बरोबर बायकामंडळी असल्यास त्यांना बाहेर ठेवावें लागतें. कारण महंमद पैगंबराच्या दाढीचा एक केंस या महालांत कुठेंतरी अज्ञात जागीं ठेवला असल्यानें तें स्थान स्त्रियांना वर्ज्य मानतात. त्याच्यासमोर विस्तीर्ण अन् तुडुंब असा तडाग आहे. तो त्या महालाच्या भव्यतेला सौंदर्याची जोड देतो.

विजापुरांत मशिदींना तोटा नाहीं; पण त्या सर्वांची सम्राज्ञी म्हणजे शहराच्या आग्नेय कोपऱ्यांतील जुम्मा मशीद ! इथें दुसऱ्या कोणत्याहि इमारतीनें एवढी जागा व्यापलेली नाहीं. अडीच हजार माणसें तिथें बसून नमाज पढूं शकतात. शुभ्र फरसबंदींत तेवढ्या जागा आंखूनच ठेवल्या आहेत. मधल्या मेहेरपीवर सोडलेला जाड रंगीत पडदा बाजूला होतांच तिथें अक्षरशः सुवर्णाक्षरांनीं लिहिलेलें कुराण तुमच्या डोळ्यापुढें झळाळूं लागतें.

गोल घुमटाचें अस्सल नांव आहे गोल गुम्बज. जसजसें त्याच्याजवळ जाऊं लागावें तसतसा तो महान्, अतिमहान् होऊं लागतो. सभोंवतींचीं तुरळक झाडें म्हणजे त्याच्या परसांतलीं तेरड्या टाकळ्याचीं रोपटीं वाटतात. तोच एक अद्वितीय आणि अतुलनीय ! महाद्वारांतून आंत शिरतांच तिथला तो विस्तार अन् वरची ती उंची पाहून माणसाला वाटावें, कीं आपण एक

प्रादेशमात्र ब्राहुल आहों. मानवानें निर्मिलेलें तें गगनचुंबी स्थापत्य मानवालाच तुच्छ करून बसलें आहे.



गोल घुमट

त्या चौकोनी इमारतीच्या मध्यभागीं महंमद आदिलशहा चिरनिद्रेंत पहुडला आहे. त्याच्या थडग्यावर त्या गोलघुमटाचें आच्छादन आहे. इ. स. १६२७-१६५५ या कालखंडांत हा स्थापत्याहिरा बांधला गेला. अदिलशाहींतल्या शहांनीं जणूं हा संकेतच ठरवून टाकला होता, कीं गादीवर येतांच आपली कबर बांधायला सुरुवात करायची. महंमद शहाचा बेटा दुसरा अली यानें बापसे सवाई व्हायचें ठरवलें. अली रोझा ही त्यानें आपल्या थडग्यासाठीं बांधायला काढलेली इमारत. गोल घुमटाचा विस्तार २०५ चौरस फूट, तर अली रोझाचा २२५ चौरस फूट. आपल्या कबरचिी छाया गोलघुमटावर पडावी अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. पण त्याचें हें शेखमहंमदी स्वप्न कमानीच्यावर चढूंच शकलें नाहीं.

खालीं चौकोनी इमारत, वर अर्धगोलाकृति घुमट आणि चारी कोनांना सात ताळांचे; पण अष्टकोनी इमारतीला चिकटून उभे असलेले मनोरे, अशी गोल घुमटाची रचना आहे. ती मृत्युभूमि असली तरी अशुभ वाटत नाही. त्या वास्तूच्या भव्यतेंत सारीं अशुभें, अमंगलें निमालीं आहेत. एक आश्चर्याचें आगर, एक वास्तुकलेचें आदर्श धाम, म्हणूनच ती स्थापत्यरचना प्रेक्षकांच्या मन-बुद्धींना भारून टाकते.

मनोऱ्याच्या वाटोळ्या जिन्यानें वर चढतांना प्रत्येक मजल्यावर हवें तर क्षणभर विसावतां येतें. एकेक मजला चढावा तसतसा वाऱ्याचा जोर वाढतो. त्याचा 'घों ऽऽ' असा अनुस्यूत आवाज कानामनाला असह्य होतो. सातव्या मजल्यावर पोंचतांच 'भूर्भुवः स्वः' इत्यादि सप्तक आक्रमल्यासारखें वाटतें.

घुमटाच्या वर्तुळाच्या क्षितिजाला लागून आंतल्या अंगानें तेरा फूट रुंदीचा सज्जा आहे. तिथून वर पाहतांना मान उलटते अन् खालीं पाहतांना भोवळ येते. एक नुसती मारुतीची चुटकी वाजवली, तर ती प्रतिध्वनींच्या मालिकेनें एकीची दहा बनून कर्णरंध्रांत घुसते. गोलघुमट जणूं 'एकमूचें दहम्' बनवून द्यायला कर्णाचें औदार्य अंगीकारून बसला आहे.

याहून सूक्ष्म अशी एखादी गंमत हवी असेल, तर त्या सज्जाच्या वर्तुळांत आपल्या मित्राला अगदी समोर म्हणजेच १२४ फुटांच्या अंतरावर उभें राहायला सांगा. मग तुम्ही स्वतःचें मनगटी घड्याळ इकडे घुमटाच्या पालथ्या कढईला टेकवून धरा. मग त्या मित्राला म्हणा कीं, 'भिंतीला कान लाव.' तसें त्यानें केलें, कीं विचारा 'काय रे, तुला कांहीं ऐकूं येतं का?' त्यावर तो आश्चर्याचा झटका आल्यासारखें करून म्हणेल, 'अरे हो, तुझ्या घड्याळाची टिकटिक स्वच्छ ऐकतोय् मी. अद्भुत! खरंच अद्भुत!'

होय! गोलघुमटाच्या त्या स्थपतीचें हें ध्वनितंत्र खरोखरच अद्भुत अन् अतर्क्य आहे. जगांतले आश्चर्यलुब्ध प्रवासी भारतांत आल्यावर विजापूरचा गोलघुमट पाहायला चुकत नाहींत, त्याचें कारण हें!


याच विजापूर जिल्ह्यांत आणखी तीन कलाक्षेत्रें जवळीक धरून उभीं आहेत: बदामी, ऐहोळ आणि पट्टदकल. या तीन्ही स्थळांत मिळून माणूस मोजतांना थकेल इतकीं मंदिरें आहेत. चालुक्यांच्या स्थापत्यशैलीचा तो एक मनोहर गुच्छ आहे. चालुक्य शिल्पाची गंगोत्री सुरू झाली, तीहि इथूनच. इ. स. ४०० ते ८०० या चार शतकांतली ही जडण-घडण आहे.

बौद्ध धर्माचा महापूर भारतांत याच काळांत ओहटीला लागला. त्याबरोबरच कित्येक शतकें तोंड लपवून बसलेल्या हिंदुधर्मानें पौराण धर्माचें सर्वसंग्राहक, नवें परिष्कृत रूप घेऊन डोकें वर काढायला सुरुवात केली. कलेच्या क्षेत्रांतहि त्याचा प्रभाव दिसूं लागला. त्यापूर्वीची स्थापत्यरचना म्हणजे

बौद्धांचे स्तूप, चैत्य अन् विहार. आतां नवे कलाकार निर्माण झाले. त्यांनीं बौद्धपरंपरा धरली; पण तिच्यांत नवा प्राण, नवा आशय नवा आविष्कार ओतला. बौद्धांच्या नव्हे; तर हिंदूंच्या भक्तिमार्गाला पोषक अशा नव्या गुंफा त्यांनीं खोदल्या अन् नव्या पद्धतीचीं मंदिरेंहि निर्माण केलीं.

## बदामी

बदामी हें त्यांतलेंच एक नवें क्षेत्र. बदामीचा संबंध वातापि दैत्याशीं लागतो. इल्वल अन् वातापि हे दोघे दैत्यबंधु त्या काळीं या भागावर कबजा करून बसले होते. दोघेहि मानवभक्षक बनले होते. गृहस्थाची सोंगसंपादणी करून एखाद्या अतिथीला, विशेषेंकरून ब्राह्मणाला घरीं बोलावून आणायचें अन् त्याला भोजन घालायच्या ऐवजीं त्याचेंच भोजन करायचें. त्यावेळीं अगस्त्य ऋषि विंध्याचल उतरून दक्षिणच्या पदयात्रेला निघाला होता. या जोडगोळीला तें समजलें. अगस्त्याच्या दक्षिण यात्रेंतला सांस्कृतिक आशय त्यांना रुचणारा नव्हता. म्हणून त्यांनीं अगस्त्यऋषीवरहि तोच प्रयोग करून त्याच्या अस्थी माळावर पसरायचें ठरवलें. पण अगस्त्याच्या बाबतींत त्यांचा मंत्र त्यांच्यावरच उलटला. अगस्त्यानें त्यांचेंच भोजन केलें अन् आपल्या भरल्या पोटावरून जिरवणीचा हात फिरवला. इथें भोजन शब्दाचा तात्पर्यार्थ अगस्त्याकडून त्या दोघांचा संहार असा समजावा.



इल्वल-वातापी

ही झाली पुराणांतली कथा. पुराणांतून इतिहासाच्या कालखंडांत आल्यावर कळतें, कीं बदामी ही चालुक्याची राजधानी होती. हें गांव एका उंच

म्हैसूर राज्याच्या बेल्लारि जिल्ह्यांत तिचें स्थान आहे. तिला तुंगभद्रेची पुनीत जवळीक लाभली आहे. आज या सगळ्या परिसराला हंपी म्हणून ओळखतात. हंपी म्हणजे बुक्क-हरिहरांचा उपास्य देव, पंपापति विरूपाक्ष याच्या आसपास वसलेलें एक खेडें होय.

रामायणांतली किष्किंधा याच्या जवळच आहे. तें सुप्रसिद्ध पंपासरोवरहि याच भागांत इथून चार कोसांच्या अंतरावर आहे. रामायणकाळांत हा प्रदेश वालि-सुग्रीवांच्या राज्यांत मोडत होता. किष्किंधेची त्यांची राजधानीहि सामान्यांतली नव्हती. तिथे उत्तुंग अन् प्रशस्त असे वाडे हुडे होते. तिच्याभोंवतीं अनेक तट उभारलेले होते. सभोवतीं राक्षसांचें कडें असूनहि राक्षसांना त्या राजधानीचा टवकासुद्धा उडवतां आला नव्हता. किष्किंधा ही रावणाच्या चौदा चौकड्यांत वसलेली एक पाचरच होती म्हटलें तरी चालेल. वानर वीरांनीं प्राणपणानें तिचें रक्षण केलें होतें.

सीताविरही राम आपल्या जानकीचा शोध करीत करीत खालीं दक्षिणेस जात असतां पंपासरोवरावर हनुमंताची अन् त्याची भेट झाली. त्याच क्षणीं तो बलभीम त्या पुरुषोत्तमाचा दास झाला. त्यानेंच पुढें अग्नीच्या तेजस्वी साक्षीनें राम-सुग्रीवांचें मैत्र घडवून आणलें. पुढें याच सुग्रीवाच्या अठरा पद्म वानरदळाच्या साहाय्यावर रामानें सागर उल्लंघून लंकेवर धडक मारली.

एवढ्या पौराणिक महत्त्वाचा हा प्रदेश. त्यामुळें त्याच्या दर्शनाला एक निराळें गांभीर्य प्राप्त होतें. पुढें याच प्रदेशावर बुक्क-हरिहरांनीं एक विशाल साम्राज्य उभें केलें. विजयी हिंदुधर्माचा धवल ध्वज उंच उभवून फडकत ठेवला. पंधराव्या शतकापासून पुढें तीनशें वर्षें या साम्राज्यानें दक्षिणापथांत कोण्या शत्रूला भृकुटि उंच करूं दिली नाहीं. सर्वग्रासी इस्लामी सत्तेला साम्राज्याच्या चतुःसीमांच्या बाहेरच्या अन् तरीहि खालच्या मानेनें राहायला लावलें. आज आपण दक्षिणेंत जें स्थापत्य, जें कलावैभव, जें हिंदवी, असें कांहीं तरी उभें अन् समग्र असें पाहतों, ती सारी पुण्यसंपदा विजयनगर साम्राज्याच्या जमेच्या खातीं मांडायला हवी.

होस्पेट हें हंपीला जाण्यासाठीं उतरण्याचें रेल्वेस्टेशन. हें शहरहि विजयनगरसम्राट् कृष्णदेवराय याच्याच हातचें आहे. आपली माता नागलदेवी हिच्या स्मरणार्थ त्यानें तें वसवलें. म्हणून पूर्वीं त्याला नागलपूरच म्हणत.


कृष्णदेवराय राजकारणाच्या धकाधकीनें शिणला भागला, कीं कांहीं दिवसांच्या विश्रांतीसाठीं इथें यायचा. इथून हंपी सात मैलांवर पडते. होस्पेटहून इथे बसगाड्या जातात. पण कुठलीहि बस एका विशिष्ट ठिकाणीं उभी राहते अन् प्रवाशांना म्हणते, 'चला, पाहून या सारं !' पण 'चाली चाली जाईन अन् पाहून येईन' अशी जर हंपीविषयीं कोणी कल्पना करील, तर तो फसला म्हणून समजावें. कारण हंपीचें चंक्रमण म्हणजे शतपावली नव्हे. सगळें फिरून पाहीतों पायांत गोळे येतात अन् अंगाचे टांके ढिले होतात. हंपीचे अवशेष एका जागीं पुंजीभूत नाहीत. तें काहीं चार-दोन एकर जागेंतलें संग्रहालय नव्हे. हंपीचें स्थापत्य अन् शिल्प नऊ चौरस मैलांच्या परिसरांत इतस्ततः पसरलेलें आहे. होस्पेटहून निघालें, कीं सुमारें पांच मैलांवर उतार सुरू होतो. आपण टेकड्यांनीं बनवलेल्या एका निसर्गसिद्ध तटबंदींत उतरतों. दोन टेकड्यांमधली खिंड कृत्रिम भिंतीनीं बुजवलेली दिसते.

इथल्या टेकड्या झाडाझुडपांच्या बाबतींत वंध्या आहेत. त्यांच्या पोटीं जन्मले ते सारे गोरेगोमटे दगड ! ही पुत्रसंपदा गांधारी अन् कद्रु यांनाहि लाजवणारी. त्यामुळें हिरवळीचा अभाव. या दगडांच्या पायांना कधीं-काळीं तरी माती लागली असेल कीं नाहीं तें तो पंपापतिच जाणे ! दगडांनींच बनवलेल्या कपारी त्यानींच बनवलेले कोनाडे अन् त्यांनीच बनवलेल्या श्वापदांच्या आश्रयदात्या गुंफा. एकावर एक त्यांचेच थर. कधीं आजोबाच्या अंगाखांद्यावर छोटीं नातवंडें पतवंडें आरूढ झालेलीं, तर कधीं त्यांच्याच डोक्यावर ढेरपोट्या आजोबा स्वार ! मला वाटतें समुद्रावर सेतु बांधायला ते नळ, नीळ, जांबुवंत इथूनच दगड घेऊन गेले अन् सेतु पुरा होऊनहि जाग्यावर एवढ्या राशी शिल्लक उरल्या.



नरसिंहमूर्ति

पण याच दगडांमुळें विजयनगर उभारणाऱ्या गवंडयांची मोठी सोय झाली. रस्त्याच्या कडेला एखादा शिलाखंड दिसला, कीं तिथला एखादा कसबी त्याला म्हणायचा. 'थांब, तुझं ढेरपोट जरा मोकळं करतों.' आणि मग त्यानें छन्नी हातोडा चालवून त्याच्यांतूनच एक स्तंभयुक्त विश्राममंडप निर्माण करायचा. मग तो वाटेच्या वाटसराला घटकेच्या विसाव्यासाठीं उपयोगी पडायचा. असे अनेक लहानमोठे छायामंडप हंपींत जागोजाग विखुरलेले आहेत. ते जसे वाहत्या रस्त्यावर आहेत, तसेच टेकडयांच्या अंगाखांद्यावरहि आहेत. तिथल्या स्थपतींनीं ती सगळी राजधानीच अशा या दगडांतून निर्माण केली आहे.




विठ्ठलस्वामी मंदिर

कृष्णदेवराय हा विजयनगरच्या सम्राट्परंपरेंतला मेरुमणि होय. साम्राज्याचा प्रतापसूर्य त्यानेंच मध्याह्नाला चढवला. इथल्या कितीतरी वास्तु त्यानें योजून बांधलेल्या आहेत. तो 'दसेरा डिब्बा' नांवाचा सिंहासनाचा चौथरा पाहा. हंपीचा तो एक प्रख्यात अवशेष आहे. कृष्णदेवरायाने कलिंगविजयाचें स्मारक म्हणून तो बांधला. या प्रशस्त चौथऱ्याचा भिंतीवर उठावाची सुरेख चित्रकला आहे. रणधुमाळीसाठीं निघालेले शस्त्रसज्ज सैनिक, हत्ती घोडयांच्या पलटणी, कामिजनांचें युगुलनृत्य, त्या नृत्याला पिचकारीनें रसार्द्र करणाऱ्या विलासिनी योषिता, इत्यादि अनेक दृश्यें तिथें पाहायला मिळतात. रक्ताचा, पिचकारीचा अन् विलासांचा असे त्रिविध रंग तिथें एकमेकांत मिसळले आहेत.

कृष्णदेवरायाचा राजप्रासाद आतां उभा नाहीं. तो तसा असता तर त्यानें नखशिखांत नाजुक कारागिरीचें जें दर्शन घडवलें असतें, त्याची कल्पना त्या पांच फूट शिल्लक उरलेल्या त्याच्या पायावरून करतां येते.

इथलें भव्य देवस्थान म्हणजे विठ्ठलरायाचें मंदिर. कृष्णदेवरायाच्या कारकीर्दींत सुरू झालेलें याचें बांधकाम त्याच्यानंतर आलेल्या अच्युतरायाच्या कारकीर्दीपर्यंत चालू होतें अन् तरीहि तें शेवटीं अपुरेंच राहिलें आहे. याचें प्रांगणच मुळीं पांचशें फूट लांब अन् तीनशें फूट रुंद आहे. त्यांत प्रवेश करायला तीन गोपुरद्वारें आहेत. मंदिराचे मुख्य विभाग तीन : गर्भगृह, मंडप आणि अर्धमंडप. मंदिरांत पाऊल टाकायचें तें या अर्धमंडपांतूनच. एकसंध बाराफुटी छप्पन्न खांब या अर्धमंडपाला तोलून धरतात. ते खांबहि अनलंकृत नव्हेत, तर कोरून सुंदर बनवलेले. कोरण्याची पद्धतहि वेगळी. छातीएवढ्या उंचीचा खांबाचा दोन हात भाग धरायचा. त्यांतच बारीक बांबूएवढे सुटे स्तंभ कोरून त्यांचा पिंजरा बनवायचा. मुख्य खांबाच्या भोंवतीं जणूं त्यांचें चौफेर कुंपणच. त्या प्रत्येक खांबाचा नादहि वेगळा ! सगळी रचना ही अशाप्रकारची.

विजयनगरचा सुप्रसिद्ध रथ तो याच आवारांत कल्याण मंडपाच्या जवळ आहे. एकाच दगडांत कोरलेलें हें सर्वावयवीं संपूर्ण असें शिल्प जितकें



दगडी रथ

सुश्लिष्ट तितकेंच प्रमाणबद्ध आहे. थोड्याशा प्रयत्नानें त्याचीं चाकेंहि फिरवतां येतात. हंपीच्या शिल्पकलेच्या मस्तकीं तो राजमुकुटच जणूं शोभतो.

इथलें 'हजारा' राममंदिर खास राजघराण्यांतल्या मंडळीसाठीं होतें. याच्या बाहेरच्या भिंतीवर रामायणांतली चित्ररचना दिसते. याच्या जवळच दुसरी एक बंदिस्त इमारत असून तिला अनेक भूमिगत दरवाजे आहेत. हिचा उपयोग कशासाठीं करीत तें अजून कळलेलें नाहीं. रायगडावर शिवाजी महाराजांनीं भुयारी खलबतखाना बांधला आहे, तसलें तर कांहीं हें नसेल ना!

तिथूनच पुढें थोड्या अंतरावर कमलमहाल अन् त्यापुढें हत्तींचे तबेले हारीनें बांधलेले आहेत. विजयनगरचा गजदळावर बराच भर असावा. त्या इमारतीपुढच्या पटांगणांत इकडे तिकडे विखरून पडलेले मूर्तींचे अवशेष गोळा करून ते ओळीनें मांडून ठेवलेले आहेत. इथली भव्य शिवप्रतिमा न चुकतां पाहावी. अच्युतरायाचें मंदिरहि पाहिल्यावांचून राहूं नये. सलग एका दगडाच्या तीस फूट लांब अन् चार फूट उंच अशा घडीव शिळा एकावर एक रचून त्या मंदिराच्या भिंती बनवलेल्या आहेत. या एवढ्या अवजड शिळा यंत्राविना त्या कामगारांनीं कशा काय एकमेकींच्या डोक्यावर चढवल्या असतील, तें एक 'अहो आश्चर्यम् !'

इथें देव आहेत ते तुंगभद्रेजवळच्या दोन मंदिरांत. एका ठिकाणीं उंचा पुरा काळाशार कोदंडराम उभा आहे अन् दुसऱ्या ठिकाणीं पंपापति विरूपाक्ष. या दोन्हीं मंदिरांत नित्य पूजाअर्चा चालते अन् उत्सवहि होतात.

इथला आणखी एक महाप्रचंड देव म्हणजे नरसिंह ! तो आसनमांडी घालून बसलेला आहे, तरी त्याची उंची दहा हात सहज भरेल. शिवाय त्याच्या मस्तकीं नागफणीचें छत्र अन् त्याहिवर कीर्तिमुख, म्हणजे ती उंची आणखीच वाढते. इथें त्याच्या मांडीवर उताणा हिरण्यकशिपु नाहीं; पण तरीहि त्याचा जबडा उघडलेला अन् डोळे बाहेर आलेले आहेत. त्याचे चतुर्भुज भग्न झाले आहेत. त्यांतून गळून पडलेलीं चक्र, गदा इत्यादि आयुधें तिथेंच एका कोपऱ्यांत रचून ठेवलेलीं आहेत. ते चारी बाहू त्या मूर्तीला कल्पनेनें जोडून अन् तीं आयुधें हातीं देऊन तुम्ही तें उग्र ध्यान न्यहाळा; खरोखर छातींत धसकाच बसेल.

या देवाचें नांव आहे 'योग-नरसिंह.' पण आजमितीस तो 'वियोग-नरसिंह' ठरला आहे. कारण काय तें विचारा. मूळ शिल्प घडवतांना त्याच्या

डाव्या मांडीवर लक्ष्मी बसवलेली होती. पण कालांतरानें या उघड्या जागेंतलें वाऱ्यावादळाचें तांडव तिच्या नाजूक प्रकृतीला सोसलें नाहीं अन् एक दिवस ती आपल्या वल्लभाच्या-त्या पुरुषोत्तमाच्या मांडीवरून धरणीवर कोसळली. नरसिंहाच्या भुजदंडाचा आश्रय घेतलेला एक सकंकण हस्त तेवढा तिथें चिकटून राहिला आहे अन् तो सहज पाहतां दिसून येतो. एखाद्याला वाटावें, कीं त्या वियोग-दुःखानें तो नरसिंह एकदा जो अधोमुख झाला, तो कायमचाच तसा राहिला आहे. कृष्णदेवरायाच्या हातून या मंदिराचें फक्त गर्भगृहच बांधून झालें. त्यावर छप्पर चढलें नाहीं. त्या गर्भगृहाच्या मानानें त्या समग्र मंदिराचा विस्तार अवाढव्यच झाला असता. पण तें सारें कल्पनेंत राहिलें आणि त्यामुळें हा नरसिंह अक्षरशः उघड्यावर पडला.

एवढीं स्थळें अन् इतक्या वास्तु पाहिल्या, कीं हंपींतलें पाहणें संपतें. मग उरतो तो बारीक सारीक तपशील! पण तो सगळा भरून काढायला प्रेक्षकाजवळ तेवढा वेळहि नसतो. हंपीच्या रस्त्यांतून हिंडतांना केळीच्या बागा, उसाचे मळे, भाजीपाला, अशी बरीच लागवड दिसते. सांगण्यासारखी गोष्ट ही, कीं विजयनगरच्या काळांत त्या सम्राटांनीं तुंगभद्रेचा कालवा खोदून राजधानींत जें पाणी खेळवलें, त्या पाण्यावरच आजहि तिथें मळे पिकतात.

आणखी एक कलाक्षेत्राचें त्रिदळ कर्नाटकाच्या पश्चिम अंगाला हासन जिल्ह्यांत आर्सीकिरी-म्हैसूर या लोहमार्गावर आहे. श्रवण बेळगोळ, बेलूर अन् हळेबिड हीं त्या क्षेत्रांचीं नांवें होत. म्हैसूर अन् बॅंगलूर या दोन्हीं ठिकाणांहून बसनें ही त्रिस्थळी करतां येते. श्रवण बेळगोळला जायचें, तर चन्नरायपट्टणला उतरून वेगळा फाटा धरवा लागतो. हा प्रवास १८ मैलांचा आहे. हें दिगंबर जैनांचें तीर्थस्थान आहे. त्यामुळें इथें जैन यात्रेकरू बरेच येतात. इतर प्रवाश्यांची संख्या त्याहून जास्त असते. त्याचें एकमेव कारण म्हणजे तिथला तो गोमटेश्वर किंवा बाहुबली!

गांव लहानसेंच पण टुमदार आहे. दोन आवळ्या जावळ्या डोंगरटेकड्यांच्या मधें तें वसलें आहे. एका डोंगराचें नांव विंध्यगिरि अन् दुसऱ्याचें चंद्रगिरि. विंध्यबद्दल 'इंद्र' असाहि पाठभेद आहे. गांवांत मधोमध एक सुबद्ध तळें अन् त्याच्या चारी बाजूंना घरें अन् मंदिरें मांडलेलीं. गांवांत प्रामुख्यानें माडाचींच झाडें दिसतात. त्यामुळें शहाळीं विपुल अन् मुंबईच्या

मानानें खूप स्वस्त. बसमधून उतरलेला प्रवासी तहानेलाच असतो. तो प्रथम एक दोन शहाळ्यांचे जलकुंभ ओठावर पालथे करतो, घटाघटा त्यांतलें अमृतजल पितो, मग मऊ लुसलुशीत खोबरें जिभेवर ठेवतो अन् अशा प्रकारें प्रथम आत्मारामाला तृप्त करून मगच विंध्यगिरीवर पाय ठेवतो.

श्रवण म्हणजे श्रमण. बेळ म्हणजे शुभ्र अन् गोळ म्हणजे सरोवर. हे कन्नड शब्द आहेत. सर्वांचा मिळून अर्थ होतो तो 'श्रमणांचें धवल सरोवर.' याला गोमटपूर असेंहि दुसरें नांव आहे. गोमटेश्वराच्या पुतळ्यावरून तें पडलें आहे.

या क्षेत्राच्या इतिहासाचा धागा सनपूर्व तिसऱ्या शतकापर्यंत जाऊन पोंचतो. त्या काळीं भद्रबाहु हा एक जैन आचार्य मगधांतून निघून आणि विंध्य ओलांडून खालीं दक्षिणापथांत उतरला. समागमें त्याचे बारा हजार शिष्य. पूर्व भारतांत बराच मोठा दुष्काळ पडला, तेव्हा आपल्या शिष्यांचे प्राण वांचविण्यासाठीं भद्रबाहूनें हें एवढें दीर्घ प्रयाण केलें. या बारा हजारांत मगधाचा वृद्ध अन् संन्यस्त असा राजा चंद्रगुप्त मौर्य हाहि होता. हा चंद्रगुप्त म्हणजे सम्राट् अशोकाचा आजा होय. त्यानें भद्रबाहूकडूनच जिनदीक्षा घेतली होती.

भद्रबाहु इथवर प्रवास करीत आला अन् त्याला कळलें, कीं आपल्या आयुष्याच्या दिव्यांतली तेलवात सरली. त्यानें मग फक्त चंद्रगुप्ताला तेवढें आपला अंत्यकाळचा सेवेकरी म्हणून जवळ ठेवलें अन् बाकीच्या सर्व शिष्यांना चोल, पांड्य इत्यादि दक्षिण देशांचा मार्ग दाखवला. पुढे चंद्रगिरीवरच्या एका गुहेंत समाधि लावून त्यानें देह सोडला. चंद्रगुप्तानें गुरुचरणांच्या चिन्हांची पूजा अन् तप करीत इथेंच आपलीहि अखेर साधली.

तेव्हापासून हें स्थान जैन संस्कृतीचें महाक्षेत्र बनलें. पुढें अनेक दिगंबर मुनींनीं हीच आपली तपोभूमि केली. जैन तत्त्वज्ञानाचे अनेक ग्रंथ इथें जन्माला आले. अशीं कित्येक शतकें लोटलीं. त्यानंतर १० व्या शतकांत इथें बाहुबलीचा पुतळा उभा झाला अन् हें सार्वजनिक यात्रास्थान झालें. हें अलौकिक, अद्भुत काय आहे, तें एकदा पाहून येऊं या म्हणून जिज्ञासूंचा इथें पायरव सुरू झाला.

बाहुबली अन् भरत हे दोघे ऋषभदेवाचे पुत्र. हा राजा भागवतांत आपल्याला आढळतो. त्याचें राज्य दोन्ही मुलांना समसमान मिळालें. पण

तरीहि पुढें दोघां भावांत वितुष्ट यायचें तें आलेंच. अखेर युद्धापर्यंत मजल येऊन ठेपली. त्या युद्धांत भरताचा पराभव झाला. मग बाहुबली सम्राट् बनला. पण त्याच्या वृत्तीला ते साम्राज्यभोग मानवण्याजोगे नव्हते. तो मुळांतच वीतराग होता. त्यानें थोड्याच दिवसांत राज्यत्याग करून तपाचा मार्ग धरला. बाहुबली राज्यांतून तसाच भवसागरांतूनहि मुक्त झाला.

त्याच बाहुबलीचा हा पुतळा. दाक्षिण भारतांतली ही सर्वांत भीममूर्ति होय. याची उंची ५७ फूट असल्याचें सांगतात. म्हैसूरहून निघाल्यावर चन्नरायपट्टणच्या अलीकडे कित्येक मैलांवरून या पुतळ्याचें दर्शन होऊं लागतें. एक नुसती उभी जाड रेषा अन् तिच्या माथ्यावर एक टेंगूळ अशा स्वरूपांत प्रथम त्याचा साक्षात्कार होतो. थोड्या वेळानें ती रेषा आणखी थोडी स्पष्ट होते. रस्ता वळला कीं, अदृश्य होते अन् पुन्हा केव्हांतरी मधेंच डोकें वर काढते. अशा प्रकारें ती यात्रिकांची उत्कंठा वाढवीत राहते. ती उत्कंठा डोळ्यांत घेऊनच तो श्रवणबेळगोळला उतरतो.

कुठलीहि बस इथे सकाळीं अकरा साडे अकरांच्या आंत पोंचत नाही. परतीची तीच बस गांठायची तर यात्रिकांची लगबग होते. मग तशा त्या उन्हाच्या कढावर तो डोंगर चढावा लागतो. डोंगर म्हटला तरी त्यावर मातीचा कण नाही. मातीच्या अभावीं झाड नाही की झुडप नाही. निव्वळ साद्यंत भुरका कातळ! त्यावर पायऱ्या म्हणून खांचा पाडलेल्या आहेत. मध्यान्हाच्या आधीच त्या तापून बसतात. जोडे खालीं ठेवून अनवाणी तो डोंगर चढला पाहिजे असा इथला कठोर नियम. त्यामुळें हाल हाल होतात. क्षणभर विसावा घ्यावा म्हटलें, तर मधें कुठें तशी जागा नाही. अर्ध्या वाटेवर एक दगडी कमान भेटते. पण तीच मुळीं जन्मदरिद्री आहे. तिला मुळीं रूपच नाही, तर सावली कुठून असणार! अशा स्थितींत प्रवाश्यांपुढें मार्ग दोन: एक तर तें तप्तपाषाणदिव्य करावें, अन्यथा आल्या पावलीं परत फिरावें.

पण यात्रिकालाहि कांहीं जिद्द असतेच. तो म्हणतो, 'वर जायचंच!' आणि मग तो चटपटत्या पायांनीं एकेक पायरी मागें टाकूं लागतो. अशा सहाशें वीस पायऱ्या चढल्यावर मग डोंगरमाथा भेटतो. जरा वळण घेतलें कीं द्वारमंडप सावली देतो. तिथें घाम सुकतो, तळपाय निवतात आणि

तिथून एक महाद्वार ओलांडून आंत जातांच बहुबलीचा तो पुतळा ' धैर्ये च हिमवानिव' म्हणतात तसा नखशिखान्त आपल्या डोळ्यांपुढें उभा राहतो.

बाहुबलीचीं कितीहि छायाचित्रें पाहा. त्यांतहि त्याची भव्यता लोपत नसली, तरी पण साक्षात् दर्शनाची सर त्या चित्रांना नाहीं. हें दर्शन भव्यतेच्याहि पलिकडे आपल्याला घेऊन जातें. त्या दर्शनानें मनाला स्तंभ येतो. विचारांचे पंख मोडतात. आपण काय पाहत आहों, याचाच क्षणैक विसर पडतो. द्रष्टा-दृश्य एकंकार होऊन जातात. चर्मचक्षूंचें कार्य सुरू होतें तें थोडा वेळ गेल्यावर !



बाहुबली – श्रवणबेळगोळ

वर्णानें भुरका गोरा आणि वयानें सामान्यतः चाळिशीचा असा तो बाहुबली दिसतो. संपूर्ण दिगंबर ! प्रत्येक अवयव घाटदार अन् प्रमाणबद्ध ! किरटेपणा कुठें नाहींच. तो समग्र आकार अणूअणूंतून पुरुषप्रत्यय घडवणारा आहे. उघडा असून त्याच्या मुखावर लज्जेचा भाव नाहीं, कीं डोळ्यांत वासनेचा ठाव नाहीं. नेत्र स्थिर अन् ध्यानमग्न. कान दीर्घ अन् लोंबते. जवळ जवळ खांद्याला भिडलेले. भुवया म्हणजे जणूं शिवधनुष्य. केस कुरळे, हनुवटी किंचित् उचललेली, विशाल छाती, भरदार खांदे, उदरावर त्रिवली अन् जिवणीवर स्मिताची रेषा. ती रेषा जणूं विश्वाच्या अनुकंपेतून न्हाऊन आली अन् ओलेत्यानेंच त्याच्या अधरावर चढली.

त्याच्या कमरेपर्यंत दोहीं अंगीं वारुळ वाढलें आहे. त्यांत बिळें आहेत. त्यांतून कांहीं फणाधारी सर्पहि बाहेर निघाले आहेत. त्याच वारुळांत उगवलेल्या दोन वेलींनीं वाढतां वाढतां त्याच्या दोन्ही मांड्यांना विळखे घातले आहेत अन् वर चढून त्याचे दोन्ही भुजदंडहि वेढले आहेत. त्या वेलींच्या पानांच्या शिरा स्पष्ट दिसतात. पुतळ्याच्या खांद्यावर एका वेलीला तुरा आला आहे तोहि मोठा लाडका वाटतो.

गेलीं एक हजार वर्षें हा बाहुबली तिथें आकाशाच्या निळ्या चांदव्याखालीं उभा आहे. मागच्या बाजूनें त्याला कमरेपर्यंत काय तो दगडाचा आधार आहे. त्यावरचा सगळा आकार सुटा अन् निराधार ! अनंत ऋतुचक्रें त्याला तापवून अन् भिजवून गेलीं. वाऱ्यानें मागून पुढून धडका दिल्या. पण अजूनहि तो अविचल आहे, अक्षत आहे ! अजून त्याची ती स्मितरेषा मालवली नाहीं, कीं कुरळ्या केसांची बटहि विस्कटली नाहीं.

त्याच्या डाव्या पायाशीं एक शिलालेख दिसतो—

" श्री चावुण्डरायें करवियलें
गंगराजे सुत्ताले करवियलें "

या शिलालेखाचीं अक्षरें चांगलीं ठसठशीत आहेत. तीं उभट वेलीच्या आकाराचीं आहेत. त्यांतली ' श्री ' तर सुमारें दीड फूट उंचीची भरेल.

हा मराठीचा आद्य शिलालेख कर्नाटकाच्या गाभ्यांत पाहत असतांना मनाला सुखद संवेदना होतात. चामुंडराय हा कदाचित् मराठी माणूस असेल किंवा तो पुतळ्याचा निर्माता महाराष्ट्रीय असेल. दहाव्या शतकांत म्हैसूर प्रदेशांत गंग नांवाच्या राजघराण्याची सत्ता होती. हें घराणें जैन धर्माचें पुरस्कर्तें होतें. चामुंडराय हा त्या राज्याचा प्रधान आणि सेनापति. तोहि जैनच होता. त्याच्या मातेला बाहुबलीच्या दर्शनाची आतुर आकांक्षा होती. ती सफल करण्यासाठीं त्यानें हें महाशिल्प निर्माण केलें. करवित्याचें नांव तिथें शिलालिखित झालें. पण त्या शिल्पाच्या कर्त्याच्या नांवाचें काय ? तें मात्र तिथें कुठेंच दिसत नाहीं अन् त्यामुळें मन चुटपुटतें.

१०व्या शतकाच्या मध्यापासून तों १४वें शतक लागेपर्यंतच्या काल-खंडांत दक्षिणेंत एका नव्या पद्धतीच्या स्थापत्यानें जन्म घेतला. त्यालाच ' होयसळ स्थापत्य ' असें म्हणतात. होयसळ हे द्वारसमुद्रम्चे राजे. आज द्वारसमुद्रम् हें नांव लोपलें असून त्याच्या जागीं हळेबिड आलें आहे. त्या काळांत हळेबिडच्या खालोखाल बेलूरला महत्त्व होतें. बेलूर होयसळांची दुसरी राजधानी होती. हीं दोन्ही स्थळें हासन जिल्ह्यांत असून जवळ जवळ आहेत. बेलूर हें यगची नदीच्या तीरावर वसलें आहे.

होयसळ हे प्रथम चालुक्यांचे मांडलिक. पण त्यांना स्वतंत्र राजे होण्याची महत्त्वाकांक्षा होती. त्या दृष्टीनें ते प्रयत्नशील होते. फक्त कालाची अनुकूलता हवी होती. बाराव्या शतकाच्या प्रारंभीं ती लाभली आणि त्यांनीं एक दिवस चालुक्यांचें जूं झुगारून दिलें. पुढें इ. स. १३१० पर्यंत होयसळांचें राज्य दक्षिणेंतली एक प्रबल सत्ता म्हणून गाजलें. त्यांच्या अमदानींत आणि त्यांच्या प्रेरणेनें दक्षिणेंतल्या कलाकारांनीं बेलूर, हळेबिड, सोमनाथपुरम् इत्यादि ठिकाणीं नव्या धर्तींचीं मंदिरें बांधलीं. ऐहोळ-बदामींतल्या चालुक्य शैलीची परंपरा त्यांनीं स्वीकारली खरी; पण मूर्ती आणि अलंकार-मंडन यांत नवें तंत्र अवलंबून त्यांनीं आपल्या शैलीला चालुक्यशैलीहून भिन्न आणि स्वतंत्र असें स्वरूप दिलें. आपलीं मंदिरें अपूर्व कारागिरीनें नटवायला त्यांना तिथे दगडहि अनुकूल मिळाला. तो होता संगजिऱ्याचा दगड किंवा ' सोप स्टोन.' वाळूच्या दगडापेक्षां किंवा काळ्या कातळापेक्षां तो अधिक संस्कारक्षम होता.

## बेलूर—चेन्न केशव

(होयसळ कलाकारांनीं निर्मिलेलें सर्वांगसुंदर मंदिर म्हणजे बेलूरचें चेन्नकेशवमंदिर होय.) होयसळ राजवंशाच्या संस्थापकाचें नांव बिट्टिदेव किंवा विष्णुवर्धन असें होतें. त्यानें तालकदच्या समरांगणांत चोलांवर विजय मिळवला आणि त्याचें स्मारक म्हणून इ. स. १११७ मध्यें हें मंदिर निर्माण केलें.) दुसरी आख्यायिका सांगतात ती अशी—

विष्णुवर्धन हा प्रथम जैन होता. पुढें रामानुजाचार्य हे त्याच्या आश्रयाला आले आणि त्यांच्या उपदेशानें त्यानें जैनधर्म सोडून वैष्णव धर्म अंगीकारला.

ही घटना त्याच्या जीवनाला वेगळें वळण लावणारी होती. तिच्या स्मरणार्थ म्हणून त्यानें पांच विष्णुमंदिरें बांधलीं. त्यांतलें एक मंदिर हें चेन्नकेशवाचें.

चेन्न-केशव म्हणजे सुंदर-नारायण. त्याला विजय-नारायण असेंहि दुसरें नांव आहे आणि तें विष्णुवर्धनाच्या चोलविजयाशीं निगडित आहे. या मंदिराच्या गर्भगृहांत तीन फूट उंचीच्या पादपीठावर चेन्नकेशव विराजित आहे. पुऱ्या पुरुषभर उंचीची ती रेखीव अन् गोंडस अशी मूर्ति आहे. त्याच्याभोंवतीं प्रभावळ आहे आणि तिच्यांत दशावतार कोरलेले दिसतात. चेन्नकेशवाचें श्रीमुख 'पाहतां लोचन सुखावलें' अशा प्रकारचें मनमोहक आहे. तिथल्या स्निग्ध दीपप्रकाशांत त्याचा तो मनोज्ञ आकृतिबंध निहाळतांना खरोखर दृष्टीची धणी पुरते.

बेलूरचें हें मंदिर गांवालगतच पण गांवाबाहेर आहे. महाद्वारावर विटांचें गोपुर आहे; पण ती नंतर जोडलेली पुरवणी आहे. त्यांतून आंत शिरतांच फरसबंदी विशाल प्रांगण लागतें. तें सर्वत्र स्वच्छ असल्यामुळें तिथें पाय ठेवतांच मनालाहि प्रशस्तपणा येतो. त्याच्या उजव्या कडेला पुष्करिणी अन् डाव्या बाजूला कप्पे चेन्निगरायाचें मंदिर आहे. समोर चेन्न-केशवाच्या मंदिराचें प्रवेशद्वार दिसतें. अनेक लहान मोठ्या मंदिरांना आणि अग्रशाळेला अंतर्भागांत सामावून घेणारा सभोंवतीं एक दगडी तट आहे. मंदिर ठेंगणें तर आहेच अन् शिवाय त्याला कळसच नाहीं; त्यामुळें हंपीहून किंवा मदुरेहून आलेल्या माणसाला सकृद्दर्शनीं चमत्कारिकच वाटतें. बाहेरून प्रदक्षिणा करूं लागल्यावर कळतें, कीं या मंदिराचा सारा घाटच सर्वस्वीं निराळा आहे. मंदिर एका चौथऱ्यावर उभें केलेलें आहे; पण तो चौथरा चौकोनी नाहीं. त्याला कितीतरी कोन आहेत अन् ते आंत बाहेर गेलेले आहेत. तेव्हा आणखी एक गोष्ट कळते, कीं हा नकाशा वेगळा आहे. ही बांधणी तारकाकृति आहे. मंदिराची उंची आहे १७८ फूट अन् रुंदी आहे १५६ फूट. म्हणजे उंची-रुंदींत फक्त २२ फुटांचें अंतर. मुख्य प्रवेशद्वार पूर्वेला आहे. शिवाय त्याला दक्षिणोत्तर अशीं आणखी दोन पक्षद्वारें आहेत. प्रत्येक द्वारावर कोरीव काम नुसतें भरून ओसंडत आहे. एकेका द्वारावर तास तास घालवूनहि त्यांतले बारकावे पाहून संपणार नाहींत.

पूर्वद्वारांतून आंत शिरतांना एक दिव्य दांपत्य प्रेक्षकाला हटकतें. त्या रति-मदनाच्या युग्माला डावलून कोण पुढें जाईल ! स्वतःवर अरसिकपणाचा शिक्का बसावा असें कोणाला वाटेल ! मदन ओळखण्याची खूण म्हणजे त्याच्या हातांतलें उसाचें दांडकें. तेंहि वरच्या वाडासहित. तेंच त्याचें धनुष्य. मदन ओळखला, कीं रतीची ओळख पटायला काय उशीर ! त्याच्या शेजारीं किंचित् लाजऱ्या मुद्रेंत दुसरी कोण असणार ! अप्रतिम कलाकृति आहे ती.

तिच्या वरच्या अंगाला आहे हिरण्यकशिपूच्या उदराचें विदारण करणारा नरसिंह. उजव्या बाजूच्या भिंतीवर विष्णुवर्धनराजाचा दरबार लागला आहे. त्यांत माणसांची खेचाखेच आहे. राजा अन् राजपुत्र शेजारीं बसलेले. त्यांच्या डाव्या हाताला पट्टराणीचें आसन. उजव्या हाताला राजपुरोहित बसला आहे अन् त्याचें भाषण राणी कान देऊन ऐकत आहे. पुढें अनेक लोक हातीं नजराणे घेऊन उभे आहेत.

पूर्वद्वाराच्या उजव्या अंगाला टेकून असेंच आणखी एक शिल्प उभें आहे. त्यांत एका चवताळलेल्या सिंहाशीं हातांतल्या दंड्यानें लढणारा एक श्रेष्ठ धारिष्टाचा पुरुष दिसतो. त्या सिंहाचें मुख कीर्तिमुखासारखें असून त्याच्या पाठीवर चक्र आहे. या शिल्पाविषयीं दंतकथा सांगतात ती अशी—

एक जैन आचार्य आपल्या शिष्यगणांसमवेत वनांतून चालला असतां अचानक एक सिंह त्यांच्यावर चालून आला. जिवातर बेततांच सगळे शिष्य इतस्ततः पळाले. पण सळ नांवाचा एक शिष्य होता तो मात्र आपल्या गुरूला पाठीशीं घालून सिंहापुढें उभा ठाकला. आचार्यानें आपला दंड त्याच्या हातीं देऊन म्हटलें. 'होय सळ !' हे सळा, (सिंहाला) ठार कर. त्याप्रमाणेंच झालें. सळाच्या हातून सिंह गतप्राण झाला. मग सगळे पांगलेले शिष्य गुरूभोंवतीं जमले. गुरु त्यांना म्हणाला, 'सिंहाचं हनन करणारा हा सळ यापुढें तुमचा राजा.' या सळानेंच पुढें होयसळ राजवंशाची स्थापना केली आणि सिंहाशीं झुंजणारा वीरपुरुष हें आपलें राजप्रतीक ठरवलें. होयसळांच्या सगळीकडच्या शिल्पांत या प्रतीकाचा आढळ होतो.

पण वरील दंतकथा ही त्या शिल्पाचा अर्थ सांगण्यासाठीं मागाहून रचली गेली असावी असें दिसतें. कारण अशाच प्रकारचें एक मूर्तिशिल्प खजुराहोला

देखील आहे. त्याचा घाटहि हाच आहे. तिथें सिंहाच्या जागीं शार्दूल आहे. मात्र त्या शार्दूलाच्या पाठीवर चक्र नाहीं. होयसळ शिल्पांत तें अधिक आलें आहे. सिंह हें राजसत्तेचें प्रतीक म्हणून पुराणकाळापासून सुविख्यात आहे. सिंहासनाची कल्पना त्यांतूनच उगम पावली आहे. चक्र हें धर्माचें प्रतीक आहे. होयसळांचें राज्य हें पुरुषसिंहांचें आहे अन् तें धर्माधिष्ठित आहे, हा आशय त्या प्रतीकांतून सूचित होतो, अशी माझी धारणा आहे.

याच प्रतीकावरून आणखी कांहीं धागे दोरे लागतात. खजुराहोच्या शिल्पकारांचा आणि होयसळ शिल्पकारांचा बराच परिचय असावा असें वाटतें. खजुराहोचें शिल्प होयसळांच्या आधीचें आहे. इथल्या शिल्पकारांना प्रेरणा देणारा त्या परंपरेंतला कोणीतरी गुरु असावा. कारण मंदिर-शिल्पांत मूर्तींची कोंदाकोंदी ही गोष्ट दोन्ही ठिकाणीं सारखीच आहे. बदल कशांत असेल तर तो मूर्तींच्या घाटांत, मंडनांत अन् परिवेषांत. आणखी एक महत्त्वाचें साम्य म्हणजे संभोगचित्रांचें. बेलूरलाहि खजुराहो पद्धतीचीं तसलीं चित्रें आंग चोरून का होईना; पण अधून मधून आहेत. खजुराहोला जितक्या उंचीवर तीं खोदलेलीं आहेत, तितकीच उंची इथेंहि घेतलेली आहे. खजुराहोचा शृंगार हा युग्मशृंगार नसून समुदायशृंगार आहे. तीच अन् तशीच नक्कल इथेंहि झालेली आहे.

आतां या महाद्वारावरच न रेंगाळतां मंदिरांत प्रवेश करावा हें बरें. आंत गेल्यावर कळतें, कीं हें मंदिर तीन विभागांत आकारलें आहे. एक गर्भगृह, दुसरा शुकनासी म्हणजे अंतराळ आणि तिसरा नवरंग म्हणजे सभामंडप. नवरंगांतच कांसवाच्या सपाट पाठीसारखी रंगशिळा आहे. वैष्णवमंदिरांत ती बहुधा असतेच. पंढरपुरांतहि ती आहे. ‘ विठोबाला भेटावें। रंगशिळेवरि नाचावें ’ असा तिथला दंडक आहे.

इथला नवरंग हा अनेक खांबांवर उभा आहे. त्यांतले मधले चार खांब वगळल्यास बाकीचे सगळे अलंकृत आहेत. त्यांवरची कारागिरी अतीव गुंतागुंतीची आहे. होयसळशिल्पाचे ते जणूं विजयस्तंभ आहेत. नवरंगांत सर्वत्र अंधाराचें साम्राज्य असतें. पण जिज्ञासु प्रेक्षकांसाठीं तिथें देवस्थानानें विजेच्या बत्तीची सोय केलेली आहे. सव्वा रुपया दिला, कीं मोठा थोरला

विद्युद्दीप रंगशिळेवर येऊन बसतो अन् प्रेक्षकाला हवा त्याप्रमाणें त्याचा प्रकाशझोत खालीं, वर, उभा, तिरपा सर्वत्र फिरूं लागतो. त्या प्रखर प्रकाशांत तें सारें कलावैभव झळाळून उठतें. (त्यांतहि दोन स्तंभांकडे विशेष ध्यान द्यायचें असतें. एक नरसिंहस्तंभ अन् दुसरा मोहिनीस्तंभ. पहिल्या स्तंभावर उभ्या आडव्या ओळींनीं कोनाडेवजा अनेक घुमट्या आहेत. प्रत्येक घुमटींत छोटीशी एक देवमूर्ति असते. छोट्या मूर्तींचे छोटेच अवयव, पण ते कुसरीनें कोरलेले असतात. त्या त्या अवयवांवर तितकेच नाजूक अलंकारहि असतात. त्या बरोबरच मुख्य मूर्तींच्या आगेमागें कांहीं परिवारदेवता असतात आणि त्यांवरहि कलाकारांचा हात तपशीलवार फिरलेला दिसतो. हें सगळें एका टीचभर जागेंत सुव्यक्त कोरायला कलाकाराचा हात किती नाजुक अन्, किती स्वाधीन हवा, त्याची कल्पना येते. हा स्तंभ असा नखशिखान्त कोरून काढतांना त्या शिल्पकाराला एकाग्रता, चातुर्य अन् कौशल्य हीं सारीं पणाला लावावीं लागलीं आहेत.

या नरसिंहस्तंभावर देव-देवतांचें असें दिव्य साम्राज्य उभें करतांना त्या कलाकारानें एका ठिकाणीं थोडी जागा मोकळी सोडली आहे. 'ज्या कलावंताची हिंमत असेल, त्यानें छन्नी घेऊन पुढें यावें अन् माझ्याप्रमाणें ही कोरी जागा भरून काढावी,' असें जणूं त्याचें पुढील कलाकारांना आव्हान आहे. आणि आश्चर्याची गोष्ट ही, कीं अद्यापि तें आव्हान अस्वीकृतच राहिलें आहे.

मोहिनीस्तंभावरच्या मोहिनीचे दैत्यांना सुरा अन् देवांना सुधा वांटणारे ते हात आता गळून पडले आहेत. पण ती उभी शेलाटी मूर्ति अजून शाबूत आहे. तिचा किरीटहि तिच्या उंचीला शोभेसा आहे. समग्र मूर्ति सांवळी सगुण आहे. या सर्व खांबांना साजेसेंच नवरंगाचें छतहि आहे. हें छत किंवा झांकण अष्टकोनी असून त्यावर घुमट आहे. घुमटाचा व्यास दहा फूट अन् खोली सहा फूट आहे. याच छतांतून एक मोठी कमलकलिका अधोमुख खालीं उतरत असून ब्रह्मा-विष्णु-महेश तिला आधार देत आहेत. विचार करावा तसतसे या दृश्यांतून अनेक अर्थ उमटूं लागतात. आपल्या संस्कृतींत कमलकलिकेभोवतीं तात्त्विक विचारांचें वलय मोठेंच आहे.

आंत सगळें पाहून झाल्यावर बाहेरून एकदा मंदिर-प्रदक्षिणा करावी. बाह्य अंगानें मंदिराच्या भिंतीवर तळाशीं गजपट्टी दिसते. या पट्टींत शृंगारलेल्या पुष्ट गजराजांचा जणूं छबिना निघाला आहे. सगळे हत्ती एकामागून एक जात असले, तरी ते सुधे जात नाहींत. कोणी आपली गर्दन वांकवतो, कोणी पुढच्याच्या पाठीवर चढायचा पवित्रा दाखवतो, कोणी आपला शुंडादंड पुढच्याची सोंड आपल्याकडे खेंचतो, कोणी दुसऱ्याची शेपटीच सोंडेंत पकडतो, कोणी सैल अंगानें चालतो, तर कोणी त्याचा संकोच करतो. अशा त्यांच्या अनेक लीला शिल्पकारानें त्या पट्टींत दाखवल्या आहेत. त्यावरून वाटतें, कीं हा कलाकार हत्तींच्या कळपांतच कांहीं काल राहिला असावा. हत्तींच्या शरीरशास्त्राचें त्याचें ज्ञान तर परिपूर्ण आहेच; शिवाय भावज्ञानहि उत्तम आहे.

गजपट्टीनंतर वरची पट्टी कीर्तिमुख सिंहांची. मग वेलपत्ती, मग कांहींतरी चक्रसदृश वस्तू, त्यावर उभ्या उंच मूर्ती, त्यावर सांग, सपरिवार खोदलेल्या पौराणिक आख्यानांच्या आडव्या चौकटी, असा हा सगळा बाह्य भाग भरून राहिलेला आहे. इथें रिता ठाव नाहीं. आणि याच सगळ्या चित्रसंभारांत मधें मधें ठळकपणें दिसून प्रेक्षकांचें चित्त खेंचून घेणाऱ्या त्या मदनिका म्हणजे शृंगारमंजिऱ्या. त्या आठच असत्या, तर त्यांना अष्टनायिका म्हटलें असतें. पण त्या आंत बाहेर मिळून सुमारें चाळीस आहेत; आदर्श नारीसौंदर्याचे ते चाळीस अमृतकलश आहेत. कलाकारानें जणूं त्यांत आपला जीवभावच ओतला आहे. त्यांच्या प्रत्येक अवयवाशीं जणूं तो तदाकार झाला आहे. आकृतीचें सौंदर्य, कलेचा नाजुकपणा, कामांतली सफाई, इत्यादि बाबतींत त्यांना कुठें तोड नाहीं. विश्वांतलें सौंदर्य ‘ तिलं तिलं समानीय ’ विधात्यानें तिलोत्तमेला घडवलें; पण इथें या कलाकारानें पाषाणावरच सौंदर्याचा मोहिनीमंत्र टाकला आहे.

या समोरच्याच मदनिकेचें प्रथम दर्शन घ्या. बेलूरच्या शिल्पांतली ही अग्रगण्य प्रतिमा. ही एक नृत्यांगना आहे, हें तिच्या उभें राहण्याच्या ढबीवरूनच तुम्हांला कळेल. ती उभ्या उभ्या तीन ठिकाणीं वांकली आहे. यालाच मूर्तिकलेंत ‘ त्रिभंग ’ म्हणतात. तिला आतां नृत्यासाठीं देवापुढें

अनुक्रमांक 39786 ... दि: ...
क्रमांक 288 ... नों: दि: 23.12...



उभें राहायचें आहे. तिनें आपलं सगळें प्रसाधन नुकतेंच पुरें केलें आहे. ती आरसा हातांत घेऊन आपल्या सौंदर्याच्या कळा त्यांत निहाळीत आहे. स्वत:च्याच रूपदर्शनांत तिची भावसमाधि लागली आहे. आपण सौंदर्यसम्राज्ञी आहों, ही जाणीव जणूं तिच्या प्रत्येक अवयवांतून प्रकट होत आहे. तिच्या तनुलतेवर वस्त्रें अगदीं अल्प आहेत. त्यामुळें खरें म्हणजे ती अनावृता दिसायची. पण वस्त्रांचें 'न्यून' तिनें नवरत्नांच्या अलंकारांनीं 'पुरतें' केलें आहे. रुंद कपाळ, सरळ नासिका, बिंबफलांचे ओठ, बदामी डोळे, भुवयांच्या धनुकल्या, लांब केंसांचा भरघोस अंबाडा, सिंहकटी अन् घन, उन्नत उरोज, हीं सांकेतिक सौंदर्याचीं सारीं सुलक्षणें तिच्या ठिकाणीं ठसठशीत आहेत अन् तरीहि ती सांकेतिकतेच्या वर आहे. हिला दर्पणहस्ता मदनिका असें म्हणतात.



दर्पणहस्ता मदनिका

पुढें येऊन आतां या दुसरीकडे जरा ध्यान द्या. उजवा पाय सरळ अन् डावा जरा गुडघ्यांत दुमडून ती उभी आहे. पुष्ट जघनांच्या जोरावर तिनें आपला उन्नत उरोभाग पुढें झुकवला आहे. तिच्या डाव्या तळहातावर आहे पिंजऱ्यांतला राघू. ती त्याला बोलायला शिकवीत आहे. पण हें शिकवणें म्हणजे 'विठू विठू ऽऽ' या जातीचें नसावें असें तिच्या फुरंगटलेल्या मुद्रेवरून दिसतें. तिचा प्रियकर काल संध्याकाळीं कुठें पसार झाला, तो रात्रीं परत आलाच नसावा. रात्रीं 'निंदिया बैरन भई' असें तिला झालें असावें. सकाळीं तो परत येईल,

निश्चित येईल. मग त्याला काय अधिक्षेप न करतां घरांत घ्यायचा आहे ! मुळींच नाहीं. पण तो अधिक्षेप ती स्वतः करणार नसून राघूच्या मुखानें तो वदवणार असें दिसतें. ' अरे शठा, काल रात्रीं तूं माझ्या घरीं अमावास्या करून कुठल्या सटवीच्या घरीं पूर्णिमेचं चांदणं फुलवायला गेला होतास ! '

आतां ही तिसरी. हिचा कावा कांहीं वेगळाच आहे. तिचा प्रियकर आतां घरीं यायचा आहे. तो येतांच तिला वसंतपंचमी साजरी करायची आहे. तिनें उजव्या हाताच्या पांची बोटांत त्रयोदशगुणी तांबूल धरला आहे. डाव्या हातीं आहे रंगाची पिचकारी. प्रियकर येतो अन् त्याच्या मुखीं विडा रंगतो न रंगतो तोंच अचानक त्याच्यावर पिचकारी रोखली जाणार आहे. तो नख-शिखान्त केशरी रंगानें रंगणार आहे, निथळणार आहे. पण तेवढ्या एकाच पिचकारीवर त्याला कोण सोडणार ! दुसरी भरून देण्यासाठीं तिनें आपला एक चाकर जवळच सज्ज ठेवला आहे. आतां 'ना मारो पिचकारी' ही ठुमरी आळवण्याची पाळी त्याच्यावर. अशी आहे ही धृष्ट, प्रगल्भ अन् आक्रमक मदनिका ! प्रेक्षकांना सांगितलें पाहिजे, कीं या दांडगीपासून चार हात दूर !

पुढे त्या चौथीकडे चला. पाळलेल्या माकडाच्या चावटपणामुळें तिच्यावर एक नाजुक आपत्ति येऊं पाहत आहे. ती नेसून, शृंगारून बाहेर येते, तर हळूच कुठून तरी तें माकड येतें अन् पायाजवळ बिलगून तिच्या साडीचा कांठच ओढूं लागतें. हो, बरें तर बरें ! वस्त्रग्रंथि फस्‌दिशीं सुटली म्हणजे ! ती लज्जावती बावरते अन् क्षणांत आपल्या मांड्यांना तिढा घालते. आतां ती निर्धास्त झाली आहे. आतां जवळच्या वेलीची एक फांदी मोडून ती त्या माकडाच्या पाठींत सप्‌दिशीं हाणणार आहे. माकडचेष्टेला तरी कांहीं सुमार पाहिजे कीं नको !

या अशा आंतल्या अन् बाहेरच्या सगळ्या मदनिका कोणत्या ना कोणत्या तरी उद्योगांत गुंतलेल्या आहेत. या त्यांच्या विविध लीलांमुळें त्या प्रत्येक मदनिकेला वेगळें रूप, वेगळें जीवन आणि वेगळें भावसौंदर्य प्राप्त झालें आहे. कोणी आकर्ण धनुष्य ओढून भिल्लिणीप्रमाणें सावजावर शरसंधान करते. कोणी ' ताथै तत्थै ' नाचते. कोणी दोन्ही भुजा उंच उभारून डमरु वाजवते, तर कोणी बासरींत हळुवार फुंक भरते. होयसळ शिल्पकारांना ग्रीक शिल्प-

कारांप्रमाणेंच नारीसृष्टि घडवतांना अपार उत्साह येत असावा, असें दिसतें. सौंदर्य हें दिव्य असतें अन् म्हणूनच दर्शनीयहि असतें, अशी त्यांची भावना होती. त्यांनीं हें दिव्य सौंदर्य आकाराला आणतांना त्यांत पार्थिवतेचा अंश मिसळूं दिला नाहीं, हें त्यांचें वैशिष्ट्य !

कोणत्याहि कलाकाराला आजवर नग्नतेचा कधींच बाऊ वाटला नाही. त्यानें अत्यंत निर्विकार मनानें अनेक अनावृत सौंदर्यें जगभर निर्माण करून ठेवलीं आहेत. बेलूरची एक मदनिकाहि त्या जातीची आहे. पण इथें त्यानें तिच्या वस्त्रहरणाला एक अपरिहार्य निमित्त शोधून काढलें आहे. त्या मूर्तीच्या डाव्या पायाजवळ जरा खालीं पहा. तिथें एक आंकडेबाज विंचू किंचित् गळाठून बसला आहे. झाली काय गोष्ट ! त्या प्रमदेनें आपलें काजळ-कुंकूं पुरें केलें. शिणगारहि चढवला. आता फक्त उरलें तें वस्त्रांतर. तिनें जुनें वस्त्र टाकून नवी घडी उचलली. आता सर्वदिशीं त्या वस्त्राचा पदर उलगडून ती आपली कोवळी काया वेढणार, तोंच त्या वस्त्राच्या घडींतून हा विंचू खालीं टपकला. अशा अवस्थेंत त्या वृश्चिकदर्शनानें अंतरीं धसका बसून तिला जर वस्त्राची शुद्ध उरली नाही, तर तुम्ही तिला कोणत्या तोंडानें दोष देणार !

बेलूरच्या या अशा अगणित शिल्पकृती ! शहाण्या माणसानें त्यांच्या समग्र वर्णनाचा घाट घालूं नये, हेंच बरें ! म्हणून मीहि उरलें सुरलें प्रेक्षकांच्या रसिकतेवर अन् सवडीवर टाकून हळेबिडचा रस्ता धरतो.

## हळेबिड–द्वारसमुद्रम्

बेलूरपासून ११ मैलांवर हळेबिड वसलें आहे. ही इतिहासकाळांत गाजलेली द्वारसमुद्रम् राजधानी. इथलें मंदिर हें सगळीकडच्या मंदिरांत मोठें आहे. बेलूरप्रमाणेंच याहि मंदिराला संपूर्ण दगडी चौथरा आहे. मंदिराची बांधणीहि तशीच म्हणजे तारकाकृति. एकाच मंदिरांत दोन गर्भगृहें हें याचें दुसरें वैशिष्ट्य. याचा अर्थ हें जुळें देऊळ आहे. एका गाभाऱ्यांत होयसळेश्वर तर दुसऱ्या गाभाऱ्यांत शांतलेश्वर विराजमान आहे. दोन्ही शिवलिंगेंच आहेत.

दोन देवांचे दोन नवरंग अन् त्यांना जोडणारा एक मध्यमार्ग आहे. मंदिराला पूर्वेस दोन आणि दक्षिणोत्तर एकेक अशीं चार प्रवेशद्वारें आहेत.


या मंदिरांतले घटकाभर थांबून निरखून पहावे ते द्वारपाल. ते नखशिखान्त अलंकृत आहेत. एवढेंच नव्हे; तर विविध प्रकारचे अलंकार त्यांच्या देहावर मावत नाहींत. नवरत्नांच्या हाराची जाळी नेसून आणि मस्तकीं उभट किरीट धारण करून ते द्वाररक्षणासाठीं खडे आहेत. तो किरीटहि सुटा नसून कमानदार आहे. त्या कमानीचीं दोन्ही टोकें त्यांच्या कर्णकुंडलांना भेटलीं आहेत. हें सगळें कोरीव काम बारीक बारीक अन् नाजूक आहे. ते चतुर्भुज असून त्यांच्या भालप्रदेशीं तिसरा नेत्र आहे. त्यांवरून ते शिवगणांपैकीं वाटतात. द्वारपालाच्या अलंकारमंडनावरून त्या भवनपतीच्या वैभवाची कल्पना करायची तर तो शंभर कुबेरांचा धनी असावा. पण इथें तर आहे 'कौपीनवान् शंभु!' असे द्वारपाल तुम्हांला दुनियेंत भेटणार नाहींत.



द्वारपाल—हळेबिड

कारागिरीची उरली सुरली भूक होयसळ कलाकारांनीं इथें भागवून घेतली आहे. सौंदर्य, कल्पना अन् कला यांचा इथें परमोत्कर्ष झाला आहे. त्या सर्वांचें वर्णन शब्दशक्तीच्या पलिकडचें आहे. इथें वाचेला नकळत 'मौन्य'

पडतें. मंदिराच्या उत्तरद्वारापासून बाहेरच्या भिंतीवर चित्रकारीला प्रारंभ होतो. एका वीतभर पट्टींत देखाव्यामागून देखावे मांडले जातात. प्रारंभीं भैरवगण आणि पिशाचगायक दिसतात. त्या पुढे येतो समुद्रमंथनाचा देखावा. त्यापुढें गायकं-नर्तकांचा ताफा. नंतर भेटतो देवगुरु शुक्राचार्य. तो कदंबवृक्षा-तळीं मद्यपात्राला सन्मुख होऊन बसला आहे. त्यापुढें उमा-महेश्वर अन् त्यांचा परिवार. ईशान्येच्या अंगानें कृष्णचरित्र खोदलेलें आहे. दक्षिण अंगाला महाभारतकथा चित्रित झाली आहे. पश्चिमेला प्रल्हादाची कथा आकारली आहे. तिथून पुढें रामायणांतले प्रसंग. एकाच पट्टींतलीं हीं सारीं चित्रें. तीं इतक्या दाटीवाटीनें उभीं आहेत, कीं चित्रांतल्या त्या व्यक्तींनीं जणूं एकमेकांना कोपरांनीं ढोसून स्वतःला जागा मिळवून घेतली आहे. हें सारें मूर्तिवैभव पाहत जातां जातां पाय वळतात अन् डोळे थकतात. हळूहळू मनहि बधिर होतें. असा थकवा आला, कीं श्री. विंदा करंदीकरांच्या शब्दांत म्हणावेंसें वाटतें, ' माझ्या मना बन दगड ! '



होयसळेश्वर मंदिर

याच होयसळेश्वर मंदिराच्या दक्षिणेस दोन फर्लांगावर तीन जैन बस्त्या आहेत. होयसळराजे जैनधर्मी असतांना त्यांनींच त्या बांधल्या आहेत. त्यांतल्या पार्श्वनाथाच्या बस्तीचें वैशिष्ट्य तिच्या स्तंभांत आहे. हे स्तंभ गोलाकार आणि अतीव तुळतुळीत आहेत. ते समोर उभे राहणाऱ्या प्रेक्षकाचे

लख्ख आरसे बनतात. एखाद्या प्रसाधनशील ललनेनें एवढ्या भ्रमंतींत आपली केशरचना कितीशी विस्कटली आहे अन् कुंकू-पावडरीची अवस्था ठीक आहे कीं नाही, तें या खांबांत पाहून घ्यावें. बस्तीच्या गर्भगृहांत पार्श्व-नाथाची मूर्ति आहे तिची उंची चौदा फूट भरते. मधली बस्ती आदि-नाथाची अन् शेवटची शांतिनाथाची आहे.

होयसळशिल्पाचें हें समग्र दर्शन अत्यंत समृद्ध आहे. त्या मूर्ती, ते आकृतिबंध, ती अलंकारयोजना, ती गुंतागुंतीची अन् स्थूलांत सूक्ष्म अशी खुदाई, एक हजार वर्षे लोटलीं तरी ज्यांचा गुळगुळीत घोटीवपणा अणु-मात्रहि कमी होऊं नये, असे स्तंभ निर्माण करण्याची किमया, हें सारें सारें अद्भुत आहे. हीं मंदिरें एकदा स्मरणांत कोरलीं गेलीं, कीं तिथून हालत नाहीत. एकाच कर्नाटकांतले हे भिन्न भिन्न कलासंप्रदाय पाहिल्यावर साहजिकच मन उद्गारतें. ' धन्य कर्नाटक ! '

## म्हैसूर-बेंगळूर

कर्नाटकाच्या आजच्या प्रदेशराज्याला म्हैसूर राज्य म्हणतात. मात्र त्याची राजधानी मांडली आहे ती बेंगळूर शहरांत. म्हणजे नांव एकाचें अन् गांव दुसऱ्याचें असाच तो प्रकार म्हटला पाहिजे. म्हैसूर हें फार पुरातन शहर आहे. अशोकाच्या शिलालेखांत त्याचा उल्लेख आढळतो. महाभारतांत ' माहिष्मती ' नांवाच्या एका शहराचा नामनिर्देश झाला आहे, तें शहर म्हणजे म्हैसूरच होय असाहि कांहीं विद्वानांचा तर्क आहे. म्हणजे या शहराला ऐतिहासिकताच नव्हे; तर पौराणिकताहि आहे.


म्हैसूर हा जोड शब्द आहे. म्हैस+ऊर=म्हैसूर असा त्याचा विग्रह होतो. म्हैस म्हणजे महिष आणि ऊर म्हणजे गांव, किंवा पर्यायानें देश. ११ व्या १२ व्या शतकांत याला ' महिषनाडु ' म्हणजे महिष देश असेंच म्हणत. महिष शब्दाचा वाच्यार्थ रेडा असा होतो; पण तेवढ्याच संकुचित अर्थानें तो शब्द घ्यायचा नाहीं, महिष म्हणजे महिषपालक जन असा त्याचा थोडा व्यापक अर्थ घेतला पाहिजे. श्री. शं. बा. जोशी यांनीं त्याचें जें स्पष्टीकरण दिलें आहे, त्याचा सारांश असा—

कोण्या तरी प्राचीन काळीं इथें महिष नांवाचे जन राहात होते. या प्रदेशावर त्यांचेंच स्वामित्व होतें. यादव जसे गोपालक, तसेच हे महिषपालक होते. म्हैसूरचे आजचे राजे आपला संबंध यदुवंशाशीं जोडतात आणि स्वतःला यदुकुलोत्पन्न समजतात. या गोपालक यादवांचें आणि महिषजनांचें आपसांत वैर निर्माण झालें. भूमि हें त्या वैराचें कारण. यादवांना त्या-प्रदेशांत आपली वसाहत मांडायची होती आणि महिषजनांना हे आगंतुक लोक तिथें नको होते. त्यांतूनच या दोन जमातींत युद्धाची ठिणगी पडली. या युद्धांत जगदंबेच्या कृपेनें गोपालक जनांचा विजय आणि महिषजनांचा संहार झाला. त्यामुळेंच महिषजनांची संहारकर्ती जगदंबा 'महिषासुरमर्दिनी' या नांवानें प्रसिद्ध झाली. विजेत्या यादवांची तीच पुढें कुलस्वामिनी बनली. म्हैसूरचा नवरात्रोत्सव म्हणजे या महिषासुरमर्दिनीचाच उत्सव होय. या उत्सवाची परंपरा त्या काळापासून आजतागायत अव्याहत चालू आहे. म्हैसूरचे राजे हा उत्सव भव्य-भास्वर अशा स्वरूपांत आजहि साजरा करतात.

म्हैसूरला लागूनच एक टेकडी आहे, तिचें नांव चामुंडी टेकडी. तिच्या माथ्यावर चामुंडीचें भव्य गोपुरयुक्त मंदिर आहे. चामुंडी हें महिषासुरमर्दिनीचेंच दुसरें नांव होय. म्हैसूरच्या राजघराण्याचें हें देवस्थान आहे. या टेकडीवर बसगाड्या थेट देवळाच्या आवारापर्यंत जातात. वर जायचा रस्ता रुंद आहे, नितळ आहे, तसाच वळणा-वांकणांनीं शोभायमानहि आहे. टेकडीवर दाट नसली तरी तुरळक झाडीं आहे आणि त्यामुळें तिच्या सौंदर्यावर हिरवा साज चढला आहे. देवळाच्या अलीकडे थोड्या अंतरावर महिषासुराचा पुतळा उभा केलेला आहे. त्याच्या त्या भव्य, उग्र अन् शस्त्रसज्ज आकारावरून त्याचा वध करणाऱ्या महिषासुरमर्दिनीचें सामर्थ्य केवढें अचाट असेल, त्याची कल्पना येते.

तो जगप्रसिद्ध नंदी याच टेकडीवर जरा आड बाजूच्या पालथणाला आहे. त्याचें दर्शन घ्यायचें, तर वाहन सोडून पायउतार व्हावें लागतें. या नंदीला मंदिर नाहीं. गोठणीला गाईबैल बसावे, तसा तो एका झाडाखालच्या चौथऱ्यावर विश्रब्धपणें बसला आहे. त्याला चरण्याची भूक नाहीं अन्

त्यामुळेंच उठण्याचीहि घाई नाहीं. एका अखंड शिळेंत तो घडवलेला आहे. त्याचें वर्णन करायचें, तर 'अतिप्रचंड' एवढे दोनच शब्द पुरेसे आहेत. त्याचा डौल प्रेक्षणीय असून तिथला पुजारी त्याच्या मुसंडीवर आडवें 'शैव' गंध लावतो, त्यामुळें तर तो एखाद्या जपीतपी ऋषीसारखा वाटतो. तो केवळ नंदी नसून 'नंदीश्वर' आहे, हें त्याला एक प्रदक्षिणा केल्यावर आपोआप पटतें.



नंदी—चामुंडी टेकडी

इतिहास काळांत म्हैसूरवर अनेक राजघराणीं सत्ता गाजवून गेलीं. चौदाव्या शतकांत हा प्रदेश विजयनगरच्या साम्राज्यांत अंतर्भूत झाला आणि त्याच शतकाच्या अखेरीस सांप्रतचें वडैयार राजघराणें म्हैसूरच्या राजगादीवर बसलें. प्रारंभीं म्हैसूर प्रदेशाची राजधानी श्रीरंगपट्टण येथें होती. हें ठिकाण म्हैसूरपासून ९ मैलांवर आहे. टिपू सुलतानाच्या मृत्यूनंतर (इ. स. १७९९) आजच्याच राजघराण्यानें तिथून आपली राजधानी हालवून ती म्हैसूर येथें आणली.

म्हैसूरला जाणारा प्रवासी बहुधा श्रीरंगपट्टणाला पाय लावल्यावांचून परत फिरत नाहीं. आजमितीस श्रीरंगपट्टणाला राजकीय महत्त्व उरलें नसलें, तरी त्याचें ऐतिहासिक महत्त्व कोणींच हिरावून घेऊं शकत नाहीं. टिपूचा तो 'दर्या दौलत' राजमहाल आजहि यात्रिकांना आकृष्ट करतो. त्याच्या भोंवतीं प्रशस्त आवार असून त्यांत अनेक प्रकारचीं झाडेंपेडें हिरवीगार पालवी लेऊन उभीं आहेत. महालाची पायरी चढतांच समोरची भिंत आपादमस्तक तैलचित्रांनीं भरलेली दिसते. हीं चित्रें दीडशें पावसाळे उलटून गेले तरी अजून ताजींतवानीं दिसतात. त्यांच्या साऱ्या रंगरेखा अजून उठावदार आहेत. अशी ही चित्रकारी एकाच भिंतीवर नव्हे; तर चौफेर सगळीकडे

आहे. बाह्य भागांत आहे, तशी अंतर्भागांतहि आहे. चित्रांतले पुष्कळसे देखावे कुरुक्षेत्रावरच्याप्रमाणें संकुल युद्धाचे आहेत. त्यांत टिपूच्या सैन्याशीं कुठें मराठ्यांचें सेनादळ भिडलें आहे, तर कुठें इंग्रजांच्या पलटणी त्याच्यावर चाल करून आल्या आहेत.

टिपू हा केवढा आत्मपूजक होता, तेंहि त्या चित्रकारीवरून कळून येतें. त्या चित्रसंभारांत जिथें तिथें त्यानें स्वतःचें अस्तित्व आणि महत्त्व प्रस्थापित करायला लावलें आहे. कुठें तो हुक्क्याची नळी तोंडाला लावून 'ऐष' करतांना दिसतो. कुठें तो विलासांत दंग असलेला आढळतो. कुठें तो नमाज पढतो. कुठें प्रजाजनांचे मुजरे स्वीकारतो. कुठें देणग्या देतो. कुठें मंत्रिजनांशीं खलबतें करतो. तर कुठें युद्धाच्या मोहिमेवर जायला निघतो. असा सगळीकडे तो आणि तोच प्रमुखत्वानें वावरतो. 'बीच में मेरा चाँदभाई' म्हणतात तें अशाच प्रकाराला.

श्रीरंगपट्टणाला धार्मिक महत्त्व आहे, तें कावेरीचें सान्निध्य आणि श्रीरंगाचें मंदिर यांच्यामुळें कावेरीनें आपल्या पात्राच्या दोन शाखा करून या क्षेत्राला जणूं दोन भुजांची कव घातली आहे. इथें तिच्या पात्रावर घाटहि बांधलेला आहे. तिथें स्नान करावें आणि शुचिर्भूत होऊन श्रीरंगाच्या दर्शनाला जावें. श्रीरंग इथें शेषशयनावर योगनिद्रा घेत पहुडला आहे. त्या मूर्तीची लांबी पांच हात सहज भरेल. श्रीरंगपट्टणांत ऐतिहासिक भग्नावशेष बरेच आहेत. श्रीरंगाच्या मंदिरांत होयसळ राजांचे शिलालेखहि दिसतात.

म्हैसूर शहर ऐसपैस हातपाय पसरून मांडलें आहे. जगमोहन, ललितामहाल, इत्यादि राजप्रासादांनीं त्याच्या प्रशस्तपणाला वैभवशालित्व लाभलें आहे. कांहीं मोठमोठ्या चौकांत मध्यभागीं निर्माण केलेल्या मेघडंबरींत म्हैसूरच्या माजी महाराजांचे पुतळे उभारलेले आहेत, त्यामुळें तर त्या शहराच्या सौंदर्याला आगळा रुबाब प्राप्त झाला आहे. म्हैसूर म्हणजे उद्याननगरीच म्हटली पाहिजे. ठायीं ठायीं लहानमोठीं हिरवीं उद्यानें काळजीपूर्वक जोपासलीं गेलीं आहेत. यात्रिकाच्या दृष्टीला तीं किती सुखावह वाटतात,

तें सांगून पुरवणार नाहीं. गुलमोहर हा त्या शहराचा लाडका वृक्ष. तो सगळीकडे दिसतो. शहरांत तसाच शहराबाहेर जाणाऱ्या रस्त्यांवरहि. वैशाख ज्येष्ठांत तो सर्वांगीं फुलला, कीं जिकडे तिकडे प्रेमाचाच रंग. फांदींफांदीला लाल फुलें अन् खालीं जमिनीवरहि त्यांचाच सडा. शहरांत पाण्याचें सुभिक्ष आहे, त्यामुळेंच शहराची स्वच्छताहि चांगली राहते.

म्हैसूरच्या आसपासचीं वनें चंदनाचीं आहेत. तिथला मलयानिल चंदनाच्याच सुगंधांत न्हाऊन संचाराला निघतो. इथें चंदनाचा एक सरकारी कारखाना आहे. तिथें चंदनी तेल तयार करतात. प्रवाश्याला तो कारखाना पाहतां येतो आणि चंदनकाष्ठें गिरणींत टाकण्यापासून तों चंदनी तेल बाहेर निघण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रिया नजरेखालून घालतां येतात. कारखान्यांत शिरल्यावर थोड्याच वेळांत प्रेक्षकाला वाटूं लागतें, कीं आपलें शरीरहि चंदनाचेंच असून त्यांतूनहि सुवासाच्या लहरी बाहेर पडत आहेत. तिथून बाहेर पडतांना तुमच्या हाताला त्या शुद्ध चंदनी तेलाचा एक बोळा फासला जातो अन् तो सुगंध मग सारा दिवस तुमच्या संगतीला राहतो. चंदनावरची, तशीच हस्तिदंतावरची नाजुक, कुसरीची कारागिरी पाहावी ती म्हैसूरलाच.

म्हैसूरला जाणाऱ्या पथिकाची आणखी एक आस अन् ध्यास असते ती वृंदावन उद्यान पाहण्याची. रविवारीं अन् बुधवारीं त्या उद्यानांत तासभर रंगीत रोषणाई होते अन् ती पाहण्यासाठीं हजारों माणसें सायंकाळीं पांच वाजल्यापासून तिकडे जाऊं लागतात. त्यासाठीं मोटारीमागून मोटारी सुटतात. म्हैसूरपासून हें ठिकाण चौदा मैलांवर येतें. तिथें कावेरी नदीवर धरण बांधून कित्येक कोसांच्या घेरांत पाणी सांठवलें आहे, त्याला म्हणतात कृष्णराजसागर. त्या धरणाच्या भिंतीला लागूनच दुसऱ्या अंगानें हें सुंदर उद्यान निर्मिलें आहे. त्याच्या मधोमध एक तलाव आहे. दोन्ही बाजूंनीं टप्प्याटप्प्यानें उतरून दुतर्फा लावलेल्या लहानमोठ्या फुलझाडांची शोभा पाहत पाहत त्या तलावाच्या कांठावर जावें. हवेंतर तिथें एखाद्या वृक्षातळीं विसावावें किंवा हौस असली तर तिथल्या नांवेंतून जलविहार करावा. कुठेंहि तुम्ही बसा. तुमची दृष्टि नुसती वर झाली, तरी ती एखाद्या फवा-

ऱ्यावर किंवा कारंज्यावरच पडेल. कारंजीं, बहुत कारंजीं, हेंच तर त्या उद्यानाचें आगळेपण ! कुठें एखाद्या पुष्करिणींत कारंजांच्या अनेक पिच-काऱ्या अंतर्वक्र होऊन एकमेकींवर आपलें डोकें आपटतात, तर कुठें त्याच रसधारा बहिर्वक्र होऊन एखाद्या उमलत्या भव्य पुष्पाचा आकार दाखव-तात. त्या धारांतून बाहेर पडणारे अणुरेणू असे कांहीं आजूबाजूला पसरून राहतात, कीं जणू तें त्या यौवनमस्त आपोदेवींनीं वेढलेलें विरल दुकूल वस्त्र वाटावें.

आणि अशा त्या उद्यानांत सायंकाळीं सातांचा ठोका पडला, कीं एका-एकीं अद्‌भुत किमया होते. सगळीकडे एकाएकीं प्रकाशरूप प्राण भरला जातो. सगळ्या कारंजांत आणि प्रत्येक जलधारेंतून विविध रंगांच्या पिच-काऱ्या उडूं लागतात. पाताळांतल्या नागकन्यांनीं तेवढ्याच भूप्रदेशावर रंग-पंचमीचा खेळ सुरू केल्याचा भास होऊं लागतो. हिरवा, पिवळा, निळा, लाल, गुलाबी इत्यादि रंग एकमेकांत मिसळून आणि तरीहि आपलें वेगळें अस्तित्व टिकवून अनुस्यूत नटनाच सुरू करतात. आकाशाच्या काळ्या-निळ्या चांदव्याखालीं होणारें हें सप्तरंगी नर्तन प्रेक्षकाला कोणत्या तरी वेगळ्याच दुनियेंत घेऊन जातें. त्या उद्यानांतलीं झाडें रंगतात. तशींच त्यांच्या कडेकडेनें फिरणारीं माणसेंहि यक्षगंधर्वांच्या प्रदेशांतून खालीं उतरल्यागत वाटतात. तिथले कृत्रिम प्रपात आणि पाणलोट जणूं इंद्रधनुष्य विरघळून तें द्रवरूपानें वाहूं लागावें, तसे दिसूं लागतात. हें सर्व आश्चर्य थोडा वेळ डोळे भरून पाहिल्यावर मग एखाद्या आत्मलक्षी प्रेक्षकाला आपले चर्मचक्षु मिटून घ्यावेसे वाटतात. बाहेरची ती रंग-प्रकाशाची उधळण आपल्या हृदयांत आणून ओतावीशी वाटते. तें सारें उद्यान आंत फुलवावें, खुलवावें आणि त्याला विस्मृतीच्या छायेनें कधींहि ग्रासूं नये, अशी आकांक्षा उत्पन्न होते. तिथून परत फिरतांना पावलें जड होतात अन् मन भारावून जातें. म्हैसूरच्या सफरीची ती जणूं सांगताच असते.

म्हैसूर प्रदेशांत आणखी एक प्रतीक ठायीं ठायीं दिसतें, तें म्हणजे गंड-भेरुंड. तो एक काल्पनिक पक्षी आहे. आकार गरुडाचा, पण त्याच्या एका धडांतून दोन चोंची विरुद्ध दिशांना उगवलेल्या असतात. जसा शरभ हा

काल्पनिक पशु सिंहाहूनहि बलाढ्य मानतात, तसाच गंडभेरुंड हा जुळ्या चोंचीचा पक्षी साऱ्या पक्षिसमुदायांत श्रेष्ठ समजतात. कित्येक ठिकाणीं तर त्याच्या दोन्ही चोंचींत आणि पावलांच्या पंजांत एकेक हत्ती दाखवून त्याचें चित्र काढलें जातें. म्हैसूर-नरेशांची ही राजमुद्रा आहे. हें प्रतीक म्हैसूरच्या राजप्रासादांवर दिसतें, तसेंच तें बेंगळूरला बांधलेल्या नव्या विधानसौधावरहि झळकतें.)

बेंगळूरचा विधानसौध म्हणजे तिथलें सचिवालय. त्याबरोबर त्याच वास्तूंत विधानसभेचीहि मांडणी केलेली आहे. या वास्तूबद्दल श्री. काशीनाथ पोतदार यांनीं जी माहिती दिली आहे, तें अवतरणच इथें उद्धृत करतों. म्हणजे मला निराळें कांहीं सांगावें लागणार नाहीं—

" बंगलोरचें विधानसौध ही स्वातंत्र्योत्तर काळांतील अतिशय भव्य वास्तु समजली जाते. उत्तरेंतील चंडीगढ ही कोरी करकरीत राजधानी आधुनिक स्थापत्यशास्त्राचा नमुना म्हणतां येईल, तर बंगलोरचें विधान-सौध प्राचीन भारतीय स्थापत्याचा मागोवा घेत घेत उभारलेली नवी इमारत म्हणावी लागेल. नव्या दिल्लींत ब्रिटिशांनीं उभारलेल्या राष्ट्रपति-भवन, सचिवालय किंवा संसद सभागृहाशींच ह्या विधान-सौधाची तुलना होऊं शकेल. जाणकार म्हणतात कीं, स्वातंत्र्योत्तर भारतांतील ही सर्वोत्तम वास्तु आहे. ग्रॅनाईटच्या ह्या पांच मजली प्रचंड इमारतीकडे पाहतांना छाती दडपून जाते. तिची दक्षिणोत्तर लांबी ७०० फूट व पूर्व-पश्चिम रुंदी ३५० फूट असून तिचें क्षेत्र सुमारें पांच लक्ष चौरस फूट आहे. चैत्य धर्तीच्या कमानी, मोगल धर्तीचे घुमट आणि कळसावर बसलेले अशोक-चिह्नांकित सिंह लक्ष वेधून घेतात. इमारतींत प्रवेश केल्यावर वरचे मजले कमळाच्या पाकळ्यां-प्रमाणें उमलतांना दिसतात. "

बेंगळूर शहराचा पाया घातला तो एका पाळेगारानें. त्यानें १५३७ सालीं इथें एक किल्ला बांधला. प्रथम तो मातीचा होता. पुढें हैदरानें तो वाढवून दगडी बनवला. आतां तो किल्ला पाडून त्या जागीं इमारती उभवल्या आहेत. बेंगळूर शहर सारखें वाढतें आहे. तिथली हवा उत्तम, सूर्यप्रकाश

सौम्य आणि वारा सुखावह म्हणूनच कांहीं त्या शहराची वाढ होत नाहीं. या वाढीचें कारण म्हणजे तिथले प्रचंड कारखाने आणि उद्योगधंदे. बेंगळूरच्या आसपास कित्येक औद्योगिक वसाहती उभ्या झाल्या आहेत. या एकाच शहरांत जितक्या सरकारी उद्योगसंस्था आहेत, तितक्या भारतांतल्या दुसऱ्या कोणत्याहि शहरांत आढळणार नाहींत. बेंगळूर ही केवळ म्हैसूर राज्याचीच राजधानी नव्हे; तर ती कारखान्यांचीहि राजधानी आहे.

इथल्या ' भारत इलेक्ट्रॉनिक्स ' या कारखान्यांत लष्करासाठीं लागणारीं रेडिओ ट्रान्समिटर्स, रडार, इत्यादि विद्युद्यंत्रें निर्माण होतात. ' हिंदुस्थान एअर क्रॅफ्ट्स् लिमिटेड ' या कारखान्यांत भारतीय विमानदलाला उपयोगी पडतील अशीं विमानें बनतात. ' हिंदुस्थान मशीन टूल्स ' या उद्योग-संस्थेंत यांत्रिक अवजारें तयार होतात. 'इंडियन टेलिफोन इंडस्ट्रींत ' दूरवाणीचे संच बनतात. इथली 'टाटा रिसर्च इन्स्टिटयूट' ही अखिल भारतांतील अग्रगण्य संशोधनसंस्था आहे. उद्योग आणि विज्ञान या उभय दृष्टींनीं बेंगळूरचें महत्त्व असाधारण आहे. मुंबई अन् कलकत्ता यांच्या खालोखाल औद्योगिक घडामोडींचें तिसरें शहर कोणतें असेल, तर तें बेंगळूर हेंच होय.


लालबाग, कब्बनपार्क, बसवनगुडी, पदार्थसंग्रहालय, हीं बेंगळूरचीं प्रेक्षणीय स्थळें होत. या शहराचा आजचा डामडौल, ही सर मिर्झा इस्माइल यांची रसिकता अन् कर्तबगारी आहे. ते म्हैसूर संस्थानाचे दिवाण असतांना त्यांनीं म्हैसूर आणि बेंगळूर हीं दोन्ही शहरें नेटकीं आणि अधिक प्रेक्षणीय बनवलीं.

## कर्नाटक हेल्थ इन्स्टिटयूट

कर्नाटकाचा दौरा आटोपून परत येतांना मी तुम्हांला मधेंच एका स्टेशनावर उतरवणार आहें. त्या स्टेशनाचें अन् गांवाचेंहि नांव आहे घटप्रभा. तिथून जवळूनच घटप्रभा नांवाची नदी वाहते. स्टेशनवर उतरून दोनच फर्लांग पुढें गेल्यावर एका चौकांत एक भली मोठी पाटी दिसते. तिच्यावर लिहिलेलें आहे, 'कर्नाटक हेल्थ इन्स्टिटयूट.' तिथून थोडें पुढे गेल्यावर तुम्ही त्या संस्थेच्या आवारांतच पोंचतां. तिथल्या अभ्यागतगृहांत

तुम्हाला थोडा वेळ टेकतां येईल अन् तिथून कोणाचें तरी मार्गदर्शन घेऊन संस्थेचे सर्व विभाग पाहतां येतील.

हें कलाक्षेत्र नाहीं किंवा धर्मक्षेत्रहि नाहीं. हें आहे जीवनक्षेत्र. अनेक रुग्णांना जीवदान देणारें आरोग्यक्षेत्र. कॉंग्रेस सेवादलाचे कर्णधार डॉ. हर्डीकर, डॉ. माधवराव वैद्य अन् डॉ. गं. तु. बाळेखे ही इथली त्रिगुणात्मक डॉक्टर-त्रिमूर्ति. डॉ. कोकटनूर यांनीं उघड्या माळावर शुद्ध हवेच्या ठिकाणीं पंचवीस वर्षांपूर्वीं स्थापन केलेली ही संस्था वरील त्रिमूर्तींनीं आतां चांगलीच नांवारूपास आणली आहे. आजमितीस ती कर्नाटकाला ललामभूत अशी संस्था झालेली आहे. या संस्थेच्या मागें आणखी कांहीं मोठ्या व्यक्ती उभ्या आहेत. बेळगांवचे सुप्रसिद्ध पुढारी आणि वकील श्री. भीमराव पोतदार, मुंबईचे उद्योगपति श्री. विष्णु निमकर, मुंबईचेच सुविख्यात डॉ. साठे, महाराष्ट्राचे प्रसिद्ध कारखानदार श्री. शंकरराव किर्लोस्कर, इत्यादि मंडळी या संस्थेच्या उत्कर्षासाठीं सदैव झटत आहेत.



घटप्रभेचें हॉस्पिटल

इथें तुम्हांला मोठी इमारत दिसेल, तें इथलें जनरल हॉस्पिटल. तिथून खालीं दोन फर्लांगावर क्षयरोग्यांचें सॅनिटोरियम. हॉस्पिटलजवळ 'नर्सेस ट्रेनिंग सेंटर.' अभ्यागतगृहाच्या मागच्या अंगाला अनुदिनीं वृद्धिंगत होणारें संस्थेचें ग्रंथालय. त्याच्या मागें महिलामंडळ अन् बालवाडी. रस्त्याच्या एका अंगाला मारुतीचें मंदिर आणि दुसऱ्या अंगाला वाढत्या आमराईतला द्राक्षमळा. असा हा सगळा इथला व्याप आहे. जनांत असून विजनांत अशी

अनुक्रमांक ३१७८८ ... दि. १५-४-१९५५
क्रमांक ...२८८ ... नों. दि. १३।१०।८९

ही स्वतंत्र वसाहत आहे. इथें डाक आणि तारघर आहे. बिजली आहे तसाच टेलिफोनहि आहे. नळाचें पाणी आहे तसेंच भोजनगृहहि आहे. एतावता साऱ्या आधुनिक सुखसोई इथें उपलब्ध आहेत.

डॉ. माधवराव वैद्य हे इथले मुख्य मेडिकल ऑफिसर. त्यांचा शस्त्रक्रिया करणारा हात कलाकाराचा आहे. त्यांच्या ज्ञानाला धार आहे, शब्दाला वजन आहे आणि हाताला यश आहे.त्यांच्या हातून शस्त्रक्रिया करून घेण्यासाठीं कुठून कुठून माणसें इथें येतात. आपण बरें होऊन गेल्यावर गरज पडेल, त्यावेळीं आपल्या आप्तेष्टांनाहि इथेंच घेऊन येतात. डॉ. माधवराव वैद्य हे जीवनाला तत्त्वज्ञानाची बैसका असलेले डॉक्टर आहेत. आपल्यापुढें येणाऱ्या रोग्याचें शारीरिक आरोग्य तर सुधारावेंच; पण त्याचबरोबर त्या रोग्यानें आपल्या मानसिक आरोग्याचीहि थोडी बहुत काळजी घ्यावी, अशी त्यांची आकांक्षा असते. त्यांचें बोलणें, चालणें त्या दृष्टीनेंच असतें. ही संस्था केवळ हॉस्पिटल म्हणून न राहतां तें तनमनाला सुधारणारें संस्कृतिकेंद्र बनावें असा त्यांचा मनोदय आहे. त्यांच्या रूपानें इथे निरलस सेवाधर्म जागता दिसतो.

तेच नव्हेत; तर इथली सर्वच मंडळी सेवाधर्मी आहेत. खरें म्हणजे त्यांच्या कष्टांना तोड नाहीं. परदेशी मिशनऱ्यांचें तोंडभर कौतुक करणाऱ्या लोकांनीं याहि लोकांना एकदा येऊन पाहावें, भेटावें. इथली सेवासुद्धा 'चुकली माकली सेवा, गोड मानून घे देवा,' अशा रामभरोसे जातीची नाही. ती शास्त्रपूत आहे, तंत्रशुद्ध आहे, तशीच आधुनिक उपकरणसामग्रीनें अद्ययावत् आहे. अन् या सर्वांच्या 'माथां मुकुट' म्हणजे त्या सेवेंत माणूसधर्माचें अधिष्ठान आहे. रुग्णाच्या खिशांतून विविध तंत्रांनीं जास्तींत जास्त दाम कसे काढतां येतील, ही दुर्वासना या संस्थेला शिवलेली नाहीं. कमींत कमी पैशांत रुग्णाला जास्तींत जास्त लाभ कसा देतां येईल तें पाहणें, ही इथली धारणा आहे. इथें माणूस त्याच्या पैशावर अथवा डामडौलावर ओळखला जात नाहीं. इथला मानदंड वेगळा आहे. राव-रंक सारे इथें 'माणूस' किंवा 'रुग्ण' या एकाच मूल्यानें मोजले जातात.

ही संस्था कर्नाटकाच्या भूमीवर मांडलेली असली, तरी ती सर्वांची अन् सर्वांसाठीं आहे. मानवमात्रासाठीं ती आहे. महाराष्ट्राला तर ती अगदी नजीक

आहे. पुण्याहून बेळगांवला जातांना कोणीहि इथें उतरून ती पाहूं शकतो. ही संस्था आतां केवळ हॉस्पिटलच्या मर्यादेंत न राहतां व्यापक क्षेत्रांत काम करूं लागली आहे. इथली डॉक्टरमंडळी आठवडयांतून ठरलेल्या वारीं जवळच्या खेडयापाडयांतून जातात. औषधांची अन् साधनसामग्रीची गाडी बरोबर घेऊन जातात आणि तिथल्या रोग्यांना औषधोपचार करतात. गेल्या वर्षी भारताचे राष्ट्रपति या संस्थेला भेट देण्यासाठीं आले होते. त्यांनीं हा इथला आस्थेवाईक, सश्रद्ध अन् व्यापक सेवाधर्म पाहिला अन् ते प्रसन्न मनानें म्हणाले–

" या संस्थेचें सर्वांत वैशिष्ट्य हें, कीं इथें चांगले आणि त्यागी, असे डॉक्टर एकत्रित झाले आहेत. ते खेडयांत राहून खेडयांतच सेवा करणें हें आपलें कर्तव्य समजतात. मी असें मानतों, कीं या संस्थेची हवा सर्वत्र पसरते आहे आणि ही संस्था लोकांत देशप्रेमाची, नियंत्रणाची, शिक्षणाची आणि सेवेची भावना जागृत करीत आहे. मीं जें कांहीं इथें पाहिलें, त्यानें मी बहुत संतुष्ट झालों आहें आणि आपणां सर्वांस हार्दिक धन्यवाद देत आहें ! "

दा. क्र. 72303



૩૧૪૪૮
૨૯૮

શ્રુ-મા૧/સ-
૧૩/૧૦/૯૧

REFBK-0012203